नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com


## ऑक्टोबर २०२६ पासून ४ राज्यांमध्ये जातीय जनगणना

**नवी दिल्ली, दि. ४ :** केंद्र सरकार १ मार्च २०२७ पासून देशात जातीय जनगणना करणार आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, जातीय जनगणना प्रथम ४ डोंगराळ राज्ये हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू आणि काश्मीर आणि लडाखमध्ये पायलट प्रोजेक्ट म्हणून केली जाईल. या राज्यांमध्ये १ ऑक्टोबर २०२६ पासून ती सुरू होईल.

स्वातंत्र्यानंतर देशात पहिल्यांदाच जातीय जनगणना करण्याची घोषणा केंद्राने ३० एप्रिल रोजी केली होती. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले होते की, मूलभूत जनगणनेसोबतच जातीय जनगणनाही केली जाईल. काँग्रेससह सर्व विरोधी पक्ष जातीय जनगणनेची मागणी करत आहेत.


* वर्ष ५५ * अंक ६७ * * नागपूर * | गुरुवार, दिनांक ५ जून २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


अग्राग्रलेख

## खरीखरी..

### अति उत्साहाची परिणती

आज बंगळूरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या चेंगराचेंगरीत किमान ११ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडलेली आहे. या स्टेडियम मध्ये बसण्याची म्हणजेच आसनाची क्षमता ३३ हजार लोकांची आहे. पण जाणकार असे सांगतात की त्या स्टेडियम मध्ये त्याच्या जवळपास चार-पाचपट म्हणजेच सव्वा लाखापर्यंत जनता आली होती. या जनतेला शिस्त लावण्यासाठी जी यंत्रणा हवी होती. तिचा त्या ठिकाणी पत्ता नव्हता. लोकांच्या झुंडीच्या झुंडी येत होत्या. या सर्व अगडबंब गर्दीला कसे थांबवावे हेच पोलिसांना कळत नव्हते. एखाद्या कार्यक्रमाचे नियोजन करताना अपेक्षित गर्दी पेक्षा जास्त गर्दी झाली किंवा वाढली. तर त्याची व्यवस्था तसेच आकस्मिक उद्भवलेल्या संकटाचे निवारण करण्याची क्षमता आणि नियंत्रण ठेवण्याची क्षमता असणे गरजेचे असते. कोणत्याही परिस्थितीत जीवित हानी होऊ नये. हा आपला प्रयत्न असला पाहिजे. पण आजचा हा कार्यक्रम बेंगळुरुच्या क्रिकेट संघाने आयपीएल मध्ये जो काल विजय मिळवला त्यासाठी होता. कार्यक्रम सरकारने आयोजित केलेला होता. या कार्यक्रमास गर्दी होईल हेही सर्वांना ठाऊक होते. आता त्या राज्यातील सर्व शक्तिमान सरकारला हे ठाऊक असताना कार्यक्रमाच्या बंदोबस्तासाठी त्यांनी काय केले. हे सांगणे त्यांचे कर्तव्य आहे. अशा प्रकारच्या कार्यक्रमात चेंगराचेंगरी होणे हा एक स्वाभाविक असा प्रकार आहे. प्रत्येकाला कार्यक्रम बघण्याची घाई असते विजयी झाल्यामुळे उत्साहाचे कारंजे उसळून वाहत असतात. नेमक्या अशाच वेळी जीव जाण्याच्या घटना घडत असतात. हे सुद्धा प्रशासनाने लक्षात घ्यायला हवे होते. एकूणच अशा प्रकारचा कार्यक्रम म्हणजे आपल्या राज्याचा गौरव असे समजले जाते. पण या ठिकाणी गौरवा ऐवजी रवरव नरकासारखे वातावरण निर्माण झाले. तर सामान्य जनतेला कसे वेठीस धरले जाते, याचा हा नमुना आहे. सध्या आपण राजकारणामध्ये एवढे गुंग आहोत की, अशा प्रकारच्या दुर्दैवी दुर्घटना या कानाने ऐकून त्या कानाने फेकून देतो. आजच्या दुर्घटनेचे वर्णन केवळ नियोजनाचा अभाव असे केले पाहिजे. आजकाल एखादा सामना हरणे किंवा जिंकणे यामध्ये एवढी अटीतटीची लढत असते की, त्यामुळे दोन्ही बाजूंकडून जल्लोष साजरा केला जात असतो. उत्साहाचे हे लोण मोठ्यांपासून तळागाळापर्यंत पोहोचले नसते तरच नवल. आता सरकारने कितीही सारवासारव केली. तरी ज्यांचे जीव गेले ते काही परत मिळणार नाहीत. हे सर्व तरुण मुले असतील असा आमचा कयास आहे. जे मरण पावले त्यांच्या आई बापांना किंवा इष्ट जनांना किती यातना होत असतील. तसेच आपल्या या जवळच्या व्यक्तींच्या जीवनात आता काहीतरी नवीन फुलण्या ऐवजी असा जीवघेणा प्रकार होत असेल. तर त्याला आपल्याकडे उत्तर नसते. मग प्रश्न असा आहे की आपल्याला अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे नियोजन करावे लागेल. ही कल्पना कर्नाटक सरकारला नव्हती काय. गेल्या अनेक दिवस क्रिकेटचे सामने होत आहेत. हे सामने इतके मनोरंजक उत्साहवर्धक असतात की, त्याला तोडच नाही. शेवटच्या सामन्यापूर्वी अनेक दिवस या सामन्याचे पडसाद उमटत असतात. मग आता उत्सवावेळी म्हणजेच विजयाच्या सेलिब्रेशनच्या ठिकाणी प्रचंड गर्दी होईल, हा काही सांगण्याचा मुद्दा नाही. आधीच कोणत्याही राज्याकडे केंद्राच्या मदतीशिवाय कोणताही भव्य दिव्य कार्यक्रम होऊ शकत नाही. केंद्र सरकारातही काही लाडके आणि काही हाडके अशा प्रकारची राज्ये आहेत. कर्नाटक हे डबल इंजिनचे सरकार नसल्यामुळे हाडके राज्य आहे. या वातावरणामुळे जनतेच्या मनावर विपरीत परिणाम होत असतो. या ठिकाणी एक मुद्दा असाही असू शकतो की, याबाबतीत फक्त सरकारचीच तेवढी जबाबदारी नसते. एक वेळा हे जरी मान्य केले तरी सरकारला हात झटकून मोकळे होता येत नाही. ही सुद्धा खरी गोष्ट आहे. कर्नाटकला तर नाहीच नाही. कारण तिथे सावत्र सरकार आहे. आपण निधन पावलेल्या सर्व मृतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करूया! जखमींच्या जखमा लवकरात लवकर भराव्यात. अशी कामना करूया!!


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# आरसीबीच्या विजयी रॅलीत चेंगराचेंगरी

# ७ जणांचा मृत्यू : २४ जखमी





**■ वृत्तसंस्था, बेंगळुरू, दि. ४ :** बुधवारी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) च्या विजयी परेड दरम्यान चेंगराचेंगरी झाली. वृत्तसंस्था आयएएनएसनुसार, बंगळुरूमधील चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीत ७ जणांचा मृत्यू झाला आहे, तर २४ जण जखमी झाले आहेत.

सर्व जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. विधानसभेत संघाचा सन्मान होत असताना ही दुर्घटना घडली. यावेळी गर्दी नियंत्रित करण्यासाठी पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला.

चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर चेंगराचेंगरी झाली, जिथे हजारो चाहतेही उपस्थित होते. चेंगराचेंगरी होण्यापूर्वीच एक मूल बेशुद्ध पडले होते. कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार म्हणाले, लाखो लोकांचा जमाव उपस्थित होता. आम्ही सध्या परिस्थिती सामान्य करण्यासाठी काम करत आहोत. किती मृत्यू झाले याची अद्याप पुष्टी झालेली नाही.

जेव्हा संघ विमानतळावर पोहोचला तेव्हा हजारो चाहते तिथे उपस्थित होते. विधानसभेत पोहोचताच मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी सर्व खेळाडूंचा सन्मान केला. यानंतर चिन्नास्वामी स्टेडियममध्येही कार्यक्रम झाले.

मंगळवारी आरसीबीने आयपीएलमधील पहिले विजेतेपद जिंकले होते. संघाने पंजाब किंग्ज (पीबीकेएस) ला ६ धावांनी पराभूत केले. यासह, आयपीएलला १८ व्या हंगामात आठवा विजेता मिळाला.

कर्नाटक भाजप अध्यक्ष बीवाय विजयेंद्र म्हणाले - राज्य सरकारने या घटनेची संपूर्ण जबाबदारी घेतली पाहिजे. जेव्हा संपूर्ण देश आणि कर्नाटक आरसीबीच्या विजयाचा आनंद साजरा करत होते, तेव्हा राज्य सरकारने कोणतीही पूर्व तयारी न करता विजयी रॅली काढण्याची घाई केली, ज्यामुळे ही दुर्घटना घडली.

राज्य सरकारने कधीही पूर्वतयारीची पर्वा केली नाही. त्यांना केवळ प्रसिद्धीमध्ये जास्त रस होता. परिणामी ११ हून अधिक लोकांचा मृत्यू झाला. काही लोक आयसीयूमध्ये आहेत. मी काही पीडितांशी बोललो, आत पोलिस नव्हते, रुग्णवाहिकेची सुविधा नव्हती. मुख्यमंत्र्यांनी हे प्रकरण न्यायालयीन चौकशीसाठी पाठवावे.

कर्नाटक विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते आणि भाजपचे एमएलसी चालवाडी नारायणस्वामी म्हणाले की, ही घटना सरकारमुळे घडली. त्यांना कल्पना नव्हती की किती लोक येतील आणि कोणती खबरदारी घ्यावी लागेल.

कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके शिवकुमार यांनी चेंगराचेंगरीच्या घटनेवर सांगितले की, आरसीबीच्या आयपीएल विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी आलेले लोक, त्यांना या दुर्घटनेने आणि मृत्यूमुळे खूप दुःख आणि धक्का बसला आहेत. एखाद्याने अभिमान बाळगला पाहिजे, पण जीवापेक्षा मोठा नाही. मी सर्वांना आवाहन करतो की कृपया सुरक्षित रहा.

## संसदेचे पावसाळी अधिवेशन 21 जुलै ते 12 ऑगस्ट दरम्यान

**■ वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. ४ :** संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलैपासून सुरू होईल. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी नवी दिल्लीत ही माहिती दिली. रिजिजू म्हणाले की, हे अधिवेशन २१ जुलै ते १२ ऑगस्ट दरम्यान चालेल.

किरण रिजिजू म्हणाले- सरकार नियमांनुसार अधिवेशनात कोणत्याही विषयावर चर्चा करण्यास तयार आहे. त्यांनी असेही सांगितले की अधिवेशनादरम्यान न्यायमूर्ती वर्मा यांच्याविरुद्ध महाभियोग प्रस्ताव मांडता येईल.

विरोधकांच्या 'विशेष अधिवेशना'च्या मागणीच्या पार्श्वभूमीवर सरकारने पावसाळी अधिवेशनाची घोषणा केली आहे. पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि भारत आणि पाकिस्तानमधील मध्यस्थीबाबत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानावर चर्चा व्हावी अशी मागणी विरोधकांकडून केली जात आहे.

इंडिया आघाडीच्या १७ पक्षांनी ३ जून रोजी नवी दिल्लीत बैठक घेतली. यामध्ये पंतप्रधान मोदींना विशेष अधिवेशन बोलावण्यासाठी पत्र लिहिले होते. मोदी सरकार ३.० आणि ऑपरेशन सिंदूर नंतर संसदेचे हे पहिलेच अधिवेशन असेल.

रिजिजू म्हणाले- पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरवर चर्चा करण्यास तयार आहे.






## न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्याशी कधीही तडजोड नाही : सीजेआय



**■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :** सरन्यायाधीश बी.आर. गवई यांनी न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्याबाबत विधान केले आहे. ते म्हणाले की, कॉलेजियम व्यवस्थेवर टीका केली जाऊ शकते, परंतु कोणत्याही व्यवस्थेत न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्याशी तडजोड केली जाऊ नये. न्यायाधीशांनी कोणत्याही बाह्य दबावापासून मुक्त राहिले पाहिजे.

सरन्यायाधीश म्हणाले, १९९३ पूर्वी भारतात न्यायाधीशांच्या नियुक्तीचा अंतिम निर्णय सरकारकडे होता आणि या काळात दोन वेळा असे घडले जेव्हा सरकारने वरिष्ठ न्यायाधीशांकडे दुर्लक्ष केले आणि दुसऱ्याला सरन्यायाधीश बनवले. त्याच वेळी, त्यांनी निवडणूक लढवणाऱ्या निवृत्त न्यायाधीशांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

लंडनमध्ये यूके सुप्रीम कोर्टाने आयोजित केलेल्या गोलमेज परिषदेत सरन्यायाधीश गवई बोलत होते.








## डीआयजी जालिंदर सुपेकरांचा बीडच्या 'आका'शी संबंध?



**बीड :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याला बीड कारागृहात ठेवण्यात आले होते. यामागे आयपीएस अधिकारी जालिंदर सुपेकर यांची थेट भूमिका असल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. केवळ तुरुंगातच नव्हे, तर कराडला दिल्या जाणाऱ्या विशेष वागणुकीबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. याशिवाय सुपेकर यांनी विविध कारागृहांमध्ये आरोपींकडून पैशांची मागणी केली असल्याचे दमानिया म्हणाल्या.

त्या पुढे बोलताना म्हणाल्या की, २८ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींची संपत्ती जप्त करण्याचे आदेश दिले. मात्र, आजपर्यंत वाल्मिक कराडची मालमत्ता जप्त करण्यात आलेली नाही. उलट त्याला पाठीशी घालण्याचे प्रयत्न सुरू आहेत, असा गंभीर आरोप दमानिया यांनी केला आहे.

अंजली दमानिया म्हणाल्या की, वाल्मिक कराडला मकोकामधून बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू असून, लवकरच तो भाजपमध्ये प्रवेश करू शकतो, अशी शक्यता त्यांनी वर्तवली. प्रत्येक जेलमध्ये सुपेकर यांच्याकडून पैसे मागितले जात आहेत. सुपेकर यांनी गन लायसन्स प्रकरणातही मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार केला असून, तत्कालीन पुणे पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांच्यावरही त्याच प्रकरणात आरोप आहेत.

## महिला आयोग सशक्त करण्यासाठी ठोस पावलं हवीत : निलम गोऱ्हे



**मुंबई :** महिला आयोग हे महिलांच्या संरक्षणासाठी व सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेलं शासनाचं एकमेव संस्थात्मक व्यासपीठ आहे. त्यामुळे आयोगाचं सक्षमीकरण करणं ही काळाची गरज असून, यासाठी ठोस पावलं उचलली पाहिजेत, असा संदेश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिला.

राज्य महिला आयोगाच्या कार्यपद्धती, अंमलबजावणीतील अडचणी, सेवांची गुणवत्ता आणि सक्षमीकरणासाठी आवश्यक उपाय यावर विधान भवनात विशेष अंतर्गत बैठक आयोजित करण्यात आली होती. यामध्ये राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, सदस्य सचिव डॉ. पद्मश्री बैनाडे, समुपदेशक लक्ष्मण मानकर व अंजली काकडे, प्रशासकीय अधिकारी भास्कर बनसोडे, कार्यकारी संपादक कपालिनी सीनकर आदी मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत आयोगासाठी स्वतंत्र, सुसज्ज इमारतीची तातडीची आवश्यकता, पोलिस यंत्रणेचा अधिक सहकार्यशील सहभाग, कौटुंबिक हिंसाचाराच्या प्रकरणांत समन्वयाने तातडीची कारवाई, आणि समुपदेशन प्रक्रियेचं अधिक संस्थात्मक रूप यासंदर्भात सखोल चर्चा झाली. तक्रारींचं जलद निवारण, वेळेवर चार्जशीट दाखल करणं आणि प्रभावी कायदेशीर मदत हे आयोगाचं कार्य अधिक प्रभावी करण्यासाठी गरजेचं असल्याचं मत सर्वांनी मांडलं.

आदिवासी भागांतील महिलांकरिता कार्य करणाऱ्या संस्थांना निधी मिळावा, उरफ अंतर्गत निधी संकलनास परवानगी मिळावी, तसेच ह्यआदिशक्ती अभियानह्ला अधिक बळ देण्याबाबतही चर्चा झाली. आयोगाने महिलांसाठी असलेल्या ह्यशक्ती कायदाह्, ह्यसमान नागरी कायदाह्व यासारख्या धोरणात्मक मुद्द्यांवर सरकारसमोर ठोस शिफारसी मांडण्याचं काम करावं, असं डॉ. गोऱ्हे यांनी स्पष्ट केलं.

## चक्रम' लोकांना मंत्रिमंडळात ठेवता कामा नये : अंबादास दानवे



**मुंबई :** छत्रपती संभाजीनगर येथील विट्स हॉटेलच्या लिलावावरून पालकमंत्री संजय शिरसाट तसेच ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांच्यात वाद सुरू आहे. संजय शिरसाट यांनी या लिलावातून माघार घेतली आहे. परंतु अंबादास दानवे यांनी या सगळ्यात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्याच्या निलंबनाची मागणी केली आहे. तसेच संजय शिरसाट यांनी स्वतःहून आपण चक्रम असल्याचे कबूल केले आहे, तर अशा लोकांना मंत्रिमंडळात ठेवता कामा नये, अशी मागणी केली आहे.

अंबादास दानवे म्हणाले, मी त्यांना आव्हान केले होते की तुमचे पाच पार्टनर कोण आहेत ते जाहीर करावे, आता मी सांगितले आहे की त्यांच्याच घरातले पार्टनर आहेत. राज्य सरकार अशा अधिकाऱ्यावर कारवाई करणार की नाही करणार हा माझा प्रश्न आहे. एखादा महसूल विभागाचा एसडीएम आणि पालकमंत्री मिळून तिथे त्यांचा दबाव असल्याशिवाय त्यांचे काम करू शकत नाही.

### दादांवर आरोप होत असताना बचावासाठी कुणीही पुढे येत नाही

# अजित पवारांच्या पक्षात गटबाजी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रचंड गटबाजी असल्याचा आरोप केला आहे. आमच्या नव्हे तर अजित पवारांच्याच पक्षात मोठी गटबाजी आहे. त्यांच्यावर आरोप होत असताना त्यांच्या बचावासाठी कुणीही पुढे येत नाही, यावरून हे सिद्ध होते, असे ते म्हणालेत.

गत काही महिन्यांपासून सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांकडून सातत्याने महाविकास आघाडीत फूट पडल्याचा आरोप होत आहे. पण आता आमदार रोहित पवार यांनी विरोधकांत नव्हे तर सत्ताधाऱ्यांतच दुही माजल्याचा आरोप केला आहे. विशेषतः अजित पवारांवर आरोप होत असताना त्यांच्या पक्षातील एकही नेता त्यांच्या समर्थनार्थ पुढे येत नसल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.

रोहित पवार पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, अजित पवार एकटेच आपल्या पक्षासाठी लढत आहेत. त्यांच्या पक्षाचे बाकीचे नेते काय करतात? त्यांच्या नेत्यांवर आरोप होत असताना हे नेते काहीच बोलत नाहीत, पण दुसऱ्यांवर आरोप होत असताना त्यांचे मोठमोठे बोलण्यासाठी पुढे येतात. मग याला काय म्हणायचे? त्यांच्या पक्षामध्येच अंतर्गत कुठेतरी गट पडलेत असे आपल्याला म्हणावे लागेल.



रोहित पवार यांचा दावा

जसे सत्ताधारी पक्षांच्या मित्रपक्षांमध्ये गट पडले आहेत, तसे महायुतीमध्येही गट पडलेत. अजित पवारांचा पक्ष एकनाथ शिंदेंच्या पक्षावरील आरोपांवर बोलत नाही. शिंदेंचा पक्ष अजितदादांच्या पक्षावर काही बोलत नाही. विशेषतः भाजप यात कुठेच दिसत नाही. भाजप मागे बसून केवळ तमाशा पाहण्याचे काम करतो. त्यामुळे महायुतीमधील घटक पक्षांमध्ये गट-तट पडले असल्याचे स्पष्ट होते. एकनाथ शिंदेंचा पाहा किंवा अजित पवारांचा पक्ष पाहा. त्यांना त्यांच्याच पक्षात काय सुरू आहे हे कळत नसेल तर आम्ही काय वक्तव्य करणार? असेही रोहित पवार यावेळी बोलताना म्हणाले.

उल्लेखनीय बाब म्हणजे सध्या राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या एकीकरणाचे वारे वाहत आहेत. शरद पवारांनी यासंबंधीचा निर्णय खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर सोपवला आहे. रोहित पवारांनी नुकतेच या मुद्यावर भाष्य केले होते.

शरद पवार जेव्हा काही बोलतात तेव्हा त्याचा खूप खोल अर्थ असतो. कधीकधी त्यांच्या म्हणण्यापेक्षा काहीतरी उलट घडत असते. शरद पवार लवकरच महाराष्ट्राच्या जनतेच्या हिताचा निर्णय घेतील.

जेव्हा अजित पवारांचा गट वेगळा होऊन भाजपशी युती करत होता तेव्हा शरद पवारांच्या गटाने असे करणे चुकीचे असल्याचे म्हटले होते. कारण त्यांचे भाजपशी वैचारिक मतभेद आहेत.

आता जर शरद पवारांचा पक्ष अजित पवारांच्या पक्षात सामील होऊन भाजपशी युती करत असेल तर ते आश्चर्यकारक ठरेल, परंतु, तूर्तास यावर फार बोलणे इष्ट नसल्याचे रोहित पवार म्हणाले.

## अपात्र नागरिकांच्याही पुनर्वसनाचा मार्ग मोकळा

धारावी पुनर्विकास प्रकल्प



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ४ :** मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी दुग्ध व्यवसाय विकास विभागाची कुर्ला येथील ८.५ हेक्टर जमीन हस्तांतरित करण्यासाठी करारनाम्यातील अटी, शर्तीमध्ये सुधारणांना मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

धारावीचा पुनर्विकास करताना प्रत्येक पात्र स्थानिकाला तिथेच घर हे सरकारचे आश्वासन आहे. आताच्या या निर्णयामुळे धारावीतील अपात्र नागरिकांच्याही पुनर्वसनाचा मार्ग मोकळा झाला आहे. धारावीचा पुनर्विकास करताना कोणावरही अन्याय होउ देणार नाही असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.

दुग्ध व्यवसाय विकास विभागाच्या कुर्ला येथील मातृदुग्धशाळेची जमीन धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी १४ जून २०२४ च्या निर्णयानुसार प्रदान करण्यात आली आहे.

या प्रकल्पाचे नियोजन प्राधिकरण म्हणून ही जमीन काही अटी व शर्तींवर धारावी पुनर्विकास प्रकल्प- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना प्रदान करण्यात आली आहे. हा प्रकल्प राबविणे अधिक सुलभ व्हावे यासाठी या ज्ञापनातील आणि जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या मसुदा करारनाम्यातील अटी व शर्ती गृहनिर्माण आणि नगरविकास विभागाच्या धोरणाशी सुसंगत करण्यास मान्यता देण्यात आली.

या निर्णयामुळे धारावीतील रहिवाश्यांच्या पुनर्वसनासाठी जास्तीत जास्त घरे उपलब्ध होऊ शकणार आहेत. धारावी पुनर्विकासात साडे आठ लाख कुटुंबांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. यापैकी पाच लाख पात्र कुटुंबाचे पुनवर्सन धारावी परिसरात पुनर्वसन होणार आहे. उर्वरित साडे तीन लाख कुटुंबांचे पुनवर्सन करण्यासाठी अधिकची जमीन गरजेचे आहे.

कुर्ला येथील जमीन उपलब्ध झाल्याने आणखी काही कुटुंबांचे पुनर्वसन करणे सुलभ होणार आहे. या निर्णयामुळे धारावीतील अपात्र नागरिकांच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा होणार आहे. सर्वांसाठी घरे या धोरणाचे पालन करताना हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण असून, केवळ घरेच नाही, तर शाळा, रुग्णालये, शॉपिंग कॉम्प्लेक्स अशा इतरही नागरी सुविधांचे निर्माण सुलभ होणार आहे.

## संजय राऊत जातात तिथे ठाकरे गटाचे विघटन

### गिरीश महाजन यांचा पलटवार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :** भाजप नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांनी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केलेले आरोप जोरकसपणे फेटाळून लावलेत.

शिवसेना ठाकरे गटाला उतरती कळा लागली आहे. संजय राऊत जिथे जातात, तिथे त्यांच्या पक्षाचे विघटन होते. आपल्या पक्षात आता कुणीच राहणार नाही हे त्यांना माहिती आहे. त्यामुळे ते अशी विधाने करत आहेत, असे ते म्हणालेत.

गिरीश महाजन पत्रकारांशी बोलताना म्हणाले, संजय राऊत मला नाच्या म्हणाले. ठीक आहे. मी शिवजयंतीला लेझीम खेळतो. ढोल वाजवतो. नाचतो. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती सोहळ्यातही मी नाचून आनंद व्यक्त करतो. रामनवमीलाही भगवा झेंडा घेऊन नाचतो. यात वावगे काय आहे? पण तुमच्याकडच्या लग्नामध्ये कोण कोण नाचले? असे विचारले तर काय होईल?



माझ्याकडे व्हिडिओ आहेत. पण मी असे एवढ्या खालच्या थराला जाणार नाही. संजय राऊत त्यांच्या पक्षाला नाशिकमध्ये लागलेल्या गळतीमुळे हताश झालेत. त्यातून ते अशा पद्धतीचे स्टेटमेंट करत आहेत.

गिरीश महाजन यांनी यावेळी सुधाकर बडगुजर यांच्या ठाकरे गटातून झालेल्या हकालपट्टीवरही भाष्य केले. संजय राऊत यांच्याकडे नाशिक जिल्ह्याचा प्रभार आहे. ते जिथे प्रभारी होतात, तेथील शिवसेनेचे कार्यकर्ते सोडून जातात. त्यांना माहिती आहे, पक्षात कुणीही राहणार नाही. त्यामुळेच ते एकेकाची पक्षातून हकालपट्टी करत आहेत. आम्हीच त्यांची हकालपट्टी केली असे सांगण्यासाठी त्यांनी ही कारवाई केली. पण तिथे राहण्यास आता कुणीच उत्सुक नाही ही वस्तुस्थिती आहे. संजय राऊत जिथे जातात, तिथे ठाकरे गटाचे विघटन होते.

संजय राऊत यांनी नैराश्यातून सुधाकर बडगुजर यांची हकालपट्टी केली. बडगुजर त्यांच्या जवळचे होते. ते फडणवीस यांना भेटले. अनेक मोठे पदाधिकारी संपर्कात आहेत. ते नाराज आहेत. वैतागले आहेत, असेही महाजन म्हणाले.

### गिरीश महाजन फडणवीसांचा सर्वात भ्रष्ट मंत्री



शिवसेना बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी बुधवारी राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन हे फडणवीस सरकारमधील सर्वात भ्रष्ट मंत्री असल्याचा खळबळजनक आरोप केला.

गिरीश महाजन यांच्या कार्यालयात अभिषेक कौल नामक ठेकेदार, बिल्डर आहे. तो पैशांचे सर्व व्यवहार करतो. त्याचा फोन आल्याशिवाय महाजन एकाही फाईलवर सही करत नाहीत, असे त्यांनी म्हटेल आहे. संजय राऊत यांच्या या आरोपामुळे महायुती सरकारमध्ये एकच खळबळ माजली असून, अभिषेक कौल कोण? असा सवाल केला जात आहे.

संजय राऊत बुधवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व गिरीश महाजन यांच्यावर टीकेची झोड उठवली. मी म्हणजेच पक्ष असा अहंकार जेव्हा माणसात निर्माण होतो, तेव्हा त्या माणसाच्या अधःपतनाला सुरूवात होते. एकनाथ शिंदे उद्धव ठाकरे यांच्यासोबत नाराज होते. ते आज जिथे आहेत तिथेही फार खूश नाहीत. अशा व्यक्तींच्या आजारावर कोणताही उपाय नसतो, असे ते म्हणाले.

## बडगुजर यांची हकालपट्टी

■ **वृत्तसंस्था, नाशिक, दि. ४ :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपनेते सुधाकर बडगुजर यांची अखेर पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. ठाकरे गटाचे नाशिकचे जिल्हाप्रमुख दत्ता गायकवाड यांनी आज एका पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेत खासदार संजय राऊत यांचा फोन आला आणि गायकवाड यांनी तत्काळ सुधाकर बडगुजर यांची पक्षातून हकालपट्टी करण्याची घोषणा केली.

ठाकरे गटाच्या या धडक कारवाईमुळे नाशिकमध्ये एकच खळबळ माजली आहे. दरम्यान, नाराजी व्यक्त करणे गुन्हा आहे का? असा सवाल बडगुजर यांनी या कारवाईवर भाष्य करताना उपस्थित केला आहे.

सुधाकर बडगुजर गत काही दिवसांपासून ठाकरे गटात नाराज असल्याची चर्चा सुरू होती. त्यांनी परवाच नाशिक दौ?यावर असलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. त्यानंतर ते पक्ष सोडण्याच्या विचारात असल्याची चर्चा सुरू झाली होती.

## भाजपचा मुंबई महापालिका गेमप्लॅन तयार!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :** आगामी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने (भाजप) आपली तयारी झपाट्याने सुरू केली असून, पक्षाकडून अंतर्गत सर्व्हेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात भाजपने मुंबईत मोठा भाऊ म्हणून आपली भूमिका स्पष्ट केल्याचे खात्रीलायक सूत्रांनी सांगितले.

सर्वेक्षणानुसार, सध्या मुंबई महापालिकेत भाजपचे सर्वाधिक नगरसेवक आहेत, त्यामुळेच पक्षाचे स्थान भक्कम आणि अग्रगण्य असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे भाजपने आगामी निवडणुकीत मुंबईत वर्चस्व गाजवण्याची रणनीती आखली असून, १५० हून अधिक जागांवर उमेदवार देण्याचा विचार सुरू आहे.

सर्वेक्षणानुसार, भाजपने जास्त जागांवर लढवले तरच पक्षाला निर्धारपूर्वक लाभ होईल, असा निष्कर्ष समोर आला आहे.

दरम्यान, ठाणे महापालिकेच्या संदर्भात भाजपने वास्तववादी भूमिका घेतली आहे. सर्वेक्षणात स्पष्ट झाले आहे की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा ठाणे शहरात अधिक प्रभाव आहे. त्यामुळे तिथे शिंदे गट ह्यमोठा भाऊह्ण आणि भाजप ह्यछोटा भाऊह्ण अशी भूमिका घेईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आले, तरी भाजपच्या जागांवर फारसा परिणाम होणार नसल्याचे भाजपाचे म्हणणे आहे.

## धनंजय मुंडे पुन्हा मंत्री होणार नाहीत



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ४ :** राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे हे सध्या प्रसार माध्यमांपासून अंतर राखून राहत असल्याचे दिसत आहे. तसेच सार्वजनिक ठिकाणी देखील भाषण करत नसल्याचे दिसून येत आहे. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमात देखील त्यांनी बोलणे टाळले.

आता आज ते नाशिकमध्ये एका धार्मिक कार्यक्रमात गेले होते तिथे त्यांचा मौन व्रत असल्याचे त्यांनी हात-खुणांनी दाखवले होते. यापूर्वी देखील ते काही दिवस इगतपुरी येथे विपश्यना केंद्रात होते. यावर करुणा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

करुणा मुंडे म्हणाल्या, जसे की आपण पाहत आहोत की आज त्यांच्याकडे कोणते पद नाही आणि पक्षावर कुठे तरी शांत राहून दबाव टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. जसे की त्यांचे लोक आहेत ते अशी बातमी पसरवत आहेत सोशल मीडियावर की धनंजय मुंडे परत मंत्री होणार, पण होणार नाही.

हे राजकारणी लोक स्ट्रॅटजी प्लॅनर ठेवत असतात. या लोकांकडे एक स्ट्रॅटजी प्लॅनर असतो, त्यानुसार धनंजय मुंड काम करीत असल्याचे त्या म्हणाल्या.

# मुंबई प्रवेश टोलमाफी आता २०२९ पर्यंत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :** मुंबई, मुंबई शहरात प्रवेश करण्याच्या पाच टोल नाक्यांवर हलकी वाहने, शालेय बसेस व राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस यांना पथकरातून सवलत देण्यात आली आहे. या पथकराच्या सवलतीपोटी महामंडळास भरपाई देण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच या टोल सवलतीचा कालावधी १७ सप्टेंबर २०२९ पर्यंत वाढविण्यासही मान्यता देण्यात आली.

राज्य रस्ते विकास महामंडळाच्या मुंबई प्रवेश द्वाराच्या सायन ह्र पनवेल मार्गावर वाशी येथे, लाल बहादूर शास्त्री रस्त्यावर मुलुंड येथे, पूर्व द्रुतगती मार्गावर मुलुंड येथे, ऐरोली पुलाजवळ, तसेच पश्चिम द्रुतगती मार्गावर दहीसर येथील नाक्यांवर १४ ऑक्टोबर २०२४ पासून पथकरातून सवलत देण्यात आली आहे.

ही सवलत दिल्यामुळे एम.ई.पी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांना या प्रकल्पासाठी करारनाम्यानुसार नुकसान भरपाई देण्याकरिता मुख्य सचिव यांच्या समितीने शिफारस केली आहे.




वसुलीचा मुळ कालावधी १९ ऑक्टोबर २०१० ते १८ नोव्हेंबर २०२६ होता. या कालावधीत सुधारणा करून तो १७ सप्टेंबर २०२९ पर्यंत वाढविण्यास मान्यता देण्यात आली. तथापि १९ नोव्हेंबर २०२६ ते १७ सप्टेंबर २०२९ या कालावधीतील सर्व प्रकारच्या वाहनांची प्रत्यक्ष गणनेचा रिअल-टाईम-डाटा उपलब्ध करून देण्याची अनिवार्य अट घालण्यात आली आहे.

मुंबई व उपनगर विभागातील २७ उड्डाणपुले व अनुषंगिक बांधकामांची निगा व देखभाल-दुरूस्तीची जबाबदारी ही संबंधित कंपनीकडेच राहणार आहे.

## बदलते हवामान आणि बिघडते पर्यावरण!

करोना महामारीच्या दुसऱ्या लाटेने ऑक्सिजनची परीभाषा काय आहे हे जगाला दाखवून दिले. त्यामुळे सावधान! ऑक्सिजनची पुर्ती करण्यासाठी पर्यावरणालङ्क वाचवणे अत्यंत गरजेचे आहे. आज आपण बदलत्या हवामानामुळे पर्यावरणात झालेल्या बदलांचे प्रायचित्य भोगतो आहे.

प्रदुषणावरील समस्येवर १९७२ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने स्टाकहोम (स्विडन) इथे जगातील पहिले पर्यावरण सम्मेलन आयोजित केले. यामध्ये ११९ देशांनी भाग घेतला होता व सर्वांनीच पृथ्वीच्या सिध्दांताला मान्यता दिली व दरवर्षी ५ जून पर्यावरण दिवस म्हणून साजरा करण्याची घोषणा करण्यात आली व ५ जुन १९४७ ला पहिला जागतिक पर्यावरण दिवस साजरा करण्यात आला.

आज संपूर्ण जगात पर्यावरणाच्या बाबतीत असमंजस्याचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रत्येक देश सर्वांनाच सांगतो की पर्यावरण वाचविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तरीही जगातील अनेक देश अत्याधुनिक शस्त्रस्पर्धेत आपापले शक्ती प्रदर्शन करतांना दिसतात. यामुळे प्रदूषणात व तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होवून पर्यावरणावर विपरीत परिणाम होतांना दिसतो. याचा परिणाम तिसऱ्या महायुद्धाकडे जातांना दिसतो.

आज युक्रेन - रशिया युद्ध व इजरायल-हमास-ईरान युद्धामुळे अनेक भाग आगीत भस्मसात झाला आहे. त्यामुळे बलाढ्य देशांनीच पर्यावरणाची गळचेपी केल्याचे दिसून येते. अमेरिका, नाटो देश, चीन, उत्तर कोरिया, रशिया, ब्रिटन, इजरायल यांनी पर्यावरणाला दूर नेवून ठेवले आहे. आपण दुसऱ्या महायुद्धातील हिरोशिमावर टाकलेल्या अणुबॉम्बचे मृत्यूचे तांडव पाहिले तरीही प्रत्येक देश पर्यावरणाला बाजूला सारून अणुबॉम्बची भाषा करतात.

आज अक्षरशः युक्रेनने १ जुन २०२५ ला रशियाचे ५ एअर बेस उध्वस्त केले व रशियावर पर्ल हार्बर सारखा अटॅक करून रशियाला तिसऱ्या महायुद्धासाठी उकसविल्याचे दिसून येते. आज प्रत्येक देश निसर्गाच्या हिरव्यागार गालीच्यावर बसण्यापेक्षा बारूदच्या ढिगाऱ्यावर बसण्याचे जास्त पसंत करतांना दिसतो. अत्याधुनिक शस्त्र स्पर्धेत सर्वच अव्वल येण्यासाठी प्रत्येक देश कसोशीचे प्रयत्न करीत आहे. त्यामुळे पुढे चालून बारूदचा ढिगारा संपूर्ण पृथ्वीला आगीच्या खाईत लोटू शकतो.

वाढत्या तापमानामुळे मे २०२४ मध्ये भारताची राजधानी दिल्ली येथील तापमान सर्वाधिक ५२.३ अंश सेल्सिअस होते. यावरुन आपण समजू शकतो की पुढे तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होवू शकते. आज जगात मोठ्या प्रमाणात शहरीकरण, औद्योगिकीकरण व सिमेंट रोडचा विस्तार झाल्यामुळे व ढासळत्या पर्यावरणामुळे सूर्य आग ओकत आहे. २०१९ मध्ये राजस्थान मधील चुर आणि श्रीगंगानगर येथे तापमान ५० डीग्री सेल्सिअस पार गेल्याने भारतातील पर्यावरण रेड झोनमध्ये होते ही अत्यंत चिंतेची व गंभीर बाब आहे.

२६ मे २०२० ला इराकमधील तूज या शहरात जगभरातील उच्चांकी ५०.५ अंश सेल्सिअस होते. वाढते तापमान पृथ्वीसाठी, मानव, जीवजंतू, पशुपक्षी या सर्वांसाठी आगीचा गोळा बनल्याचे दिसून येते. वाढता तापमानातील बदल हा मानवाच्या अतीरेकामुळे व अहंकारामुळे निर्माण होत आहे. याचा सरळ परिणाम पर्यावरणावर होत असून त्याचा ऱ्हास होत आहे. २०१९ मध्ये बंगालमध्ये आलेल्या अम्फान चक्रीवादळाने १०० हून अधिक लोकांचा बळी गेला व मोठ्या प्रमाणात वित्तीय हानी सुध्दा झाली. यानंतर तौक्ते वङ्कयास चक्रीवादळाने हाहाःकार माजवला. म्हणेज दरवर्षी दिवसेंदिवस वेगवेगळे चक्रीवादळ उग्ररूप धारण करतांना दिसते.

मानवाने पर्यावरणाकडे दुर्लक्ष केल्यामुळे ह्या संपूर्ण विनाशकारी नवीन-नवीन घटना पहायला मिळतात. याकरीता मानवाने पर्यावरणाची जोपासना करण्याची गरज आहे. आज जगात प्रदुषण वाढत आहे. त्यामुळे पृथ्वीतलावरील ऑक्सिजनची मात्रा कमी होत आहे. पर्यावरणाचे संतुलन विस्कळीत झाल्यामुळे व मोठ्या प्रमाणात जंगलतोड झाल्यामुळे जंगलातील हिंसक पशु शहरांकडे शिरकाव करतांना दिसतात. यामुळेच मानव व पशु यांच्यात शत्रृत्वाची भावना निर्माण झाली आहे. प्रदुषणामुळे अनेक पशु-पक्षी लुप्त झाल्याचे दिसून येते. गिधाड हा पक्षी पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून एक महत्त्वाचा घटक आहे. परंतु प्रदुषणामुळे गिधाडांची संख्या कमी झाल्याचे दिसून येते.

अशा प्रकारे अनेक पशु-पक्षांना प्रदुषणामुळे आपले प्राणसुध्दा गमवावे लागतात. पर्यावरणाला वाढविण्याकरिता मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याची गरज आहे. वाढते शहरीकरण व औद्योगिकीकरण यांना कुठेतरी अंकुश लावला पाहिजे आणि मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे. प्रदुषणामुळे व ग्लोबल वॉर्मिगमुळे मोठ्या प्रमाणात ग्लेशिअर वितळत आहे, समुद्राच्या पाण्याची पातळी वाढतच आहे, शहरीकरण, औद्योगिकीकरण व खनन प्रक्रियेमुळे जमीनीचा भुभाग निकामी होत आहे. यामुळे जगात ज्वालामुखीचा उद्रेक, वनवा लागून जंगल संपदा नष्ट होणे, भुकंप, सुनामी, अम्फान तुफान, अती पाउस, अती उष्णता, अती थंडी, अवकाळी पाऊस, विज पडून मृत्यूचे प्रमाण सुध्दा वाढले आहे.

जगातील देशांचे व देशातील प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे की पर्यावरणाला वाचविण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून घर तिथे झाड ही मोहीम राबविली पाहिजे. जंगल तोडीमुळे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता वाहून जाते. यामुळे विहीरीच्या पाण्याची पातळी कमी होत आहे. याकरीता ७०० फुट बोअरवेल खोदुन मानव पाण्याची तहान भागवत आहे. पाण्यासाठी ७०० फुटांवर मानवाने जाणे म्हणजे पाताळातील पाणी आणल्यासारखे आहे.

मानवजाती स्वतःच्या स्वाथार्साठी कोणत्याही स्तरावर जायला मागेपुढे पाहत नाही. कोव्हीड-१९ची महामारी मानवाच्या अतीरेकामुळेच झालेली होती.एप्रिल-मे महीना उष्णतेच्या लाटेचा होता, त्यामुळे संपूर्ण भारतात उष्णतेची लाट आणि पाण्याचा हाहाकार पहायला मिळाला. निसर्ग वाचला तर पृथ्वी वाचेल, पृथ्वी सुरक्षीत राहिली तर मानवजाती, पशु-पक्षी, जिवसृष्टी, जिवजंतु सुरक्षित राहील. याकरिता पर्यावरणाची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.

शहरीकरण व औद्योगिकीकरणाचा विस्तार रोखायला पाहिजे आणि मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून व महिन्यातून एक दिवसङ्क लॉकडाउन ठेवण्याचा संकल्प भारतासह संपूर्ण जगाने घ्यायला हवा. पर्यावरण वाचविण्याचा संदेश संपूर्ण जगात जायला पाहिजे. झाडे लावा, झाडे जगवा व पर्यावरण वाचवा!! ■ ■ ■



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

# ८ हजार हेक्टरवरील पिकांची हानी

## पंचनामे तातडीने करून मदत द्या: जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. ४ : उन्हाळ्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे ८ ते १० हजार क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले असून, तातडीने अशी मागणी काँग्रेसने मंगळवारी जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलेल्या निवेदनात केली. तसेच बाळापूर तालुक्यातीलही शेतकऱ्यांनी तहसीलदारांकडे हानी भरपाईची मागणी केली आहे. बाळापूर तालुक्यातील उरळ मंडळांतर्गत येणाऱ्या सर्व गावांमध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीने १३२ वर्षाचा विक्रम मोडला असून या पावसाने बागायतदार शेतकऱ्यांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मोरगाव सादिजन, टाकळी, निमकर्दा, झुरळ, सावरपाटी, रतनपुरी, मोरझाडी, अंत्री आदी शिवारातील उन्हाळी कांदा, ज्वारी, तीळ इत्यादी बागायती पिके मोठ्या प्रमाणात पेरली होती. मात्र, वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे पीक हे ओले होऊन शेतातच खराब झाले आहे. बारा तास सतत धार पाऊस पडत असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या कांद्याच्या ढिगा खालून पावसाचे पाणी वाहून गेले. त्यामुळे हा कांदा आता शेतकऱ्यांना फेकून दिल्याशिवाय पर्याय नाही. तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत करावी अशी मागणी शेतकरी पुत्र गोपाल पोहरे यांनी एका निवेदनाद्वारे तहसीलदार बाळापूर यांना केली आहे. निवेदन देते वेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष देवानंद साबळे, युवक जिल्हाध्यक्ष रवी गावंडे, अमोल माळी, प्रशांत गायकवाड, पवन गाडे, मधुसूदन टीकार आदी शेतकरी उपस्थित होते. असे झाले नुकसान जिल्ह्यात २३ ते २६ मे दरम्यान ११३२ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले. एकूण १०७ गावांमध्ये ही हानी झाली. यात अकोला-३४, बार्शीटाकळी-९,बाळापूर-३७व पातूरमधील २७ गावांचा समावेश होता. या तालुक्यामध्ये अनुक्रमे २८६, २५, २५० व ५६१ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. उन्हाळी कांदा, केळी, भुईमूग, ज्वारी, लिंबू, मका आदी पिके उद्ध्वस्त झाली. जिल्ह्यात २७ मे रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे ज्वारी, कांदा, मका, मूग, तीळ, भुईमूग, लिंबू, पपई, संत्रा, भाजीपाला, केळीचे प्रचंड नुकसान झाले. शेतकऱ्यांनी पिकांची काढणी करून गंजी उभी करून ठेवली. मात्र ही पिके जमीनदोस्त झाल्याचे काँग्रेसने निवेदनात म्हणाले आहे. सर्वेक्षण करणारे शेतकरी या पिकांचे सर्वेक्षण करीत नसल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे या पिकांचेही पंचनामे करण्यात यावे, अशीही मागणी काँग्रेसचे केली आहे. निवेदन उपजिल्हाधिकाऱ्यांनी स्वीकारले. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक अमानकर, प्रकाश तायडे, अतुल अमानकर, अॅड. महेश गणगणे, तश्वर पटेल, भीमराव खंडारे, पद्माकर वासनिक, शाम नेमाडे, रवींद्र लांडे आदी होते.

### पोलिस विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

**यवतमाळ:** मान्सूनसाठी सज्जता ठेवण्याच्या दृष्टीने, जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ व शासनाच्या वतीने एक आठवड्याचा आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याअंतर्गत २२ ते ३० मे या कालावधीत बळीराजा चेतना भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे प्रशिक्षण पार पडले. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अंतिम दिवशी, ३० मे रोजी, पोलिस मुख्यालय, यवतमाळ अंतर्गत येणाऱ्या सर्व पोलिस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचारी यांना आपत्ती व्यवस्थापनाचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले. हे प्रशिक्षण टीडीआरफ संचालक तथा आपत्ती व्यवस्थापन मास्टर ट्रेनर हरिश्चंद्र राठोड यांनी दिले. प्रशिक्षणात सहभागी अधिकाऱ्यांना अनेक मुद्द्यांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. त्यात आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीच्या वेळी तात्काळ कृती, आपत्तीनंतर पुनर्बांधणी, पूर व तत्सम परिस्थितीमधील तांत्रिक हस्तक्षेप, आपत्ती परिस्थितीत पोलिसांची भूमिका व जबाबदाऱ्या, जसे की मदत आणि बचाव कार्य, नागरिकांचे पुनर्वसन, कायदा आणि सुव्यवस्थेची राखण आणि आपत्तीग्रस्त भागात शिस्त व नियंत्रण ठेवणे या सत्रात प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांद्वारे प्रशिक्षण अधिक परिणामकारक बनवण्यात आले.

# ग्रामीण भागातील आपले सरकार सेवा केंद्र बनले केवळ शोभेची वस्तू



## सेतू चालकांचे उपोषण

■ महासागर प्रतिनिधी,
मोताळा , दि. ४ : ग्रामीण भागातील दाखल्यांच्या मागणीसाठी निपाना येथील ग्रामपंचायत स्तरावरील सेतू चालकांनी २ जून पासून येथील तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे. किरण रमेश बोरकर यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले की, ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्र चालकांचे महाऑनलाइन आयडी शासनाने तांत्रीक बदलासाठी तात्पुरते बंद केले आहे तसेच ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्र चालकांचे मानधन चार ते पाच महिन्यातुन एकवेळा होते. सेवा केंद्र चालकांच्या उपजीविकेसाठी हे एकमेव साधन आहे. ग्रामीण भागातील नागरिक गावातील केंद्राऐवजी दाखल्यांसाठी मोताळा येथील केंद्रावरून दाखले काढतात. गावातील सेतू केंद्रावर दाखले काढण्यासाठी कोणीही येत नसल्यामुळे ग्रामीण भागातील आपले सरकार सेवा केंद्र हे शोभेची वस्तू बनले आहे. तहसील कार्यालयातील सेतू विभागाचे कर्मचारी विविध कारणे सांगून ग्रामीण भागातील दाखले काढण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे दाखले तपासणीसाठी दुसऱ्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी या मागणीसाठी सेतु चालकांनी २ जून पासून तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.

# बाजार समितीमधील धान्याची नासाडी



■ महासागर प्रतिनिधी,
जळगाव जामोद , दि. ४ : जळगाव जामोद तालुक्यातील आसलगाव बाजार येथील उपबाजार समिती मध्ये ३० मे रोजी दुपारच्या सुमारास आलेल्या अचानक पावसामुळे शेकडो क्विंटल धान्याची नासाडी झाली आहे.

त्यामुळे व्यापाऱ्यांसह शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे. आसलगाव येथील उप बाजार समिती ही तालुक?यात सगळ्यात मोठी बाजार समिती आहे. शुक्रवार व मंगळवारी बाजार समितीमध्ये हजारो क्विंटल धान्याची खरेदी होते. संपूर्ण पंचक्रोशीतील शेतकरी या बाजार समितीला आपली पसंती देतात.

दरम्यान, मध्य प्रदेशमधून सुद्धा बऱ्याच शेतकऱ्यांचे धान्य या बाजार समितीमध्ये विक्रीसाठी आले होते. हजारो क्विंटल धान्याची खरेदी व्यापाऱ्यांकडून होत असते. परंतु पावसामुळे हर्राशीमध्ये व बाहेर ठेवलेले धान्य अक्षरशा पाण्यात भिजले. त्यामुळे व्यापारी वर्गासह शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

मागील वर्षी सुद्धा २६ मे रोजी मोठ्या प्रमाणात वादळ व अवकाळी पाऊस झाल्याने बाजार समितीवरील टिनपत्रे उडून गेली होती. त्यावेळी सुध्दा धान्य पावसाने ओले होवून व्यापाऱ्यांचे न भरून निघणारे नुकसान झाले होते.



# शिक्षक संघाच्या वतीने निष्ठावान सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार

## शिक्षकांनी सेवानिवृत्ती नंतरही सामाजिक कार्य करावे

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ , दि. ४ : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्राथमिक शिक्षक संघाचे पाच निष्ठावान शिक्षक नियत वयोमानाने सेवा निवृत्त झाल्याने त्यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन सहकार भवन यवतमाळ येथे करण्यात आले होते. या सेवापूर्ती सोहळ्याचे मार्गदर्शक व प्रमुख अतिथी म्हणून आमदार बाळासाहेब मांगुळकर यांची उपस्थिती होती.

शिक्षकांनी सेवानिवृत्ती नंतरही सामाजिक कार्य करावे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी मार्गदर्शन करताना केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिक्षक नेते मधुकर काठोळे, प्रमुख पाहुणे पतसंस्थेचे अध्यक्ष महेश सोनेकर, सचिव संजय बिहाडे, शिक्षक संघाचे जिल्हा अध्यक्ष राजेश उदार, पतसंस्थेचे उपाध्यक्ष संजय गावंडे, रमाकांत मोहरकर, शिक्षक समन्वय महासंघाचे किरण मानकर, तुषार आत्राम, स्वप्निल फुलमाळी, गटशिक्षणाधिकारी वांढरे, चंद्रकांत मेहेत्रे, तेजेश तिवारी, मिलिंद भगत, यांची उपस्थिती होती.

उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सेवापुर्ती सोहळ्याचे प्रास्ताविक जिल्हा अध्यक्ष राजेश उदार यांनी केले.

सेवा निवृत्त सत्कार मूर्ती राज्य उपाध्यक्ष तथा गटशिक्षणाधिकारी सुभाष धवसे, राज्य प्रतिनिधि विकास झाडे, शिक्षक रविंद्र वानखडे, देवराव चरडे, विठ्ठल थेटे, या पाच शिक्षकांचा सत्कार आमदार बाळासाहेब मांगूळकर यांच्या हस्ते शाल व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेची भेट देण्यात आली.

याप्रसंगी मधुकर काठोळे यांनी आपले विचार व्यक्त करताना सेवा निवृत्त झाल्या नंतर संघटनात्मक कार्यात सक्रीय सहभागी राहावे, असे ते म्हणाले. त्याच प्रमाणे जिल्हा अध्यक्ष राजेश उदार यांनी सेवानिवृत्त शिक्षक व त्यांचे अनुभव ही संघटनेची संपत्ती आहे, असे ते म्हणाले.

यावेळी आमदार बाळासाहेब मांगुळकर यांचा शिक्षक संघाच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सत्कार मूर्ती सुभाष धवसे, विकास झाडे, रविंद्र वानखडे, देवराव चरडे, विठ्ठल थेटे यांनी सत्काराला उत्तर देताना मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी जिल्ह्यातील विविध शिक्षक संघटनेचे पदाधिकारी व महिला शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हिम्मतराव ठाकरे, धनंजय फुलकर, मिलिंद भगत, देवानंद सोयाम, संजय पडलवार, गजानन चेर, विजय खोब्रागडे, जगदीश खाडे, दिनेश शिंदे, गुड्डू मिर, खुशाल कांबळे, अनिल मस्के, गजानन गौरकर, संतोष व्यवहारे, यांनी परिश्रम घेतले. या सेवा पूर्ती सोहळ्याचे सूत्र संचालन प्रमोद गजभिये यांनी केले. तर उपस्थितांचे आभार विठ्ठलदास आरू यांनी मानले. असे राजहंस मेंढे यांनी कळवले आहे.

# पावसाळ्यात जिल्ह्यात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबवा

## जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा



■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ , दि. ४ : 'वृक्ष लागवड काळाची गरज आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड होण्यासाठी तालुकास्तरावर स्वतंत्र नियोजन करा. या पावसाळ्यात जिल्ह्यात जास्तीत जास्त वृक्ष लागवड करा,' असे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले. महसूल भवन येथे जिल्हाधिकाऱ्यांनी वृक्ष लागवड कार्यक्रमाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला उपवनसंरक्षक धनंजय वायभासे, निवासी उपजिल्हाधिकारी सुदर्शन गायकवाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रकाश नाटकर, सामाजिक वनीकरणच्या विभागीय वन अधिकारी प्रणिता पारधी, वनपरिक्षेत्र अधिकारी शंकर मडावी यांच्यासह सर्व तहसिलदार, गटविकास अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी दुरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. वृक्षांची लागवड करतांना उत्पादन क्षम वृक्षांना प्राधान्य द्या. प्रत्येक तालुक्यात २ ते ३ प्रकारच्या वृक्षांची लागवड करा. त्यासाठी क्लस्टर करण्यात यावे. वन विभागाने आपले नियोजन करतांना तालुकास्तरावर तहसिलदार, गटविकास अधिकारी व वनपरिक्षेत्र अधिकारी यांची समिती तयार करून त्या समितीने लागवडीचे क्षेत्र, प्रमाण व आवश्यक वृक्षांची मागणी नोंदवावी. लागवड करण्यात आलेले वृक्ष पुढे जगतील यासाठी प्राधान्याने दक्षता घेण्यात यावी. ज्या ग्रामपंचायतींकडून अद्याप वृक्ष लागवडीचे प्रस्ताव सादर झाले नसतील, त्यांनी ते तातडीने सादर करावे. गटविकास अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतींचे एकत्रित प्रस्ताव द्यावे. वृक्ष लागवड करतांना गावकरी, शाळा, सरकारी अधिकारी, कर्मचारी, सामाजिक संस्था यांचा सहभाग घ्या. जास्तीत जास्त वृक्ष जगविण्याबाबत संबंधितांचे प्रशिक्षण घेण्यात यावे. जिल्ह्यात ई-क्लास जमिनी आहेत, याठिकाणी गावकऱ्यांच्या सहभागाने वृक्ष लागवड करता येतील का ते तपासण्याचे निर्देश देखील जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

जिल्ह्यात ४ हजार १८८ हेक्टरवर नियोजन जिल्ह्यात येत्या पावसाळ्यात ४ हजार १८८ हेक्टरवर वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. त्यात वन विभाग पुसद ७७ हेक्टर, वन विभाग पांढरकवडा ३०२ हेक्टर, वन विभाग यवतमाळ ५५९ हेक्टर, सामाजिक वनीकरण विभाग ५० हेक्टर तर जिल्ह्यातील ग्रामपंचायत क्षेत्रांमध्ये ३ हजार २०० हेक्टरवर वृक्ष लागवडीचा समावेश आहे. यात राज्य शासनाकडून पुन्हा लागवडीचे उद्दिष्ट प्राप्त होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अधिक वृक्ष लागवडीची तयारी ठेवावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या.


### कार्यालय
### नगर पंचायत बिडगाव - तरोडी (खुर्द) - पांढूर्णा
जिल्हा नागपूर - ४४००३५
Email: npbidgaontarodii@gmail.com

क्रमांक/नप.बिडगाव-त. (खुर्द)-पां./बांध.वि./१०४८/२०२५ दि.: ०३/०६/२०२५

**ई-निविदासूचना क्र. १०४८/२०२५-२६ (प्रथम वेळ)**

नगर पंचायत बिडगाव-तरोडी (खुर्द)- पांढुर्णा क्षेत्रात वैशिष्टयपूर्ण योजना सन २०२४-२५ अंतर्गत मंजूर काम करण्याकरिता नोंदणीकृत / अधिकृत कंत्राटदाराकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या साकेंतिक स्थळावर दिनांक ०५/०६/२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

निवेदेतील सर्व अधिकार मुख्याधिकारी, नगर पंचायत बिडगाव-तरोडी (खुर्द)-पांढुर्णा यांनी राखुन ठेवले आहे.

(विनायक घुगे)
मुख्याधिकारी
नगरपंचायत बिडगाव - तरोडी (खुर्द) - पांढूर्णा



### जाहीरनामा

अर्जदार- मुस्तफा शब्बीर जाकीर वय. ४२, रा. नागपुर ,हल्ली मुक्काम, उमरेड, त. उमरेड

विषय : भूमापन क्रमांक १४६ व उपविभाग उमरेड, तालुका उमरेड येथील मौजा बेलगांव प. ह. क्रमांक. ४५ येथील सर्वे नं....... शेतजमिनीत पक्का सुरक्षाभिंत बांधकाम बाबतचे आक्षेप/उजर / बाबत पब्लिक नोटीस प्रसिद्धी

मी. शेतजमीन मालक श्री. मुस्तफा शब्बीर जाकीर रा. प्लॉट नं A२८, उमरेड एमआयडीसी , बेळगांव रोड , उमरेड , त. उमरेड , वरील उपरोक्त शेतजमीनत मी माझे मालकी जागेत पक्का सुरक्षा भिंत बाबतचे कंपाऊंड दिवाळ करीत आहे. सदर सुरक्षा भिंत हे माझेच स्व मालकीचेच शेतातील जागेत असणार आहे., नियमानुसार मी इतर शेतकऱ्यांना/ तसेच लगत शेतकऱ्यांसाठी उर्वरित दक्षिणेस धुरा सोडीत ४ फूट हे जागा येजा साठी रिकामी सोडणार आहेत. सदर सुरक्षिभिंतचे काम तातडीने असल्याने पावसाळा लागायचे आगोदर करण्याचे ठरले आहे ,ज्याअर्थी १२/५/२०२५ रोजी सुरु होईल.

शेतजमिनीबाबत बांधकामाबाबत काही तक्रार/आक्षेप/ उजर/ असल्यास संबंधितांनी रीतसर पुरावे सहित पूर्ण मालकी/ बाबतचे कागदोपत्रीत वरील मोबाईल क्रमांक, ९४२२८२८७१२ ,तसेच माझे उपरोक्त पत्त्यावर पत्र व्यवहार करून सूचित करावे.

विहित मुदतीत कुठलेही आक्षेप प्राप्त झाले नाहीत तर यात कुणाचाही तक्रार नाही समजून सदर बांधकाम सुरू करण्यात येईल व विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही करिता जाहिरनामा करून माहीत अग्रेसित



### NAGPUR MUNICIPAL CORPORATION
**E-Tender Notice**

Commissioner NMC invites e-tenders for the following work. This e-tenders can be download by the registered Contractors in appropriate class of the Nagpur Municipal Corporation, Nagpur, from e-tendering Portal (www.mahatenders.gov.in) The terms and conditions of e-tenders are available on e-tender Portal (www.mahatenders.gov.in) The sale and purchase of e-tenders can be done through Online.

| Tender No. | Name of the Work | Amount Put To Tender (In Rs) | EMD (in Rs.) |
|---|---|---|---|
| 02/2025-26/EE/Project-1 | Renovation work of NMC Commissioner Bunglow, Nagpur | 24,27,136/- | 24,300/- |

**NOTE** - **1)** Right to reject any or all tenders without assigning any reason is reserved by the Municipal Commissioner N.M.C. Nagpur. **2)** Eligibility criteria and mode of submission shall be as stated in uploaded tender document. **3)** For any details regarding project, contact Executive Engineer (Project-1), 5 th floor NMC Building, Civil Lines, Nagpur 440001. Email ID- eeprojectnmc@gmail.com. **4)** Tender Submission End Date (16:00 Hrs): 12 Jun 2025. **5)** Tender Opening Date (If Possible 16:00 Hrs): 13 Jun 2025.

Advt No. 161 PR Date 04.06.2025

**Executive Engineer (Project-1)**
**Nagpur Municipal Corporation, Nagpur.**

P/N/25/161



### NAGPUR IMPROVEMENT TRUST
**e-TENDER NOTICE No. 08/2025-26**

Sealed Percentage Rate / Item Rate e-tenders are invited from Non-Registered / Registered Contractors with N.I.T. / N.M.R.D.A. / P.W.D. / N.M.C. or other Govt. Dept. as per eligibility criteria for **Six** development works. The details of work will be uploaded on tender website i.e. www.mahatenders.gov.in

| Sr. No. | Name of Work | Amount of work / E.M.D. | Time Limit in Months | Eligibility/Tender Cost in Rs. | Division |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Construction of Cement Concrete Road at Sangharsh Nagar Pr. No. 03, Plot No. 289 to 317, under MLA Fund in North Nagpur. | 21,08,978.37 / 21,100/- | 06 | V-A & Above / 2000/- | North |
| 2 | Construction of WBM road in various layout of Mouza – Dabha under 1900 Layout Fund. | 98,99,371.10 / 99,000/- | 10 | IV & Above / 3500/- | West |
| 3 | Annual Electrical Maintenance of various Play Ground Develop by NIT under East / West / North / South Division, Nagpur. | 18,16,772.00 / 18,200/- | 12 | Class – B & Above / 1600/- | Electrical Section |
| 4 | Construction of WBM Road in Various Layout at Mouza – Zingabai Takli, Police Line Takli under 1900 Layout Development Fund. | 57,46,000/- / 57,500/- | 10 | IV-A & Above / 3000/- | North |
| 5 | Providing and Laying Sewer Line in Sabina Co-op. Hsg. at Kh. No. 101/2, 105/2, Mz. – Nara under 1900 Layout Fund in North Nagpur. | 24,30,681.91 / 24,300/- | 06 | V-A & Above / 2000/- | North |
| 6 | Cleaning of WBM Roads and Allied Works for Departmental Asphalting work for HMP, NIT at Wanjra. | 80,61,166.75 / 80,700/- | 10 | IV-A & Above / 3000/- | HMP |

**Plans & Estimates :-** Available in the Technical Section, Head Office, Sadar, Nagpur. **Tender Forms :-** Available online from 02.00 P.M. on Dated **06.06.2025** up to 2.00 P.M. on Dated **13.06.2025** www.mahatenders.gov.in **Receipt / Submission :-** On line from 02.00 P.M. on Dated **06.06.2025** up to 2.00 P.M. on Dated **13.06.2025** www.mahatenders.gov.in **Opening :-** At N.I.T. office **on Dated 16.06.2025** at 2.00 P.M. or as decided by N.I.T.

**Advt.No.: S.E.(HQ)/16/2025-26**
**Dated : 04.06.2025**

**Sd/- Superintending Engineer (HQ),**
**Nagpur Improvement Trust**



### कार्यालय नगरपरिषद वानाडोंगरी
ता. हिंगणा, जि. नागपुर
Email:mcwanadongari2016@gmail.com

जावक क्र./नपवा/स्व/पा.पु.वि./१५५८/२०२५ दिनांक : ०४/०८/२०२५

**ई-निविदा सुचना (दुसरी वेळ)**

नगर परिषद वानाडोंगरी, जि. नागपूर कार्यालया तर्फे खालील कामाच्या द्वि लिफाफा पद्धतीने ई-निविदा योग्य त्या वर्गातील पंजीबद्ध कंत्राटदारांकडून / पुरवठाधारकाकडून मागविण्यात येत आहे. सदर कामाची निविदा केवळ ई-निविदा पद्धतीनेच सादर करावयाची आहे. ई-निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०४/०६/२५ दुपारी ०२.०० वाजता पासून पाहण्यास उपलब्ध राहील.

कामाचा तपशिल खालील प्रमाणे राहील

| अ.क्र. | कामाचे नाव | अनामत रक्कम | कोऱ्या निविदेची किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १) | सार्वजनिक विहिरीवर जाळी बसविणेबाबत. (ई-निविदा) | १५००० | ५०० | ३१ मार्च २०२६ |

निविदा प्रसिद्ध तपशील

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिद्धी दिनांक | दिनांक ०४/०६/२०२५ ला दुपारी ०२.०० वाजता पासून |
| ई-निविदा दस्तावेज डाऊनलोड करण्याचा कालावधी | दिनांक ०४/०६/२०२५ ते दिनांक ११/६/२०२५ ला दुपारी ३.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दिनांक ११/०६/२०२५ ला सायंकाळी ०३.०० वाजेपर्यंत |
| तांत्रिक बोली (Technical Bid) उघडण्याचे दिनांक | दिनांक १२/०६/२०२५ ला दुपारी ०३.०० वाजेपर्यंत किंवा नगर परिषदेच्या सोईनुसार. |

अटी व शर्ती -
१) निविदेच्या अटी व शर्ती तसेच सविस्तर निविदा सुचना महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पहावयास मिळेल.

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर परिषद वानाडोंगरी

# मानवी हस्तक्षेपामुळे प्रदूषित वातावरण जीवसृष्टीच्या विनाशाचे कारण

**(जागतिक पर्यावरण दिन विशेष ५ जून २०२५)**

**संपूर्ण आकाशगंगेत, केवळ पृथ्वीवरच जीवन शक्य आहे, कारण येथे जीवनासाठी आवश्यक असलेल्या घटकांचा चांगला समन्वय स्थापित झाला आहे. आपल्या सभोवतालचे वातावरण मानवी विकासासाठी उपयुक्त आहे, परंतु मानवाने सर्व मर्यादा ओलांडल्या आणि त्या पर्यावरणीय घटकांचे प्रचंड नुकसान केले आहे, ज्यामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले आणि ते आता मानवी जीवनासाठी धोकादायक बनत आहे.**

---------------

नैसर्गिक संसाधनांचे अतिरेक, भेसळ, विषारी रसायनांचा अमर्यादित वापर, यांत्रिक संसाधनांवरील वाढते अवलंबित्व, वाढते इलेक्ट्रॉनिक कचरा, प्रदूषण, घोंघाटा, अशुद्धता, जंगलतोड, सिमेंटीकरण, वाढते शहरीकरण, सरकारी नियमांचे कायद्यांचे उल्लंघन, वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासाचे नुकसान, ओझोन थराचे नुकसान, निसर्गात सातत्याने मानवी हस्तक्षेप यामुळे पर्यावरणाचा नाश होत आहे, ज्यामुळे नैसर्गिक आपत्तींमध्ये प्रचंड वाढ झाली आहे.

ग्लोबल वॉर्मिंगची समस्या खूप वेगाने वाढली आहे, ज्याचा थेट परिणाम जैवविविधतेवर होत आहे. पर्यावरणात मानवी हस्तक्षेपामुळे संपूर्ण जीवसृष्टीचे नुकसान झाले आहे. आता हळूहळू प्रत्येकाला त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागत आहेत. आपण लगेच युद्धपातळीवर पर्यावरणपूरक उपक्रमांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे, अन्यथा जीवसृष्टीचे भवितव्य अत्यंत विनाशकारी आणि वेदनादायी ठरेल.

पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी, दरवर्षी ५ जून रोजी जगभरात जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. या वर्षी २०२५ ची थीम जागतिक प्लास्टिक प्रदूषणाचा अंत करा आहे. प्लास्टिक प्रदूषणाला तोंड देण्याची आणि शाश्वत पर्यायांना प्रोत्साहन देण्याची तातडीची गरज या थीममध्ये अधोरेखित केली आहे.

जागतिक तापमानवाढीमुळे, हवामान ऋतूंचे चक्र विस्कळीत झाले आहे. आता उन्हाळ्यात पाऊस पडतो, पावसात थंडी पडते, हिवाळ्यात उष्णता आणि नंतर कधीकधी पाऊस पडतो, ज्याचा पिकांवर आणि आरोग्यावर वाईट परिणाम होतो. पिकांचे नुकसान होते, काही ठिकाणी पूर येतो तर काही ठिकाणी तीव्र दुष्काळ पडतो, ज्याचा सर्वात मोठा फटका शेतकरी, छोटे व्यापारी आणि गरिबांना सहन करावा लागतो, त्याचबरोबर वन्यजीव आणि जलचरांनाही हानी पोहोचते.

हिमखंड वितळतात आणि समुद्रात शोषले जातात, ज्यामुळे समुद्राची पातळी वाढते आणि तापमान सतत वाढत राहते. बदलत्या हवामानामुळे मानवी आरोग्य



अधिकाधिक कमकुवत होत चालले आहे, प्राणघातक आजार वेगाने पसरत आहेत, रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होत आहे.



डॉ. प्रितम भी. गेडाम
८२३७४ १७०४१
prit00786@gmail.com

सध्या उन्हाळ्यात वाढणारी आर्द्रता गुदमरवणारी ठरत आहे; असे वाटते की ते शरीराला आतून उकळत आहे. सजीवांसाठी वरदान असलेला ओझोन थर आता सतत होणाऱ्या नुकसानीमुळे धोक्यात येत आहे. या समस्या आणि प्रदुषित वातावरणामुळे आपले मानसिक आरोग्यही झपाट्याने बिघडते आहे.

आपण आपल्या पुढच्या पिढीसाठी असलेल्या नैसर्गिक संसाधनांचा नाश करण्यास सुरुवात केली आहे आणि त्याशिवाय, आपण विषारी वातावरण सतत वाढवत आहोत. आपण आपल्या स्वार्थात इतके आंधळे झालो आहोत की आपल्या घराबाहेर जर एखादे हिरवेगार झाड असेल, जे आपल्याला शुद्ध ऑक्सिजन, सावली, फळे, फुले आणि थंडावा देते, तरीही आपण ते झाड तोडून त्या जागेवर अतिक्रमण करण्याचा विचार करतो.

मानवांच्या अशा कृतींमुळे, किलबिलाट करणारे पक्षी दाट लोक वस्तीच्या भागांपासून दूर झाले आहेत. शहरांमधून वाहणाऱ्या नद्या आता घाणेरड्या नाल्यांमध्ये रूपांतरित झाल्या आहेत. अनेकदा अधिकाऱ्यांच्या किंवा निविदा काढणाऱ्या कंत्राटदारांच्या निष्काळजीपणाचे परिणाम सामान्य जनतेला भोगावे लागत असल्याचे दिसून येते. उदाहरणार्थः- थोड्याशा पावसाने पूर परिस्थिती निर्माण होते आणि शासनाचे दावे उघडकीस आणते.

पाऊस पडताच रस्त्यांवर पाणी साचते, सर्वत्र खड्डे पडतात, काही चौकात दिवसा रस्त्यावरील दिवे चालू राहतात आणि रात्री बंद राहतात, काही ठिकाणी वाहतूक सिग्नल बंद राहतात, काही ठिकाणी नळाचे पाणी रस्त्यांवर वाहत राहते आणि काही ठिकाणी कंत्राटदार रस्त्यांवर खड्डे खोदून सोडून देतात.

बंदी घातलेल्या प्लास्टिक पिशव्या आणि हानिकारक रसायनांचा अंदाधुंद वापर केला जात आहे. कुठेतरी उघड्यावर कचरा जाळला जातो, तर कुठे रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढीग साचलेले असतात.

अनेक वस्त्यांमध्ये गुरेढोरे आणि कुत्रे रस्त्यावर तळ ठोकताना दिसतात. कुठेतरी वर्षानुवर्षे तेच काम संथ गतीने सुरू राहते आणि जनता त्रस्त राहते. माणसाच्या बेजबाबदार कृती आणि लोभामुळे आता मानवी जीवनच उद्धवस्त होऊ लागले आहे. शासनाकडे नेहमी पुरेश्या कर्मचाऱ्यांची कमतरता दिसून येते.

अमेरिकेतील हेल्थ इफेक्ट्स इन्स्टिट्यूटने प्रसिद्ध केलेल्या अहवालात असे आढळून आले आहे की २०२१ मध्ये जगभरात ८.१ दशलक्ष मृत्यू हे वायू प्रदूषणामुळे झाले. या मृत्यूंव्यतिरिक्त, लाखो लोक गंभीर दीर्घकालीन आजारांनी ग्रस्त आहेत, ज्यामुळे आरोग्य सेवा प्रणाली, अर्थव्यवस्था आणि समाजांवर प्रचंड दबाव येतो.

२०२१ मध्ये, वायू प्रदूषणामुळे पाच वर्षांखालील ७,००,००० हून अधिक मुलांचा मृत्यू झाला, ज्यामुळे कुपोषणानंतर जागतिक स्तरावर या वयोगटातील मृत्यूसाठी हा दुसरा सर्वात मोठा जोखीम घटक बनला. यापैकी, प्रामुख्याने आफ्रिका आणि आशियामध्ये ५,००,००० बालमृत्यू हे प्रदूषक इंधन वापरून घरी स्वयंपाक केल्यामुळे होणाऱ्या वायू प्रदूषणामुळे झाले.

जागतिक आर्थिक मंचाच्या मते, जर उत्सर्जन कमी करण्यासाठी महत्त्वाचे उपाय अंमलात आणले गेले नाहीत तर हवामान संकटामुळे २०५० पर्यंत १.४५ कोटी लोकांचा मृत्यू होऊ शकतो, सोबतच अतिरिक्त खर्च १.१ ट्रिलियन डॉलर्स होण्याचा अंदाज आहे.

सरासरी तापमान औद्योगिक-पूर्व पातळीपेक्षा २.५ ते २.९ सेल्सिअसने वाढण्याची शक्यता आहे. हवामानाशी संबंधित मृत्युदरासाठी पूर हा सर्वात मोठा धोका घटक असल्याचे आढळून आले, ज्यामुळे २०५० पर्यंत ८.५ दशलक्ष मृत्यू होतील. दुष्काळ, जो अप्रत्यक्षपणे अति उष्णतेशी जोडलेला आहे, तो मृत्यूचे दुसरे प्रमुख कारण आहे, ज्यामध्ये ३.२ दशलक्ष मृत्यूची शक्यता आहे.

२०५० पर्यंत उष्णतेच्या लाटांमुळे सर्वात जास्त आर्थिक नुकसान होईल, कारण उत्पादकता कमी होईल, ज्याचा अंदाज ७.१ ट्रिलियन डॉलर्स असेल. वायू प्रदूषणामुळे होणारे अतिरिक्त मृत्यू, ज्यामध्ये सूक्ष्म कण आणि ओझोन प्रदूषण यांचा समावेश आहे, हे अकाली मृत्यूचे प्रमुख कारण असण्याचा अंदाज आहे, ज्यामुळे दरवर्षी अंदाजे ९ दशलक्ष मृत्यू होतात.

पर्यावरणाचे संरक्षण हे जीवनाचा आधार आहे, त्याचे रक्षण करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. हवा आणि जल प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना प्रभावीपणे राबवणे, उत्सर्जन नियम कडक करणे आणि कचरा व्यवस्थापन सुधारणे, हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि हवामान बदलाचे परिणाम कमी करण्यासाठी पावले उचलणे, ऊर्जा कार्यक्षमता सुधारणे आणि जंगलांचे संरक्षण करणे. परिसंस्थांचे जतन आणि पुनर्संचयित करणे, जंगलतोड कमी करणे आणि शाश्वत जमीन व्यवस्थापन पद्धतींना प्रोत्साहन देणे. हिरव्यागार जागांची निर्मिती, पायी चालणे आणि सायकलिंगला प्रोत्साहन, यांत्रिक संसाधनांवरील अवलंबित्व कमी करणे, वृक्षारोपणाला सातत्याने प्रोत्साहन देणे, गावांचे शहरांकडे होणारे स्थलांतर रोखण्यासाठी कायमस्वरूपी उपाय शोधणे म्हणजेच ग्रामीण भागातही दर्जेदार शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या सुविधा प्रभावीपणे स्थापित करणे, सुपीक जमिनीची धूप रोखणे, पिकांवर हानिकारक रसायनांच्या फवारणीवर बंदी घालणे, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण, जंगलातील झाडांचे क्षेत्र गरजेच्या प्रमाणात खूपच कमी आहे, ते वाढवण्याच्या गरजेवर भर देणे, प्लास्टिक कचरा आणि ई-कचऱ्याचे रीसायकल करणे, रेन वाटर हार्वेस्टिंगला प्रोत्साहन देणे, आजूबाजूच्या परिसरात कमीत कमी प्रदूषण आणि जास्तीत जास्त हिरवळ राखणे हे आपले कर्तव्य आहे.

तसेच सरकारी धोरणे आणि नियमांचे काटेकोरपणे पालन करा, स्वच्छ वातावरण असेल तरच जीवन आहे. आपण पर्यावरणाला जे काही दिले, तेच पर्यावरण आता आपल्याला परत करत आहे. जर आपण पर्यावरण स्वच्छ ठेवले तर पर्यावरण आपल्याला स्वच्छ वातावरण देईल.

■ ■ ■

# वसुंधरेचं वाळवंट होता कामा नये

**दरवर्षी जगभर ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी जागरूकता आणि कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त राष्ट्राचे प्रमुख साधन आहे. सृष्टी हे सजीव व निर्जिव वस्तुचे मिश्रण आहे, झाडे ही जीवन आहे. सृष्टीकर्त्याने जीवनाचे मिश्रण अशा प्रकारे केले आहे की, ते सृष्टीच्या जीवनचक्राला संतुलीत ठेवते. कोणत्याही सजीव निर्जीव रचनेसोबत मनुष्याने केलेल्या छेडछाडीचे परिणाम संपूर्ण जीवन सृष्टीला भोगावे लागतात. वृक्षवल्ली हा या सृष्टीचा खरा आधार आहे. तेव्हाच राज्य हिरवेगार होईल आणि आपण प्रदुषण विरहित वातावरणात स्वच्छंद श्वास घेवू यासाठी सर्वांनी कटीबध्द राहावे, कारण तो जीवकी प्राण आहे झाडे लावा आणि जगवा व अमूल्य असे जीवन वाचवा.**

------------------

जागतिक पर्यावरण दिन हा सार्वजनिक पोहोचण्यासाठी एक जागतिक व्यासपीठ आहे, ज्यामध्ये दरवर्षी १४३ हून अधिक देशांचा सहभाग असतो. दरवर्षी, कार्यक्रमाने व्यवसाय, गैर-सरकारी संस्था, समुदाय, सरकार आणि ख्यातनाम व्यक्तींना पर्यावरणीय कारणांचे समर्थन करण्यासाठी एक थीम आणि मंच प्रदान केला आहे.



प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी यादिवशी वेगवेगळे पर्यावरण विषयक जागरूकता आणि कृती कार्यक्रम आयोजित केले जातात.

जागतिक पर्यावरण दिवस या दिवशी त्या गोष्टी बद्दल जागरूक केले जाते. ज्यांचा जगावर आणि पर्यावरणावर सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम होतात. हा दिवस पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या आपल्या जबाबदारीचे आपल्याला जाणीव आणि दृष्टिकोन देतो.

आजच्या दिवशी म्हणजेच ५ जून रोजी जगभर पर्यावरण दिवस अगदी थाटामाटाने साजरा केला जातो. त्यादिवशी पुढील जीवनातील परिस्तिथी किती बिकट होईल ते पाहता त्यासाठी जागतिक पर्यावरण दिवस साजरा केला जातो. प्रत्येक ठिकाणी उपक्रम करून भाषणे करून, झाडे लावा उपक्रम राबवून पुढील धोका टाळण्याचे आज कार्य केले जाते.

यासर्वांतूनच या दिवसाची जागरूकता निर्माण होते. आपल्या मातेसमान पृथ्वी आहे आणि तिच्या पर्यावरणाची काळजी सर्वांनी घ्यावी. जवळपास पाच दशकांपासून जागतिक पर्यावरण दिन जागरूकता वाढवत आहे, कृतीला समर्थन देत आहे आणि पर्यावरणासाठी बदल घडवून आणत आहे.

जागतिक पर्यावरण दिनाची थीम ग्रीन सिटीज होती आणि घोषणा होती प्लॅन्ट फॉर द प्लॅनेट! २००५ ला साध्य केली. विषय वाळवंट आणि वाळवंटीकरण होता आणि वाळवंटात कोरडवाहू नको असे घोषवाक्य होते. २०११ च्या जागतिक पर्यावरण दिनाचे आयोजन भारताने केले होते. दिवसाचे यजमानपद भूषवण्याची भारताची ही पहिली वेळ होती.

२०११ ची थीम ह्यफॉरेस्ट्स - नेचर ॲट युवर सर्व्हिस होती. समुद्र किनारा स्वच्छता, मैफिली, प्रदर्शने, चित्रपट महोत्सव, सामुदायिक कार्यक्रम, वृक्षारोपण आणि बरेच काही यासह जगभरात हजारो उपक्रम आयोजित केले गेले.

भारतात नरेंद्र मोदी यांनी जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यासाठी आणि पर्यावरणासाठी जनजागृती करण्यासाठी कदंबचे रोपटे लावले. भारत येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उपक्रम २०१८ ची थीम बीट प्लास्टिक पोल्युशन होती.

यजमान राष्ट्र भारत होता. ही थीम निवडून, प्लास्टिक प्रदूषणाचा मोठा भार कमी करण्यासाठी लोक त्यांचे दैनंदिन जीवन बदलण्याचा प्रयत्न करतील अशी आशा आहे.

लोक एकल-वापर किंवा डिस्पोजेबलवर जास्त अवलंबून राहण्यापासून मुक्त असले पाहिजे कारण त्यांचे गंभीर पर्यावरणीय परिणाम आहेत. आपण आपली नैसर्गिक ठिकाणे, आपले वन्यजीव आणि स्वतःचे आरोग्य प्लास्टिकपासून मुक्त केले पाहिजे. भारत सरकारने 2022 पर्यंत भारतातील सर्व प्लास्टिकचा एकच वापर दूर करण्याचे वचन दिले आहे.

औद्योगीकीकरण आणि शहरीकरणांच्या प्रक्रियेत प्रदुषणाची समस्या देखील अधिक तीव्र होत आहे. त्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होत आहेत. पर्यावरणाला या हानी पासुन वाचविण्यासाठी मोठया प्रमाणात वृक्षारोपण होणे गरजेचे आहे. त्यादृष्टिने वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे। ही सर्वश्रेष्ठ तुकाराम महाराजांची शिकवण आचरणात आणुन अख्या महाराष्ट्रात व्यापक प्रमाणात वृक्षरोपणाचा उपक्रम हाती घेतला पाहिजे.

एकीकडे वृक्षरोपणाचा गाजावाजा करीत झाडे लावली जातात परंतू नंतर त्याची निगा राखली जात नाही. मृतपाय अवस्थेत ती झाडे असतात ही शोकांतीका आहे. तेव्हा राज्यात मोठया शहरातील महानगर पालीका, नगर पालीका, ग्राम पंचायती, नगर परिषदा यांना वृक्षरोपणाचा उपक्रम राबविण्यासाठी सक्ती केली पाहिजे.

कारण राज्याच्या प्रमुख शहरातील वृक्ष तोड सारखी वाढते आहे. त्यामुळे शहरातील सौंदर्यीकरण व सुशोभीकरण असलेले शहरे वृक्ष नसल्यामुळे पार शहरे बकाल होत चाललेली आहेत. त्यामुळे पर्यावरणात सारखी वाढ होत आहे.

जिकडे-तिकडे प्रदुषण पाय पसरवित असल्यामुळे आरोग्य असुरक्षीत आहे. वाढते शहरीकरण आणि औद्योगीकीकरणामुळे निर्माण होणारा नैसर्गीक असमतोल दुर करण्यासाठी तसेच स्वच्छ व हरीत पर्यावरणाच्या निर्मीतीसाठी प्रकल्पाची संकल्पना शासनाने साकारली पाहिजे.

जमीन मोकळी करण्यासाठी राजकिय आंधळेपणाचा आणि हव्यासातून आलेल्या आततायीपणाचा शासनामार्फत बुलडोजर सैरावैरा वृक्ष छाटीत निघाला आहे. पण पर्याय शोधला नाही उलट सिमेंट रस्त्याची भर त्यामुळे वातावरण दुषित होणं स्वाभाविक आहे. घरं रचली जातील, अहो पण वृक्ष नसतील तर माणसं कोसळतील त्यांचं काय? या जाणीवेनं वृक्ष वाचवा यासाठी संघर्ष समिती तयार करण्याची गरज आहे. नुसतं झाडं लावून भागणार नाही तर त्याची निगा राखली पाहिजे, जपवणुक केली पाहिजे. तेव्हा कुठे पर्यावरणाला बाधा होणार नाही तर सृष्टी नटलेली दिसेल बहर आलेला असेल अशावेळी झाडाची काळजी घेतली नाही तर वसुंधरेचं वाळवंट व्हायला वेळ लागणार नाही.

तेव्हा झाडे लावा आणि झाडे जगवा हा मंत्र प्रत्येकाने आत्मसात करुन येणाऱ्या पावसाळ्यात एक तरी झाड लावून आपलं कर्तव्य पणाला लावावे, जेणेकरुन पर्यावरण दिन साजरा करण्याचं सार्थक होईल. जागतिक पर्यावरण दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

■ ■ ■

## बकरी ईदनिमित्त गोहत्या नकोच!

**वाचक लिहितात**

बकरी ईदच्या जवळ आली आहे. भ्रष्ट पोलीस अधिकारी आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या नाकर्तेपणामुळे गोवंश हत्येच्या आणि गोतस्करीच्या बातम्या प्रतिदिन वृत्तपत्रांतून वाचनात येत आहेत.

गाय जशी हिंदूंसाठी पूजनीय आहे तशी ती अत्यंत उपयुक्त पशु सुद्धा आहे त्यामुळे तिचे पालनपोषण आणि संरक्षण करणे आज नितांत गरजेचे आहे. यासाठीच सरकारने राज्यात गोवंश हत्या प्रतिबंधक कायदा संमत केला.

मात्र त्यानंतरही गोवंश हत्येवर अंकुश आलेला नाही. या कायद्याच्या अंतर्गत कोणाला शिक्षा झाल्याचेही आजतागायत ऐकिवात नाही. गोवंश नेणाऱ्या वाहनांवर, कसायांवर कारवाई केली गेली तरी त्यांच्यावर वेगळीच कलमे लावली जातात असाही आरोप गोरक्षकांकडून करण्यात येतो, त्यामुळे या गोतस्करांना काही वेळातच जामीन मिळतो.

गोवंशाची सुटका करण्यासाठी गेलेल्या गोप्रेमींवर आणि पोलिसांवर गोतस्करांकडून आणि कसायांकडून बऱ्याचदा प्राणघातक हल्ले केले जातात. हिंदूंना पूजनीय असणाऱ्या गोमातेला आणि गोवंशाला कायद्याने संरक्षण मिळावे म्हणून हा कायदा करण्यात आला, मात्र कायद्याची अंमलबजावणी आज केवळ कागदावरच होताना दिसतेय.

धर्मनिरपेक्ष शासनप्रणाली अवलंबलेल्या भारतात सर्व धर्मियांना त्यांचे सण, उत्सव साजरे करण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे; मात्र ते साजरे करत असताना अन्य धर्मियांच्या धार्मिक भावनांना डिवचण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना शिक्षा करण्याचे प्रयोजनही संविधानाने केले आहे. कायद्याची अंमलबजावणी करण्याचे दायित्व असणारी पोलीस यंत्रणा हिंदूंच्या धार्मिक भावनांची कदर करणार आहे का?

■ सौ. मोक्षदा घाणेकर
काळाचौकी, मुंबई.

## याला काय परीक्षा म्हणायचं का?

जुन्या अकरावी एस.एस.सी.च्या काळात अर्थात १९७५ पूर्वी परीक्षा म्हटलं की कसून अभ्यास करायला लागायचा , भरपूर वाचन आणि भरपूर लिखाण करायला लागायचं तेव्हा कुठे प्रथम श्रेणीची अपेक्षा करता यायची. परीक्षा म्हटली की उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत फारच कमी असायची. यंदाचा एस.एस.सी.चा निकाल ९६.१० % लागला आहे.त्यामुळे प्रश्न असा पडतो की हल्लीचे विद्यार्थी लय हुशार झालेत? की परीक्षा पद्धती लय सोप्पी झालीय? सदोष झालीय? हुशारी म्हटलं तर तीच हुशारी पुढच्या परीक्षा देताना का दिसून येत नाही? नजीकच्या काळात एखाद्या वर्षी शंभर टक्के निकाल लागला तर आश्चर्य वाटायला नको .तेव्हा मात्र नाचत आनंदाने म्हणू गर्जा महाराष्ट्र माझा ,जय जय महाराष्ट्र माझा.

■ प्रा. सुहास पटवर्धन
सिएटल, अमेरिका.
एम.ए. ( इंग्रजी साहित्य) मुंबई विद्यापीठ

## विनोदाचा बादशहा



कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी
गडचिरोली. ९४२३७१४८८६.

अशोक सराफ हे एक भारतीय विनोदी अभिनेता आहेत, जे मराठी आणि हिंदी चित्रपटांसह दोन्ही भाषांमधील थिएटरमध्ये काम करण्यासाठी ओळखले जातात. सराफ यांना चार फिल्मफेअर मराठी पुरस्कारांसह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांना मराठी चित्रपटसृष्टीतील महानायक- सर्वश्रेष्ठ अभिनेता, अशोक सम्राट किंवा मामा असे संबोधले जाते.

सन २०२३मध्ये त्यांना महाराष्ट्र भूषण हा भारतातील महाराष्ट्र राज्यातील सर्वोच्च नागरी सन्मान मिळाला. सन १९८०च्या दशकाच्या सुरुवातीपासून सराफांना मराठी चित्रपटांमध्ये प्रमुख भूमिका मिळू लागल्या. अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन पिळगावकर आणि महेश कोठारे यांच्या संयोजनाने १९८५पासून मराठी चित्रपटसृष्टीत कॉमेडी चित्रपटांची लाट निर्माण केली जी एक दशकाहून अधिक काळ टिकली.

एक डाव भुताचा-१९८२, धुम धडाका-१९८५, गम्मत जम्मत-१९८७, भुताचा भाऊ-१९८९, बाळाचे बाप ब्रह्मचारी-१९८९, अशी ही बनवा बनवी-१९८८ आणि हे प्रमुख नायक म्हणून त्यांच्या यशस्वी मराठी चित्रपटांमध्ये आहेत. आयत्या घरात घरोबा-१९९१. बॉलीवूडमध्ये त्यांनी करण अर्जुन-१९९५, येस बॉस-१९९७, जोरू का गुलाम-२०००, सिंघम-२०११ इत्यादी आणि डोंट वरी हो जायेगा यासह दोन हिंदी टेलिव्हिजन सिटकॉममध्ये काम केले.

अशोक सराफ यांचा जन्म मुंबई येथे दि.४ जून १९४७ रोजी झाला. ते दक्षिण मुंबईच्या चिखलवाडी परिसरात लहानाचे मोठे झाले आणि शिक्षणासाठी डीजीटी विद्यालयात गेले. ज्येष्ठ अभिनेते अशोक कुमार यांच्या नावावरून त्यांचे नाव अशोक ठेवण्यात आले. त्यांचे बालपण दक्षिण मुंबईतील चिखलवाडी येथे गेले.

त्यांचे शालेय शिक्षण डीजीटी विद्यालय मुंबई येथे पूर्ण झाले. सन १९९०मध्ये त्यांचा विवाह अभिनेत्री निवेदिता जोशी यांच्याशी झाला. त्यांनी गोव्यातील मंगुशी मंदिरात लग्न केले, जेथे सराफचे कुटुंब मूळचे आहे.

त्यांना अनिकेत सराफ नावाचा मुलगा आहे जो एक आचारी आहे. अशोक सराफ सन १९६९पासून चित्रपट आणि दूरचित्रवाणी उद्योगात कार्यरत आहेत. त्यांनी २५० हून अधिक मराठी चित्रपटांमध्ये काम केले आहे, त्यापैकी १००हून अधिक व्यावसायिकरित्या यशस्वी ठरले आहेत. त्यांनी मुख्यतः कॉमेडी चित्रपटांमध्ये काम केले आहे. सन १९६९मध्ये जानकी या मराठी चित्रपटातून त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली.

त्यानंतर त्यांनी दोनी घरचा पाहुणा, जवळ ये लावू नको, तुमचा आमचा जमला, चिमणराव गुंड्याभाऊ, डीड शहाणे, हळदी कुंकू, दुनिया करी सलाम आणि इतर चित्रपटांमध्ये भूमिका केल्या. सन १९७० आणि १९८० चे दशकात लक्ष्मीकांत बेर्डे, सचिन आणि महेश कोठारे यांच्यासोबत त्यांनी मराठी चित्रपटांमध्ये काम करत राहिले. अशी ही बनवा बनवी, आयत्या घरात घरोबा, बाळाचे बाप ब्रह्मचारी, भुताचा भाऊ आणि धुम धडाका हे काही उल्लेखनीय मराठी चित्रपट आहेत ज्यात त्यांनी अभिनय केला आहे.

अशोक सराफ यांनी विविध मराठी नाटके आणि हिंदी मालिकांमध्येही काम केले आहे. त्यानंतर त्यांनी अनिकेत टेलिफिल्म्स हे स्वतःचे प्रोडक्शन हाऊस विकसित केले, जे त्यांची पत्नी निवेदिता जोशी-सराफ हाताळते.

त्यांनी १९८० मध्ये अभिनेता लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासोबत अशी ही बनवा बनवी, बाळाचे बाप ब्रह्मचारी असे अनेक हिट कॉमेडी जॉनर चित्रपट केले. मराठी चित्रपटसृष्टीतील आणखी एक विनोदी अभिनेता लक्ष्मीकांत बेर्डे यांच्यासोबतची जोडी यशस्वी झाली, ज्यांनी अनेक हिंदी चित्रपटांमध्येही भूमिका केल्या आहेत. सराफ यांच्यासोबत बेर्डे आणि सचिन पिळगावकर यांनी अनेक मराठी चित्रपटांमध्ये काम केले.

त्यांनी अशी ही बनवा बनवी मध्ये मराठी चित्रपटसृष्टीतील दोन सुपरस्टार सचिन पिळगावकर आणि लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या प्रमुख भूमिकेत मोठ्या यशाची चव चाखली. हा चित्रपट चांगलाच हिट ठरला होता. अशोक सराफ यांनी बॉलिवूडमध्ये महत्त्वाच्या भूमिका केल्या. सिंघम, प्यार किया तो डरना क्या, गुप्त, कोयला, येस बॉस, जोरू का गुलाम आणि करण अर्जुन या चित्रपटांतील काही भूमिका लक्षात राहतात.

अशोक मामांनी ये छोटी बड़ी बातें आणि हम पांच-आनंद माथूरच्या भूमिकेत सारख्या मालिका यशस्वी ठरल्या. टेलिव्हिजन मालिकांमध्ये देखील काम केले आहे. त्यांचा डोंट वरी हो जायेगा हा कॉमेडी शो होता, जो १९९०च्या दशकात सहारा टीव्हीवर प्रसारित झाला होता. सराफ यांनी त्यांच्या कारकिर्दीत मराठी नाटकांमध्ये अनेक भूमिका साकारल्या आहेत.

हमीदाबाईची कोठी, अनाधिकृत, मनोमिलन, हे राम कार्डिओग्राम, डार्लिंग डार्लिंग, सारखा चाटित दुखते, लगीनघाई, व्हॅक्यूम क्लीनर ही काही महत्त्वाची नाटके आहेत. सन २०१२मध्ये तळेगावजवळ मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर एका मोठ्या कार अपघातात सराफ बचावले होते. विनोदाच्या बादशहाला शुभेच्छा!

■ ■



## यकृताचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी या ड्रिंक्सचे सेवन ठरेल फायदेशीर

दरवर्षी अंदाजे २० लाख लोक यकृताशी संबंधित आजारांमुळे मरतात. याचा अर्थ जगभरातील एकूण मृत्यूपैकी सुमारे ४ टक्के मृत्यू यकृतामुळे होतात. यकृत निरोगी ठेवण्यात आहाराची खूप महत्त्वाची भूमिका असते.

यकृत हा शरीरातील सर्वात मोठा अंतर्गत अवयव आहे आणि तो ५०० हून अधिक कार्ये करतो. ते प्रथिने पचवणे, खनिजे साठवणे, पित्त तयार करणे आणि रक्त फिल्टर करणे अशी कार्ये करते. ते अल्कोहोल आणि ड्रग्ज सारख्या विषारी पदार्थांचे विघटन आणि चयापचय देखील करते. म्हणून, चांगल्या आरोग्यासाठी आणि तंदुरुस्तीसाठी यकृत निरोगी ठेवणे महत्वाचे आहे.

**कॉफी :** जर तुम्ही मर्यादित प्रमाणात कॉफी प्यायली तर ते तुमचे यकृत निरोगी ठेवेल. नियमितपणे कॉफी पिल्याने नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज आणि लिव्हर फायब्रोसिस सारख्या आजारांचा धोका कमी होतो. जळजळ कमी करते आणि यकृताच्या पेशींचे संरक्षण करते.

**ग्रीन टी :** यकृताचे आजार रोखण्यासाठी ग्रीन टी प्रभावी आहे. त्यात EGCG सारखे कॅटेचिन असतात जे यकृतासाठी फायदेशीर असतात. ग्रीन टी शरीरातील चरबीच्या हालचाली नियंत्रित करते, ज्यामुळे यकृतामध्ये चरबी जमा होण्यास प्रतिबंध होतो. ग्रीन टीमध्ये असलेले पॉलीफेनॉलिक अँटीऑक्सिडंट्स यकृतासाठी खूप फायदेशीर असतात. दररोज एक ते दोन कप ग्रीन टी पिणे फायदेशीर ठरू शकते.

**बीटचा रस :** बीटचा रस यकृतासाठी एक नैसर्गिक औषध मानला जाऊ शकतो. त्यात नायट्रेट्स आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात, जे जळजळ कमी करतात आणि शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करतात. आठवड्यातून एकदा किंवा दोनदा बीटरूटचे गोळे घेणे फायदेशीर ठरू शकते, परंतु ते मर्यादित प्रमाणात घेणे महत्वाचे आहे.

**चहा :** चहा पिऊनही यकृताची काळजी घेता येते. दूध आणि साखर घालून बनवलेला चहा फायदेशीर असतो. चहाच्या सेवनाने यकृतातील चरबी जमा होणे आणि जळजळ कमी होते. हे ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करते आणि आतड्यांचे आरोग्य देखील सुधारते.

■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### पर्यावरण दिन

कोटी वृक्ष लागवड
रेकॉर्डवर झाली
स्पॉटवर जाऊन पहा
झाडे बरं कुठं गेली ?

कमी लावा झाडे
पण संगोपण करा निट
आंधळं दळतयं अन्
कुत्रं खातयं पिठ ..

जेवढं महत्वाचं वृक्षारोपण
तेवढचं महत्वाचं संगोपण
त्याशिवाय कसं शक्य होणार
पर्यावरणांच संतुलन ..

## अविवा इंडियाकडून आर्थिक वर्ष २५ च्या उत्तम निकालांची घोषणा, शाश्वत विकासावर लक्ष केंद्रित

**मुंबई, ४ जून :** अविवा इंडियाने आपल्या आर्थिक वर्ष २५ साठी आर्थिक निकालांची घोषणा केली असून स्थिर प्रगती व शाश्वत वाढीवर लक्ष केंद्रित केल्याचे यातून दिसते. या वर्षात फक्त संख्यात्मक प्रगतीवर भर दिला गेला नाही तर व्याप्ती खोलवर रूजवण्यावर भर देण्यात आला. प्रत्येक निर्णय एका उद्देशाने घेतला गेला. प्रत्येक निष्कर्ष दीर्घकालीन मूल्याशी जोडला गेला होता. आर्थिक वर्ष २४ मध्ये रचलेल्या पायावर उभारणी करताना अविवाने अधिक स्मार्ट उत्पादने, उत्तम अंमलबजावणी आणि भारतभरातील ग्राहकांसोबत सखोल भावनिक संपर्क यांच्याद्वारे पाया मजबूत केला आहे.

अविवाचा ग्रॉस रिटन प्रीमियम १३०७ कोटी रूपये इतका स्थिर होता आणि त्यांनी वितरणकेंद्रित मॉडेलऐवजी अधिक उत्पादनकेंद्रित आणि ग्राहककेंद्रित दृष्टिकोनाकडे वाटचाल केली. तो सातत्य, विनाप्रतिबंध वाढ आणि कार्यान्वयन कार्यक्षमतांवर आधारित होता. हे परिवर्तन सुधारित क्लेम सेटलमेंट अनुभवांमध्ये प्रतिबिंबित झाले असून प्रति १०,००० पॉलिसींमागे तक्रारींमध्ये घट आणि आरोग्य आणि कल्याण उपक्रमांचे परिणाम वाढल्याचे दिसले आहे.

अविवा इंडियाने ३० दिवसांच्या आत १००% क्लेम सेटलमेंटमध्ये सर्वांत कमी कालावधीची नोंद केली आहे. आणि ९९.२५% क्लेम सेटल करून उद्योगात सर्वोत्तम कामगिरी केल्याचे दिसते. कंपनीने आर्थिक वर्ष २४ मध्ये २० वरून आर्थिक वर्ष २५ मध्ये १६ पर्यंत दर १०,००० पॉलिसींमागे तक्रारींमध्ये घट नोंदवली आहे. त्यातून वितरण आणि क्लेमच्या अनुभवातील प्रगती दर्शवते.

उत्पादन पोर्टफोलिओमधील आमचा वाढता वाटा, सुधारित ऑपरेशनल रेशो आणि नवनवीन उपक्रमांबाबतचा दृष्टिकोन आम्हाला भविष्यासाठी सक्षम बनवतात. आमच्यासाठी सर्वाधिक उत्साहवर्धक गोष्ट म्हणजे पुढचा प्रवास जिथे विमा प्रत्येक भारतीय कुटुंबासाठी अधिक समावेशक, सुसंगत आणि सुलभ बनतो. कमी दरातील ऑफरसह विशिष्ट जीवन टप्प्यांसाठी आणि आरोग्याच्या स्थितीनुसार तयार केलेल्या आगामी अनावरणासह आम्ही लोकांच्या जीवनात विम्याच्या भूमिकेची नव्याने कल्पना करत आहोत. या दृष्टिकोनाचा एक भाग म्हणून आमचे आरोग्य आणि कल्याण उपक्रम जसे प्रिव्हेंटिव्ह वेलनेस पॅकेज, ग्राहकांना त्यांच्या कल्याणाची जबाबदारी घेण्यास सक्षम करत आहेत. विमा केवळ प्रतिबंधात्मक नाही तर सक्रिय जीवन जगण्यासाठी आहे असे आम्हाला वाटते, रथ पुढे म्हणाले.

## आम्हाला पडद्यावर पाहताना हे स्पष्ट होते की उत्तम केमिस्ट्रीसाठी वयाचे बंधन नसते : आशी सिंह



**मुंबई, ४ जून :** उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेच्या केंद्रस्थानी एक ताजी टवटवीत गोष्ट आहे, जिचे नायक–नायिका आहेत युग सिन्हा (शब्बीर अहलुवालिया) आणि कैरी (आशी सिंह). ही एक अनपेक्षित जोडी आहे. कारण या दोन्ही अभिनेत्यांमध्ये जवळजवळ २० वर्षांचे अंतर आहे. पण हे अंतर लपविण्याचा प्रयत्न करण्याऐवजी या मालिकेने हा फरक खेळकरपणे स्वीकारला आहे. ९ जूनपासून सुरू होत असलेल्या या मालिकेच्या कथेचा तो मुख्य भाग आहे. यामधून एक असे कथानक उमलणार आहे, जे खरेखुरे वाटेल, त्यात विविध स्तर असतील आणि एक प्रसन्न वेगळेपण असेल.

नायक आणि नायिका साकारणाऱ्या अभिनेत्यांची केमिस्ट्री ज्या सहजतेने फुलली आहे, ते पाहता मालिकेतील अभिनेत्यांची निवड योग्यच आहे असे म्हणावे लागेल. ते दोघे ज्या युग आणि कैरीच्या व्यक्तिरेखा साकारत आहेत, त्या साचेबद्ध, पारंपरिक नाहीत. त्या दोघांच्या नात्यात देखील एक विरोध, गुंतागुंत आणि नाजुकपणा आहे. त्यामुळे प्रेक्षकांना ही गोष्ट लगेच आवडेल असे वाटते.

पडद्याच्या मागे त्या दोघांमध्ये एकमेकांविषयी जो आदर आहे, त्यांच्या वागण्यात जो मोकळेपणा आहे, तोच पडद्यावर प्रतिबिंबित होतो आणि त्यामुळे ते नाते सहज आणि विश्वसनीय वाटते. त्या दोघांमध्ये जवळजवळ एक पिढीचे अंतर असून देखील आशी आणि शब्बीर यांचे सूर चांगले जुळले आहेत. यावरून पुन्हा हेच सिद्ध होते की, अस्सल नात्यासाठी वयाचे बंधन नसते. अभिनयातील प्रामाणिकपणाच सर्वात महत्त्वाचा असतो.

कैरी शर्माची भूमिका करणारी आशी सिंह म्हणते, शब्बीरचे आणि माझे पडद्यावरचे नाते हे सिद्ध करते की उत्तम केमिस्ट्रीसाठी वयाचे बंधन असत नाही. मी लहानपणी त्याला टेलिव्हिजनवर काम करताना पाहिले आहे. मी सुरुवातीपासून त्याची चाहती आहे, केवळ त्याच्या भूमिकांमुळे नाही, तर प्रत्येक भूमिकेत तो ज्या प्रकारे एक गहिरेपण आणि मान आणतो, ते मला कौतुकास्पद वाटते. आता त्याच्यासोबत काम करणे आणि त्याची नायिका होणे हे माझ्यासाठी स्वप्नवत आहे. माझ्या कारकिर्दीत इतक्या सुरुवातीलाच हे शक्य होईल असे मला वाटले नव्हते. तो खूपच साधा आहे, त्याला आपुलकी आणि त्यामुळे त्याच्या सोबत काम करताना मोकळेपणा वाटतो, प्रेरणा मिळते. त्याला फक्त सेटवर बघूनही बरेच काही शिकण्यासारखे आहे. त्याचे टायमिंग, त्याची उपस्थिती आणि कॅमेऱ्याच्या समोर त्याच्यात जी सहजता असते, ती शिकण्यासारखी आहे. टेलिव्हिजन विश्वात नुकत्याच प्रवेश करणाऱ्या तरुण अभिनेत्यासाठी अशा प्रकारचा अनुभव मिळणे हे एक वरदान आहे.

## कलाकारांनी यंदा जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सांगितल्या त्यांच्या पर्यावरणपूरक सवयींबाबत!

**मुंबई, ४ जून :** जागतिक पर्यावरण दिन आपल्या सर्वांना थांबून, विचार करून उत्तम सवयी अंगिकारण्याची आठवण करून देतो, ज्या पर्यावरण उत्तम ठेवण्यास योगदान देतात. मनोरंजन क्षेत्रातील कलाकार असते तरी अनेक कलाकार पडद्यामागे देखील शाश्वततेचे पालन करतात. पुनर्वापर होणाऱ्या पर्यायांची निवड करण्यापासून सेटवर हिरवळ निर्माण करण्यापर्यंत एण्ड टीव्ही कलाकार पर्यावरणावरील परिणाम कमी करण्यासाठी जागरूकतेने प्रयत्न करत आहेत. हे कलाकार आहेत हिमानी शिवपुरी (मालिका 'हप्पू की उलटन पलटन' मधील कटोरी अम्मा) आणि शुभांगी अत्रे (मालिका 'भाबीजी घर पर है' मधील अंगूरी भाबी). कटोरी अम्मा म्हणून प्रसिद्ध असलेल्या हिमानी शिवपुरी म्हणाल्या, ''मी फक्त घरामध्ये पर्यावरणाची काळजी घेण्याला प्राधान्य देत नाही, तर सेटसह जेथे जाते तेथे पर्यावरणाची काळजी घेते. सेटवर असो, माझ्या व्हॅनिटी व्हॅनमध्ये असो किंवा सार्वजनिक ठिकाणी असो मी वापरात नसताना लाइट्स व पंखे बंद ठेवते. ही लहानशी सवय आहे, पण अधिकाधिक व्यक्तींनी जागरूकपणे ही सवय अंगिकारली तर आपण एकत्रित ऊर्जा संवर्धनप्रती अर्थपूर्ण बदल घडवून आणू शकतो. मी नेहमी माझ्यासोबत कापडाची किंवा तागाची पिशवी ठेवते. तुमच्यापैकी अनेकांना माहित असेल की मला प्राणी खूप आवडतात. सेटवर, मी भटक्या कुत्र्यांना खाऊ घालते आणि पक्ष्यांसाठी बाहेर पाणी व धान्य ठेवते. मी जुन्या ट्रेला पाणी व फूडच्या भांड्यांमध्ये देखील बदलले आहे, जे मी माझ्या रूमच्या बाहेर ठेवते, ज्यामधून विशेषत: उन्हाळ्यामध्ये पक्ष्यांना प्यायला पाणी मिळते; मी डिस्पोजेबल ऐवजी पुनर्वापर होणाऱ्या स्टील प्लेट्सचा वापर करत आमच्या सेटजवळील भटक्या कुत्र्यांना खाऊ घालते. निसर्गाचे सान्निध्य असलेल्या उत्तराखंडमध्ये लहानाची मोठी झाले असल्याने मला पर्यावरणाबाबत खूप आदर व प्रेम आहे. माझा विश्वास आहे की, संगोपनाने मला या थोर कार्याप्रती जागरूक केले असून त्याच्याशी जुळवून घेतले आहे. माझे अनेक सह–कलाकार देखील यामध्ये तितकाच पुढाकार घेत असल्याचे पाहून खूप आनंद होतो. मी खात्रीलायक पर्यावरणपूरक कृती करताना पाहते तेव्हा ती संकल्पना माझ्या जीवनशैलीमध्ये समाविष्ट करण्यास प्रेरित होते.

## पिरामल फायनान्सचा पारख आता महाराष्ट्रातील प्रेक्षकांसाठी जिओ हॉटस्टार आणि सन एनएक्सटी या ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर उपलब्ध

**पुणे, ५ जून :** पारख या मालिकेत वास्तवाधारित आणि प्रेरणादायी कथा आहेत ज्यात ग्राहक त्यांच्या आर्थिक अडचणींवर मात करताना दिसतात. या मालिकेमुळे पिरामल फायनान्सचा आर्थिक समावेश आणि भारतातील व्यक्ती व लघु व्यवसायांना सक्षम करण्याचा संकल्प अधोरेखित होतो. आर्थिक जागरूकता सामान्य लोकांपर्यंत पोहोचावी यासाठी पिरामल फायनान्सने ही अनोखी मालिका तयार केली आहे. ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर पारख लाँच करून, पिरामल फायनान्सने महाराष्ट्र आणि अन्य भागांतील अधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याचा उद्देश ठेवला आहे, जेणेकरून प्रेक्षकांना वेळेप्रमाणे व सोयीने ही मालिका पाहता येईल.

हम कागज़ से ज़्यादा नीयत देखते हैं या विश्वासावर आधारित पारख ही मालिका अशा व्यक्तींच्या प्रेरणादायी आर्थिक प्रवासांची कहाणी सांगते, ज्यांनी योग्य मार्गदर्शनाने आपले आयुष्य बदलले. ओटीटी प्लॅटफॉर्मवर लाँच झाल्याने ही मालिका महाराष्ट्रातील मोठ्या प्रेक्षकवर्गापर्यंत पोहोचेल, जिथे पिरामल फायनान्सने आधीपासूनच मजबूत संबंध प्रस्थापित केले आहेत.

या डॉक्युसीरीजमधील एक भाग महाराष्ट्रातील बलिराम पारदे यांच्या प्रवासावर आधारित आहे. त्यांची आर्थिक वाटचाल पिरामल फायनान्सच्या सहानुभूतीपूर्वक दृष्टिकोनामुळे शक्य झाली. त्यांच्या कथेमधून, आर्थिक मदत मिळवताना सामान्य माणसाला येणाऱ्या अडचणी आणि माणूस केंद्रित दृष्टिकोन कसा प्रभावी ठरतो, हे अधोरेखित होते.

पारख सध्या जिओ हॉटस्टार आणि सन एनएक्सटी या ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर लाइव्ह आहे. ही मालिका अधिक व्यापक प्रेक्षकांपर्यंत पोहोचत आहे आणि आर्थिक समावेशाचा संदेश अधिक बळकट करत आहे.

पिरामल फायनान्सचे मार्केटिंग प्रमुख अरविंद अय्यर म्हणाले, पारख ही केवळ मालिका नाही, तर ती आमच्या ग्राहकांना समजून घेण्याच्या व त्यांच्याशी अधिक खोलवर संबंध प्रस्थापित करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे. यात आम्ही त्यांच्या कागदपत्रांपलीकडे पाहतो त्यांची खरी नीयत आणि स्वप्न ओळखतो. या कथांमधून असे खरे लोक दिसतात जे संकटांवर मात करून आर्थिक सशक्ततेच्या दिशेने पहिले पाऊल उचलतात आणि आपली स्वप्ने साकार करतात.



ते पुढे म्हणाले, पारख जिओ हॉटस्टार आणि सन एनएक्सटी वर लाँच झाल्यामुळे ही प्रेरणादायी मालिका आता महाराष्ट्रासारख्या टियर २ आणि टियर ३ मार्केट्समध्येही मोठ्या संख्येने पाहिली जाईल, जिथे ओटीटी दर्शकवर्ग झपाट्याने वाढत आहे. पारख ही मालिका कर्जवाटपाच्या पारंपरिक कल्पनांना नवा दृष्टिकोन देते इथे व्यवहारांपेक्षा माणसांना सक्षम करण्यावर भर दिला जातो.

## श्रीराम फ़ार्म सोल्युशन्सची नवीन विशेष वनस्पती पोषण आणि पीक संरक्षण उत्पादने बाजारात



**अकोला, ४ जून :** डीसीएम श्रीराम लिमिटेडच्या विभाग असलेल्या श्रीराम फ़ार्म सोल्युशन्स ने त्यांची नव्या युगातील विशेष वनस्पती पोषण उत्पादने लॉन्च केली आहेत.

भारतीय शेतकऱ्यांचा गरजा लक्षात घेता आणि टिकाऊ शेतीय दृष्टीकोनाचा उद्देश्याने, कंपनीने दोन आधुनिक अशी द्रव्य खते श्रीराम पिकासोल आणि श्रीराम मैगनिका सादर केली. पेटंट केलेल्या तंत्रज्ञानाचा माध्यमाने दोन्ही उत्पादने बायोक्टिव टायटॅनियम असलेली भारतातील पहिलीच उत्पादने आहेत. टायटॅनियममुळे वनस्पतीचा पर्यावरणाप्रती असलेला प्रतिकार वाढतो, ज्यामुळे वनस्पतीची आवश्यक पोषण घेण्याची क्षमता सुधारते आणि शेतकऱ्याला चांगले पीक मिळते. श्रीराम पिकासोल चा प्रमुख हेतू हा फ़ळाचा रंग आणि आकाराचा समानतेवर भर देण्याचा आहे तर श्रीराम मैगनिका चा हेतू हा फ़ळातील त्रुटी कमी करून त्याचे आयुष्य वाढविण्याचा आहे– ज्या दोन्ही निर्यात आणि प्रिमियम बाजारपेठांमधील कठीण अशा समस्या आहेत.

.द्राक्ष आणि डाळिंबा सारख्या, या भागातील विशेष पिकांकरिता, कंपनीने स्वत: संशोधन करून विकसित केलेल्या फ़र्टिगेशन उपाययोजना या प्रिमियम आणि निर्यात केल्या जाणाऱ्या द्राक्ष आणि डाळिंबासाठी आहेत, श्रीराम ड्रिपिट ग्रेप्स तसेच श्रीराम ड्रिपिट पोम ची निर्मीती ही शेतकरी समूदायामध्ये एक विशेष आकर्षण ठरले आहे. तणाचा व्यवस्थापनाकरिता आणि किटकनाशकांचा उत्पादनामधील संख्या वाढाव्या म्हणून, कंपनीने श्रीराम एकराईटर' नामक उत्पादन सादर केले आहे जे एक विशेश असे तणनाशक असून त्याची निर्मीती ही मका आणि ऊसामधील त्रासदायक अशा तणाचा नाश करण्याकरिता करण्यात आलेली आहे.कंपनीने श्रीराम ९७०१ कॉर्न आणि श्रीराम ७२११ – बीटी कॉटन सीड उच्च प्रगतीशील अशा हायब्रिड वैरायटी देखील सादर केल्या आहेत.

समूहाचे कार्यकारी संचालक आणि व्यवसायिक प्रमुख असलेले श्री. संजय छाब्रा यावेळी म्हणाले, श्रीराम फ़ार्म सोल्युशन्स हा शेतीय कल्पकतेमध्ये स्वत:ला अधिकाधिक सक्षम बनवत असताना, या नव्या युगाची उत्पादने कंपनीची विज्ञानावर उपाय योजना देऊन शेतकऱ्यांना सबळबनविण्याची बांधिलकी दर्शवून देतात, ही उत्पादने त्यांचा वाढत्या गरजा आणि टिकाऊ शेतीय सवयींसंदर्भातील गरजा देखील भागवतात.

## 'नमक हो टाटा का... टाटा नमक' या सदाबहार जिंगलसोबत भारताच्या ह्दयाची पुन्हा एकदा धडधड!

**मुंबई, ४ जून :** मागील वर्षीच्या नमक हो टाटा का... टाटा नमक या जाहिरातीला ग्राहकांकडून लाभलेला प्रचंड प्रतिसाद पाहता, भारतातील पहिल्या क्रमांकाचा आयोडीनयुक्त मिठाचा ब्रँड असलेल्या टाटा सॉल्टने पुन्हा नव्या जोमात हजेरी लावली आहे. ही जाहिरात आता २.० रूपात सादर होत असून, घराघरांशी निर्माण झालेल्या भावनिक नात्याला पुढे नेण्याचा प्रयत्न या माध्यमातून टाटा सॉल्टने केला आहे.

जाहिरातींच्या या नव्या मालिकेत आठ ह्दयस्पर्शी आणि मजेदार ब्रँड फिल्म्स आहेत. टाटा सॉल्टच्या गाजलेल्या जिंगलला त्या नव्या अर्थाने उजाळा देतात आणि एक महत्त्वाचा संदेश देतात, की योग्य प्रमाणातील आयोडीनयुक्त टाटा मीठ मुलांच्या मानसिक विकासाला हातभार लावते आणि भविष्यातील तेजस्वी पिढी घडवते. 'देश का नमक' हे आपले स्थान अधिक बळकट करत, ही जाहिरात मालिका टाटा सॉल्टबद्दलचा विश्वास, त्याची उपयुक्तता आणि ग्राहकांशी असलेल्या नात्याचा उत्सव संगीतात्मक व प्रभावी पद्धतीने साजरा करते.

टाटा कंझ्युमर प्रॉडक्ट्सच्या पॅकेज्ड फूड्स विभागाच्या प्रमुख दीपिका भान म्हणाल्या, ही जाहिरात मोहीम गेल्या वर्षीच्या यशस्वी जाहिरातपटांची सुंदर व नैसर्गिक अशी पुढची पायरी आहे. देश का नमक ही केवळ एक भावना नाही, तर ती गुणवत्तेवर, प्रामाणिकपणावर आणि चार दशकांपासून टिकून असलेल्या विश्वासावर आधारित असलेली कटिबद्धता आहे. ही जाहिरात मोहीम आमचा ग्राहकांशी असलेला बंध अधिक दृढ करेल आणि प्रत्येक घरात आनंद व विश्वासाचे मूल्य अधोरेखित करेल.

ओगिलव्ही कंपनीचे मुंबई व कोलकाता येथील चीफ क्रिएटिव्ह ऑफिसर अनुराग अग्निहोत्री म्हणाले, टाटा सॉल्ट आयोडीनद्वारे मुलांच्या मेंदूच्या विकासाबाबत आम्हाला जनजागृती करायची होती. मुलांच्या मानसिक विकासासारख्या महत्त्वपूर्ण बाबीकडे कोणी दुर्लक्ष करूच शकणार नाही, अशी मांडणी कशी करावी, हा आमच्यापुढील प्रश्न होता. म्हणून मग आम्ही च्या दशकातील जिंगलची जादू वापरली. आयोडीनचा संदेश या ८०च्या दशकातील सुरांत गुंफून, तो आपल्या रोजच्या जीवनात नववधूला निरोप देण्यापासून शाळेतील वर्गापर्यंत प्रत्येक ठिकाणी पोहोचवला. ही जाहिरात मोहीम म्हणजे त्या सुवर्णयुगाला अर्पण केलेले, आजच्या भारतासाठी नव्याने साकारलेले एक प्रेमपत्र आहे.

## एचडीएफसी बँक परिवर्तनने जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने प्लास्टिकच्या विरोधात जागरूकता मोहीम सुरू

**मुंबई, ४ जून :** ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून एचडीएफसी बँकेने प्लास्टिकच्या डोळस वापरासाठी एका जागरूकता मोहिमेची सुरुवात करून पर्यावरणविषयक जबाबदारीबाबतची आपली वचनबद्धता अधिक दृढ केली आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून ही बँक आपले ग्राहक, कर्मचारी आणि सामान्य जनतेसाठी जागरूकता मोहीम राबवत आहे.

एचडीएफसी बँकेच्या परिवर्तन या सीएसआर प्रोग्राम अंतर्गत चालवण्यात येणारी ही मोहीम आपल्या निवडक शाखेच्या ग्राहकांना त्यांच्याकडील प्लास्टिक ई–कचरा त्यांच्या शाखेत रिसायकलिंगसाठी गोळा करण्याचे आणि त्यांच्या मूलभूत गरजांसाठी प्लास्टिकचे पर्याय वापरण्यासाठी आवाहन करणार आहे. शिवाय, बँक आपल्या कर्मचाऱ्यांच्या नेतृत्वाखाली जागरूकता सत्रे, संकलन उपक्रम आणि स्वच्छता अभियान आयोजित करेल आणि प्लास्टिकचा उपयोग कमी करण्यासाठी संघटित होऊन काम करण्यासाठी प्रोत्साहन देईल.

बँकेने पर्यावरणावरील प्लास्टिक प्रदूषणाच्या नकारात्मक प्रभावाविषयी जागरूकता वाढवण्यासाठी आणि सोप्या पण प्रभावी पद्धतींचा अवलंब करून आपल्या दैनंदिन जीवनात प्लास्टिकचा उपयोग कमी करण्यासाठी लोकांना ऑनलाइन शपथ घेता यावी यासाठी एक समर्पित वेबपेज देखील सुरू केले आहे. या जागरूकता मोहिमेबरोबरच बँक देशभरातील समुदायाच्या नेतृत्वाखालील आपल्या कचरा व्यवस्थापन कार्यक्रमास देखील पुढे घेऊन जात आहे. परिवर्तनच्या माध्यमातून २०२५ या वर्षात १००० पेक्षा जास्त गावांमध्ये घन कचरा व्यवस्थापन प्रणाली लागू करण्याचे आणि १५ शहरी स्थानिक संस्थांमध्ये सामग्री पुनर्प्राप्ती सुविधा स्थापन करण्याचे बँकेचे ध्येय आहे.

एचडीएफसी बँकेचे डेप्युटी मॅनिजिंग डायरेक्टर श्री. कैझाद भरूचा म्हणाले, एचडीएफसी बँकेत आमचा विश्वास आहे की, अर्थपूर्ण बदल समाजाच्या सहभागानेच घडवता येऊ शकतो. प्लास्टिक जागरूकता मोहिमेसहित आमचे परिवर्तन अंतर्गत जे जे उपक्रम आहेत, ते स्थानिक लोकांच्या मदतीसाठी आणि स्थानिक रहिवाशांच्या सहभागाने चिरस्थायी प्रभाव निर्माण करण्यासाठी आहेत. प्लास्टिक प्रदूषणाविरुद्ध एकत्रितपणे लढा देऊन आम्ही पर्यावरण संरक्षणात तसेच आम्ही ज्या समाजात काम करतो त्या समाजाची सामाजिक आणि आर्थिक बाजू मजबूत करण्यात खारीचा वाटा देत आहोत.

## सध्याच्या काळात 'जागतिक पर्यावरण दिना'चे वाढते महत्त्व

### आपण निसर्गाचा एक भाग आहोत, त्याचे मालक नाही




दरवर्षी ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. हा दिवस केवळ एक औपचारिक दिन किंवा कार्यक्रम नसून, निसर्ग व पर्यावरणाशी असलेल्या आपल्या नात्याची आठवण करून देणारा आणि कृतीस प्रवृत्त करणारा एक जागतिक महोत्सव आहे.

१९७२ साली स्टॉकहोम (स्वीडन) येथे झालेल्या 'मानव पर्यावरण परिषदे'नंतर संयुक्त राष्ट्र संघटनेने ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून जाहीर केला. १९७४ पासून हा दिवस दरवर्षी एका विशिष्ट थीमवर आधारित साजरा होतो.

आजच्या काळात, जेव्हा हवामान बदल, प्रदूषण, जलसंकट, जैवविविधतेचा ऱ्हास आणि नैसर्गिक आपत्ती माणसाच्या अस्तित्वावरच घाला घालत आहेत, तेव्हा जागतिक पर्यावरण दिनाची प्रासंगिकता आणि गरज पूर्वीपेक्षा अनेक पटींनी अधिक झाली आहे.

**पर्यावरणीय संकटे वाढती गडद सावली**

सध्याचा काळ हा मानवी प्रगतीचा उच्चांक मानला जातो, पण याच प्रगतीमुळे आपण निसर्गाच्या नाड्या तोडल्या आहेत. ही संकटे आता केवळ भविष्यातील शक्यता राहिलेली नाहीत, तर आजच आपल्या दारात उभी आहेत.

हवामान बदलाचा परिणाम :

संपूर्ण जगात उष्णतेच्या लाटा, पावसाचे अनियमित स्वरूप, हिमनद्यांचे वितळणे, समुद्राची वाढती पातळी ही लक्षणे स्पष्ट दिसत आहेत. भारततही याचे परिणाम दिसत असून, अत्यंत उष्ण तापमान, अवकाळी पाऊस, दुष्काळ व पूर हे वारंवार अनुभवास येत आहेत.

**वाढते प्रदूषण:**

हवाप्रदूषण : मोठ्या शहरांमध्ये श्वास घेणे कठीण झाले आहे. दिल्ली, मुंबई, कोलकाता यांसारख्या महानगरांमध्ये. हवामान निर्देशांक धोक्याच्या पातळीवर पोहोचतो. जलप्रदूषण : नद्या, तलाव आणि समुद्रांमध्ये टाकण्यात येणारा सांडपाणी आणि रसायनांचा कचरा पिण्याच्या पाण्याला विषारी बनवत आहे. प्लास्टिक प्रदूषण : प्लास्टिकचे विघटन शेकडो वर्षे घेते. हे प्लास्टिक शेवटी जमीनीत, पाण्यात आणि प्राण्यांच्या पचनतंत्रात पोहोचते.

**वनतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास :**

प्रत्येक मिनिटाला जगात एक फुटबॉल मैदानाएवढे जंगल नष्ट होते. यामुळे हजारो प्राणी आणि वनस्पतींचे निवासस्थान नाहीसे होते. भारततही गवताळ प्रदेश, मंग्रोव्हस आणि घनदाट जंगलं झपाट्याने कमी होत आहेत.

**पाण्याची टंचाई :**

जगात अनेक शहरं पाण्याअभावी संकटात आहेत. भारतात अनेक भागांमध्ये भूजल पातळी गंभीर पातळीपर्यंत खाली गेली आहे. डे झिरो (Zero Day जेव्हा शहरात एकही थेंब पाणी उरणार नाही) ही संज्ञा आता अनेक शहरांच्या दारात उभी आहे.

आजच्या काळात जागतिक पर्यावरण दिनाचे वाढते महत्त्व वाढत आहे. जसे सामूहिक जाणीवा निर्माण करणं : जागतिक पर्यावरण दिनाची सर्वात महत्त्वाची भूमिका म्हणजे सामाजिक जनजागृती. सामान्य नागरिकांपासून ते शासनापर्यंत पर्यावरण रक्षणासाठी जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे शाश्वत विकासासाठी प्रेरणा : विकास आणि पर्यावरण यांचा समतोल साधणे ही काळाची गरज आहे. पर्यावरण दिनाच्या निमित्ताने 'शाश्वत विकास' या संकल्पनेला नवे बळ मिळते. युवक आणि शालेय विद्यार्थ्यांमध्ये बदल घडवणं म्हणजे हा दिवस शाळा, महाविद्यालये आणि तरुणाईसाठी सकारात्मक बदलाची सुरुवात करण्याचे एक प्रभावी व्यासपीठ आहे. वृक्षारोपण, प्लास्टिक मुक्त मोहिमा, स्वच्छता अभियान यांचे आयोजन ही कृतीशील दिशा आहे. नीतीनिर्मितीवर परिणाम होत असताना हे व्यासपीठ शासन आणि धोरणकर्त्यांनाही जबाबदारीची जाणीव करून देते. ऊर्जा, पाणी, कचरा व्यवस्थापन यांसारख्या क्षेत्रात पर्यावरणपूरक धोरणे आवश्यक आहेत.

प्रत्येक वर्षी पर्यावरण दिनाची एक विशिष्ट थीम असते. उदाहरणार्थ : २०१८ मध्ये "Beat Plastic Pollution" प्लास्टिक प्रदूषणाविरोधात जगभर मोहीम. तसेच २०२२ मध्ये "Only One Earth" पृथ्वीचे संरक्षण हेच आपले अंतिम ध्येय. २०२३ मध्ये "Solutions to Plastic Pollution" सृजनशील उपायांची गरज. या थीम्समधून पर्यावरणाशी संबंधित विशिष्ट समस्यांवर लक्ष केंद्रित केले जाते आणि जनसामान्यांना कृतीस प्रवृत्त केले जाते.

आज पर्यावरण रक्षण ही केवळ संवेदनशीलतेची बाब नाही, तर अस्तित्वाची गरज बनली आहे. जागतिक पर्यावरण दिन हा फक्त एक दिवस साजरा करण्याचा कार्यक्रम नसून, तो आपल्याला दररोज पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याची आठवण करून देतो. आता वेळ आली आहे कृतीची. त्यासाठी वृक्षारोपण करा, वने वाचवा. प्लास्टिकचा वापर टाळा. वीज, पाणी आणि इंधन यांचा जपून वापर करा. स्थानीय आणि पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर करा. आपण निसर्गाचा एक भाग आहोत, त्याचे मालक नाही. त्याच्याशी जपून वागलो, तर तो आपल्याला उदारतेने सर्व काही देईल.

**डॉ. प्रवीण डबली**
**वरिष्ठ पत्रकार**
**९४२२१२५६५६**

## आज का अंदाज

गुरूवार ५ जून २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५ | ८ | ९ | २ | ४ | ६ | ७ |
| २९० | १२२ | १३४ | १२६ | ११० | ११२ | १५० | १३३ |
| २४५ | २६७ | २३३ | २८९ | २३७ | २६६ | २४० | २२३ |
| ३३५ | ३६६ | ३५० | ४५० | ४८० | ३४७ | ६०० | ३४० |
| १२ | ५१ | ८४ | ९३ | २१ | ४२ | ६३ | ७३ |
| १४ | ५३ | ८५ | ९४ | २५ | ४५ | ६४ | ७४ |
| १८ | ५७ | ८७ | ९८ | २८ | ४८ | ६८ | ७९ |

**५ जून : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | ३२ | ५१ | ७४ |
| १४ | ३६ | ५४ | ७५ |
| १९ | ३९ | ५७ | ७० |

## विजेचे अपघात, सुरक्षा आणि प्रतिबंधात्मक उपाय



आधुनिक युगात वीज आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. तिच्याशिवाय आपल्या दैनंदिन जीवनाची कल्पना करणेही अशक्य आहे. परंतु, हेच वरदान अनेकदा निष्काळजीपणामुळे किंवा अज्ञानामुळे शाप बनू शकते, ज्यामुळे गंभीर अपघात होऊन जीवित व वित्तहानी होते. विजेचे अपघात ही एक गंभीर समस्या आहे, ज्याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

**विजेचे अपघात: एक भयावह वास्तव**

वीज अपघात म्हणजे केवळ शॉक लागणे इतकेच नाही, तर त्यात गंभीर भाजणे, कायमचे अपंगत्व येणे, आणि दुर्दैवाने मृत्यू होणे यांचाही समावेश होतो. अनेकदा शॉर्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीमुळे घरे आणि व्यवसायांचे मोठे नुकसान होते. जुन्या आणि जीर्ण झालेल्या वायरिंगमुळे, विजेच्या उपकरणांची योग्य निगा न राखल्यामुळे, किंवा अनधिकृतपणे वीज वापरल्यामुळे असे अपघात घडण्याची शक्यता वाढते.

**अपघातांची प्रमुख कारणे:**

* जुनी आणि खराब वायरिंग: घरातील किंवा इमारतींमधील जुनी, तुटलेली किंवा निकृष्ट दर्जाची वायरिंग शॉर्ट सर्किटला आमंत्रण देते.
* असुरक्षित विद्युत उपकरणे: लोकल किंवा कमी दर्जाची विद्युत उपकरणे वापरणे, त्यांची नियमित तपासणी न करणे धोकादायक ठरू शकते.
* ओव्हरलोडिंग: एकाच सॉकेटवर अनेक उपकरणे चालवल्याने ओव्हरलोडिंग होते, ज्यामुळे वायर गरम होऊन आग लागू शकते.
* असुरक्षित हाताळणी: ओल्या हातांनी विजेच्या उपकरणांना स्पर्श करणे, उघड्या तारांना हात लावणे हे जीवघेणे ठरू शकते.
* अनधिकृत वीज वापर: वीज चोरीसाठी किंवा अनधिकृत कनेक्शन घेतल्यास सुरक्षा नियमांचे उल्लंघन होते, ज्यामुळे अपघातांचा धोका वाढतो.
* बालकांची निष्काळजीपणा: लहान मुलांना विजेच्या उपकरणांपासून दूर ठेवणे आवश्यक आहे, कारण त्यांच्या नकळतही अपघात होऊ शकतात.
* निसर्गाचा प्रकोप: वादळ, पाऊस, वीज कोसळणे यामुळेही विद्युत खांब कोसळतात किंवा तारा तुटतात, ज्यामुळे अपघात घडतात.

**सुरक्षिततेचे उपाय: प्रतिबंध हेच सर्वोत्तम उपचार**

विजेचे अपघात टाळण्यासाठी काही सोपे आणि महत्त्वाचे उपाय अमलात आणणे अत्यंत आवश्यक आहे:

* नियमित तपासणी: घरातील आणि इमारतींमधील वायरिंगची नियमितपणे प्रमाणित इलेक्ट्रिशियनकडून तपासणी करून घ्यावी. जुनी आणि खराब झालेली वायरिंग त्वरित बदलून घ्यावी.
* दर्जेदार उपकरणे: नेहमी आयएसआय मार्क असलेली आणि चांगल्या दर्जाची विद्युत उपकरणे खरेदी करा. त्यांची नियमितपणे दुरुस्ती करा.
* योग्य वापर: विजेच्या उपकरणांचा वापर करताना त्यांच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करा. एकाच सॉकेटवर जास्त उपकरणे जोडू नका.
* अर्थिंग : घरातील विद्युत प्रणालीला योग्य अर्थिंग असल्याची खात्री करा. अर्थिंगमुळे विजेचा धक्का लागण्याचा धोका कमी होतो.
* ओल्या हातांनी स्पर्श टाळा: ओल्या हातांनी किंवा शरीराने विजेच्या कोणत्याही उपकरणाला किंवा स्विचला स्पर्श करू नका.
* मुलांना दूर ठेवा: लहान मुलांना विजेच्या सॉकेट्स, वायर्स आणि उपकरणांपासून दूर ठेवा. सॉकेट्सला प्लग कव्हर लावा.
* असुरक्षित जोडण्या टाळा: तात्पुरत्या किंवा असुरक्षित विद्युत जोडण्या टाळा. गरज असल्यास प्रमाणित इलेक्ट्रिशियनकडूनच काम करून घ्या.
* घरात अग्निशामक यंत्र ठेवा: विजेमुळे आग लागल्यास त्वरित विझवण्यासाठी घरात अग्निशामक यंत्र असणे आवश्यक आहे.
* वीज कंपनीच्या सूचनांचे पालन: वीज कंपनीकडून दिल्या जाणाऱ्या सुरक्षा सूचनांचे नेहमी पालन करा.
* जबाबदार नागरिक बना: जर तुम्हाला तुटलेल्या तारा किंवा धोकादायक विद्युत खांब दिसल्यास, त्वरित वीज कंपनीला कळवा.

**अपघात घडल्यास काय करावे?**

दुर्दैवाने, अपघात घडल्यास शांत राहून योग्य ती पाऊले उचलणे आवश्यक आहे:

* मुख्य स्विच बंद करा: शक्य असल्यास, त्वरित घरातील किंवा इमारतीतील मुख्य वीज पुरवठा (मेन स्विच) बंद करा.
* संपर्क टाळा: विजेचा धक्का लागलेल्या व्यक्तीला थेट स्पर्श करू नका. लाकडी काठी किंवा प्लास्टिकच्या वस्तूचा वापर करून त्याला विजेच्या स्त्रोतापासून दूर करा.
* वैद्यकीय मदत: त्वरित वैद्यकीय मदतीसाठी कॉल करा.
* अग्निशमन दलाला कळवा: आग लागल्यास त्वरित अग्निशमन दलाला कळवा.

वीज ही आपल्या विकासाची आधारशिला आहे, परंतु तिच्याकडे दुर्लक्ष करणे किंवा तिची हाताळणी निष्काळजीपणे करणे हे अत्यंत धोकादायक ठरू शकते. सुरक्षिततेचे नियम पाळून आणि जागरूक राहूनच आपण विजेमुळे होणारे अपघात टाळू शकतो आणि एक सुरक्षित भविष्य सुनिश्चित करू शकतो. 'खबरदारी हीच सुरक्षितता' हे सूत्र नेहमी लक्षात ठेवा.

**• योगेश विटनकर •**
**उपमुख्य जनसंपर्क अधिकारी,**
**प्रादेशिक संचालक कार्यालय, नागपूर**

## राशीभविष्य

**मेष:** आज आरोग्याशी संबंधित कोणतीही समस्या हलक्यात घेऊ नका. अन्यथा तुमचे आरोग्य आणखी बिघडू शकते.

**वृषभ:** काम शोधत असलेल्या त्यांना नोकरी मिळू शकते. तुमच्या कामाच्या क्षमतेनुसार कामाच्या विस्ताराकडे लक्ष द्या. लोकांच्या बोलण्यात अडकू नका. नवीन काम किंवा व्यवसाय सुरू करू शकता.

**मिथुन:** आज तुम्हाला नको असलेल्या प्रवासाला जावे लागू शकते. प्रवासादरम्यान तुम्हाला अडचणी येतील. उपजीविकेच्या शोधात भटकणाऱ्या लोकांना चांगली बातमी मिळेल.

**कर्क:** विद्यार्थ्यांना अभ्यासात रस वाटेल. सरकारी मदतीने व्यावसायिक कामातील अडथळे दूर होतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या लोकांना त्यांच्या कामाच्या जवळीकतेचा फायदा मिळेल.

**सिंह:** आज तुम्हाला अचानक एक जुना मित्र भेटेल. त्याच्या भेटीने खूप आनंद होईल. प्रेमसंबंधांमधील तणाव दूर होईल. घरी आज पाहुणे येतील. आज व्यवसायात चांगले उत्पन्न मिळण्याचे संकेत आहेत.

**कन्या:** आज व्यवसायात चांगले उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. जमा भांडवलात वाढ होईल. उत्पन्नाचे नवीन स्रोत उघडतील. मालमत्ता खरेदी आणि विक्रीसाठी हा काळ सामान्य: चांगला असेल.

**तुळ:** तुमचे जमा भांडवल वाढेल. आर्थिक क्षेत्रात कठोर परिश्रम केल्याने परिस्थिती सुधारेल. पैसे आणि मालमत्तेचे वाद मिटतील. सरकारी मदतीमुळे व्यवसायात नफा होईल. प्रमोशन मिळण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक:** आज तुम्हाला कामात महत्त्वाचे यश मिळेल. तुमचा एखादा प्रिय मित्र भेटेल. व्यवसायात तुम्हाला नवीन भागीदार मिळतील. प्रेमप्रकरणात जवळीक मिळेल. बेरोजगारांना रोजगार मिळेल.

**धनु:** आज प्रिय व्यक्तीकडून पैसे आणि भेटवस्तू मिळाल्याने आनंद होईल. कौटुंबिक जीवनात परस्पर स्नेह वाढेल. विवाहोत्सुक लोकांना त्यांचा इच्छित जीवनसाथी मिळेल.

**मकर:** घाईघाईत कोणताही मोठा निर्णय घेऊ नका. सामाजिक कार्यात रस वाढेल. तुमच्या कामात सावध रहा. इतरांच्या फसवणुकीत अडकू नका. कामाच्या ठिकाणी नियोजनबद्ध पद्धतीने काम करा.

**कुंभ:** आज आरोग्याशी संबंधित कोणत्याही मोठ्या समस्येची शक्यता कमी असेल. तुमचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी, नियमित व्यायाम करा. कामाच्या ठिकाणी जास्त जोखीम घेऊ नका.

**मीन:** बोलण्यावर नियंत्रण ठेवा. महत्त्वाच्या कामात येणाऱ्या अडथळ्यांवर नियंत्रण राहील. सामाजिक आदर वाढेल. कुटुंबातील सदस्यांकडून सहकार्याचे वर्तन वाढेल. वादग्रस्त गोष्टींमध्ये पडणं टाळा.

# कपाशीच्या 'त्या' बियाणांच्या पाकिटाचा कृत्रिम तुटवडा

■ महासागर प्रतिनिधी,
**अकोट , दि. ४ :** तालुक्यात कापसाच्या बि-बियाणांचाकृत्रिम तुटवडा निर्माण झाला असून, त्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी हतबल झाले आहेत. पसंतीच्या बियाणांची खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना वणवण फिरावे लागणार असल्याची पून्हा तीच परिस्थिती निर्माण होताना दिसत आहे. वळवाच्या पावसाने तालुक्यात पेरणी पूर्व मशागतील सुरुवात झाली. शेत मशागत करून पूर्ण झाल्याने बियाणे, खताची तजवीज करताना शेतकरी दिसत आहे. मागील वर्षी पसंतीच्या बियांसाठी झालेली धडपड पाहता पुन्हा तीच बाब घडू नये म्हणून शेतकरी बियाणांची खरेदीसाठी शहरात दाखल होत आहे. मात्र, यावर्षी पसंतीच्या बियाण्यांच्या बाबत तोच प्रकार घडला असून, बाजारात विशिष्ट कंपनीच्या त्या



दोन बीटी वाणाचा तुटवडा निर्माण झाला. विशेषतः बाजारात शेतकऱ्यांच्या त्यांच पसंतीच्या कापसाचे बी-बियाणे गायब झाल्याचे समजते. अशातच विक्रेत्यांकडे विचारणा केल्यानंतर कापसाच्या बियाणांचे शॉर्टेज असल्याचा दावा केला जात असून, हेच विक्रेते अव्वाच्या सव्वा दराने कापसाचे बियाणे छुप्या मार्गाने ओळखीच्या मंडळींना देवू लागले असल्याचे समजते. कापसाच्या बियाणांची अव्वाच्या सव्वा दराने सर्रास विक्री सुरु झाली. त्यामुळे कापूस उत्पादक हादरले आहे.

### शेतकऱ्यांना जावे लागते शेजारच्या जिल्ह्यात

वास्तविकतः यावर्षी बि-बियाणांसह खतांचा तुटवडा जाणवणार नाही, असे प्रशासनाने सांगितले खरे, परंतु, पावसाने हजेरी लावण्यापूर्वीच बि-बियाण्यांचा तुटवडा निर्माण केला जात असल्याने चिंतेचे वातावरण पसरले आहे. नियोजन नसल्याने दरवर्षी तुटवडा डीएपी खताचा तुटवडा डीएपी या एकमेव खतावर सबसिडी आहे, पण पुरवठा अतिशय कमी आहे. त्यामुळे या खताचा तुटवडा दरवर्षी निर्माण होतो. १ हजार ३५० रुपये प्रति बॅगचा दर काळ्या बाजारात १ हजार ५०० रु ते १ हजार ६०० रुपयेपर्यंत जातो पाऊस पडल्यावर हे भाव अजून वाढतील. शेतकरी बियाणांच्या खरेदी साठी शेजारी जिल्ह्यात अनेक शेतकरी बियाणे खरेदी साठी शेजारी बुलडाणा जिल्ह्यात धाव घेत आहे.पावसाळा सुरू होण्याआधी बियाणे खरेदी करून ठेवण्याला शेतकरी प्राधान्य देताना दिसत आहे. किंमती प्रचंड वाढल्या त्या दोन्ही बीटी कपाशीचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे या दोन्ही बियाण्याचा काळा बाजार होतो आहे.अधिकृत भाव प्रति किलो ९०१ रु आहे, पण काळ्या बाजारात याचा दर १ हजार ४०० रुपये प्रति बॅग तर दुसऱ्याचा दर प्रति बॅग १ हजार रुपये ते १ हजार १०० रुपये असल्याची चर्चा आहे. या वाणचा पेरा ज्या जिल्ह्यात होत नाही, पण तिथे बियाणे मिळते, आशा जिल्ह्यातील गावात शेतकरी बियाणे आणण्यास जातात. त्यामध्ये बुलढाणा, यवतमाळ आदी जिल्ह्यातील गावांचा समावेश आहे.

# बनावट बियाण्याच्या संशयावरून माऊली कृषी सेवा केंद्र सील

■ महासागर प्रतिनिधी,
**वाशीम, दि. ४ :** वाशीम मंगरुळपीर तालुक्यातील शिवणी (द.) येथील माऊली कृषी सेवा केंद्र, प्रोप्रायटर उमेश पंडितराव भेडेकर यांचे दुकान बनावट कापूस बियाण्यांच्या विक्रीच्या संशयावरून जिल्हा कृषी विभागाच्या भरारी पथकाने सील केले. दुकान बंद असल्याने तपासणीला अडथळा आला. प्रोप्रायटरकडून चौकशीला सहकार्य मिळाले नाही. त्यामुळे पथकाकडून ही कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शहा यांच्या मार्गदर्शनाखालील भरारी पथकाने अभिजीत देवगिरकर कृषी विकास अधिकारी यांच्या नेतृत्वात मोहीम अधिकारी गणेश गिरी, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक अरुण इंगळे व पंचायत समिती कृषी अधिकारी संदीप साळवे यांनी सोमवारी २ जून रोजी सकाळी शिवणी (द.) येथे सदर सेवा



केंद्रावर तपासणीसाठी भेट दिली. मात्र, दुकान बंद असल्याचे आढळून आले. प्रोप्रायटर उमेश भेडेकर यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधण्यात आला. परंतु, त्यांनी तपासणी पथकाला उडवाउडवीची उत्तरे दिली व सहकार्य करण्यास नकार दिला.

या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र कापूस बियाणे (नियंत्रण) कायदा, २००९ अंतर्गत कलम ७ नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करून दुपारी २:०० वाजता माऊली कृषी सेवा केंद्र सील करण्यात आले.

ही कारवाई बियाण्यांच्या साठवणुकीत आणि विक्री प्रक्रियेत संभाव्य अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली आहे. तपासणीदरम्यान निबाजी तुकाराम भेडेकर, विनोद लिंबाजी भेडेकर व सतीश पांडुरंग भेडेकर हे साक्षीदार म्हणून उपस्थित होते. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी कृषी सेवा केंद्रांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबवण्याचे आदेश दिले आहेत. त्याचाच भाग म्हणून ही कारवाई झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# मनपा अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कचऱ्याची लावली विल्हेवाट

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती , दि. ४ :** शहराचे सौंदर्यस्थळ म्हणून ख्यात असलेल्या छत्री तलाव परिसरात सोमवारी मनपाच्या वतीने स्वच्छता अभियान राबवण्यात आले. मनपा आयुक्त सचिन कलंत्रे आणि अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख यांच्या नेतृत्वात राबवण्यात आलेल्या या अभियानात ३० अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. सुमारे दीड तास चाललेल्या श्रमदानातून परिसरातील अर्धा ट्रक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली. छत्री तलाव हे अमरावतीकरांसाठी हक्काचे पर्यटन स्थळ आहे. या भागात केवळ अमरावतीकरांसह त्यांच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांनाही फेरफटका मारायला नेले जाते. तलावाच्या अवती-भोवतीसुंदर असा निसर्गरम्य परिसर असल्याने पर्यटकांची या भागाला प्रथम पसंती आहे. स्वाभाविकच या भागात ये-जाक्करणाऱ्यांकडून परिसरात नकळत कचरा टाकला जातो. हा कचरा पर्यटनासाठी आलेल्यांनी सोबत आणलेले खायचे पदार्थ, वेगवेगळ्या वेष्टनात गुंडाळून आणलेले स्नॅक्स, पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, प्लास्टिकच्या कॅरी बॅग आदी प्रकारचा असतो. वस्तूत: पर्यटकांनी असे वागू नये, हे अभिप्रेत आहे. परंतु तरीही या परिसरात कचरा टाकला जातो. असा अर्ध ट्रक कचरा मनपाच्या स्वच्छता दूतांनी सोमवारी दुपारपर्यंत स्वच्छता अभियान राबवून तेथून हटवला. गोळा केलेला कचरा फ्रेजरपुरा स्थित स्मशानभूमीनजीकच्या डम्पिंग ग्राउंडवर नेऊन टाकला. मनपाच्या झोन क्रमांक ३ चे वरिष्ठ स्वास्थ्य निरीक्षक कुंदन हडाले व प्लास्टिक जप्ती मोहिमेचे नोडल अधिकारी विकी जेधे यांनी या मोहिमेचे नेतृत्व केले. या



मोहिमेत स्वास्थ्य निरीक्षक मनीष हडाले, योगेश कंडारे, मनीष नकवाल, धर्मेंद्र डिके, नीलेश तंबोले, संजय माहुरकर, नितीन वाघमारे यांच्यासह ३० हून अधिक स्वच्छता दूतांनी सहभाग नोंदवला.

# घरकुलांसाठी मोफत वाळू वाटपची अंमलबजावणीच नाही

■ महासागर प्रतिनिधी,
**दारव्हा , दि. ४ :** तालुक्यात नव्या वाळू धोरणानुसार शासनाने घरकुल बांधकामासाठी गरजु लाभार्थींना पाच ब्रास वाळू मोफत देण्याची घोषणा केली. मात्र, पावसाळा अगदी तोंडावर येऊन ठेपल्यावरही वाळू उपलब्ध होत नसल्याने शासनाच्या मोफत वाळू धोरणाच्या नुसत्या वावड्या उठत आहे. या धोरणाची अंमलबजावणी न झाल्याळे वाळू अभावी घरकुलाच्या कामात ब्रेक लागला आहे. त्यामुळे पावसाळ्यात उघड्यावर राहण्याची वेळ येणार असल्याचे लाभार्थींकडून बोलले जात आहे. वाळू उपलब्ध करून देण्याची मागणी गरीब गरजू घरकुल लाभार्थींनी तालुका महसुल प्रशासनाकडे केली आहे.



दारव्हा तालुक्यात गरजु घरकुल लाभार्थींना प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना आणि शबरी आवास योजनेंतर्गत तालुक्यात हजारो घरकुल मंजूर झाले आहेत. परंतु या लाभार्थीच्या स्वप्नांचा चुराडा वाळून केला आहे. यात विशेष म्हणजे, चोरट्या मार्गाने सर्वत्र वाळू उपलब्ध होत असली तरी ती अधिकच्या किमतीत रेती घेऊन घरकुल बांधणे आवाक्याबाहेरचे आहे. परिणामी हजारो घरकुलाचे बांधकाम खड्डे खोदून कॉलम उभे केले तर काहींचे फाउंडेशन झाले आहेत. यापुढे वाळू अभावी घरकुलांच्या कामांना ब्रेक लागला आहे. पंचायत समिती स्तरावरुन घरकुल बांधकाम करण्यास लाभार्थीना सततचा तगादा लावत आहे. परंतु, घरकुल बांधायचे तरी कसे असा प्रश्न निर्माण झाला आहे. पहिला हप्ता केवळ १५ हजार रुपये देण्यात येते.

त्यावेळी गज, सिमेंट, गिट्टी आदी साहीत्य उधारीवर घेतले. तेव्हापासून एक रुपयाही मिळाला नाही. अनेक दिवस झाल्याने पुरवठादारांनी पैसे साठी तगादा लावल्याने घरकुल लाभार्थी वाळू व अनुदानामुळे चारही बाजूंनी कचाट्यात सापडले आहे. तालुका महसूल प्रशासनाने तातडीने गरीब गरजू घरकुल लाभार्थीना मोफत पाच ब्रास वाळू उपलब्ध करून देण्याची मागणी घरकुल लाभार्थींनी केली आहे.

# मागणी असलेल्या बियाण्यांचा कृत्रिम तुटवडा

## लूट थांबवण्याची वंचितची मागणी




■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला , दि. ४ :** बियाण्यांमध्ये लिंकिंग (शेतकऱ्यांनी मागणी केलेल्या बियाण्यांसोबत त्यांना आवश्यकता नसतानाही अन्य बियाणे विकत घेण्यास भाग पाडणे) होत असल्याचा प्रकार समोर आल्यानंतर कारवाईसाठी राजकीय पक्ष आक्रमक झाले आहे. शेतकऱ्यांची मागणी असलेल्या (अजित ५ व अजित १५५ ) कपाशीच्या बियाण्यांसह रासायनिक खतांना तुटवडा दाखवून व्यापाऱ्यांकडून होणारी लूट थांबवा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने करत सोमवारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयावर (एसएओ ) धडक दिली. गतवर्षी शेतकऱ्यांना कपाशीचे त्यांच्या पसंतीचे बियाणे मिळवण्याठी प्रचंड संघर्ष करावा लागला होता.

जिल्ह्यात अजित ५ आणि अजित १५५ हे कपाशीचे बियाणे, डीएपी, युरीया खताचा तुटवडा काही व्यापाऱ्यांनी जाणीवपूर्वक निर्माण केला आहे, असे वंचितचे म्हणणे आहे. शेतकऱ्यांना बियाणे व खते भेटत नसल्याने प्रचंड मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे बियाणे, खत किती उपलब्ध आहे व ते उपलब्ध असलेल्या कृषी सेवा केंद्रांची माहिति शेतकरी, प्रसारमाध्यमांसमोर जाहीर करावी; अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा वंचितने दिला.

# आपण निसर्गाचा एक भाग आहोत त्याचे मालक नाही



**वरिष्ठपत्रकार**
डॉ. प्रवीण डबली
९४२२१२५६५६

दरवर्षी ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. हा दिवस केवळ एक औपचारिक दिन किंवा कार्यक्रम नसून, निसर्ग व पर्यावरणाशी असलेल्या आपल्या नात्याची आठवण करून देणारा आणि कृतीस प्रवृत्त करणारा एक जागतिक महोत्सव आहे. १९७२ साली स्टॉकहोम (स्वीडन) येथे झालेल्या 'मानव पर्यावरण परिषदे'नंतर संयुक्त राष्ट्र संघटनेने ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून जाहीर केला. १९७४ पासून हा दिवस दरवर्षी एका विशिष्ट थीमवर आधारित साजरा होतो. आजच्या काळात, जेव्हा हवामान बदल, प्रदूषण, जलसंकट, जैवविविधतेचा ऱ्हास आणि नैसर्गिक आपत्ती माणसाच्या अस्तित्वावरच घाला घालत आहेत, तेव्हा जागतिक पर्यावरण दिनाची प्रासंगिकता आणि गरज पूर्वीपेक्षा अनेक पटींनी अधिक झाली आहे.

**पर्यावरणीय संकटे -वाढती गडद सावली**

सध्याचा काळ हा मानवी प्रगतीचा उच्चांक मानला जातो, पण याच प्रगतीमुळे आपण निसर्गाच्या नाड्या तोडल्या आहेत. ही संकटे आता केवळ भविष्यातील शक्यता राहिलेली नाहीत, तर आजच आपल्या दारात उभी आहेत.

**हवामान बदलाचा परिणाम :**

संपूर्ण जगात उष्णतेच्या लाटा, पावसाचे अनियमित स्वरूप, हिमनद्यांचे वितळणे, समुद्राची वाढती पातळी ही लक्षणे स्पष्ट दिसत आहेत. भारतातही याचे परिणाम दिसत असून, अत्यंत उष्ण तापमान, अवकाळी पाऊस, दुष्काळ व पूर हे वारंवार अनुभवास येत आहेत.

**वाढते प्रदूषण:**

हवाप्रदूषण : मोठ्या शहरांमध्ये श्वास घेणे कठीण झाले आहे. दिल्ली, मुंबई, कोलकाता यांसारख्या महानगरांमध्ये. हवामान निर्देशांक धोक्याच्या पातळीवर पोहोचतो. जलप्रदूषण : नद्या, तलाव आणि समुद्रांमध्ये टाकण्यात येणारा सांडपाणी आणि रसायनांचा कचरा पिण्याच्या पाण्याला विषारी बनवत आहे. प्लास्टिक प्रदूषण : प्लास्टिकचे विघटन शेकडो वर्षे घेते. हे प्लास्टिक शेवटी जमीनीत, पाण्यात आणि प्राण्यांच्या पचनतंत्रात पोहोचते.

**वनतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास :**

प्रत्येक मिनिटाला जगात एक फुटबॉल मैदाना एवढे जंगल नष्ट होते. यामुळे हजारो प्राणी आणि वनस्पतींचे निवासस्थान नाहीसे होते. भारतातही गवताळ प्रदेश, मंग्रोव्हस आणि घनदाट जंगलं झपाट्याने कमी होत आहेत.

**पाण्याची टंचाई :**

जगात अनेक शहरं पाण्याअभावी संकटात आहेत. भारतात अनेक भागांमध्ये भूजल पातळी गंभीर पातळीपर्यंत खाली गेली आहे. 'डे झिरो' (जेव्हा शहरात एकही थेंब पाणी उरणार नाही) ही संज्ञा आता अनेक शहरांच्या दारात उभी आहे. आजच्या काळात जागतिक पर्यावरण दिनाचे वाढते महत्त्व वाढत आहे. जसे सामूहिक जाणीवा निर्माण करणं : जागतिक पर्यावरण दिनाची सर्वात महत्त्वाची भूमिका म्हणजे सामाजिक जनजागृती. सामान्य नागरिकांपासून ते शासनापर्यंत पर्यावरण रक्षणासाठी जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे शाश्वत विकासासाठी प्रेरणा : विकास आणि पर्यावरण यांचा समतोल साधणे ही काळाची गरज आहे. पर्यावरण दिनाच्या निमित्ताने 'शाश्वत विकास' या संकल्पनेला नवे बळ मिळते. युवक आणि शालेय विद्यार्थ्यांमध्ये बदल घडवणं म्हणजे हा दिवस शाळा, महाविद्यालये आणि तरुणाईसाठी सकारात्मक बदलाची सुरुवात करण्याचे एक प्रभावी व्यासपीठ आहे. वृक्षारोपण, प्लास्टिक मुक्त मोहिमा, स्वच्छता अभियान यांचे आयोजन ही कृतीशील दिशा आहे.

नीतीनिर्मितीवर परिणाम होत असताना हे व्यासपीठ शासन आणि धोरणकर्त्यांनाही जबाबदारीची जाणीव करून देते. ऊर्जा, पाणी, कचरा व्यवस्थापन यांसारख्या क्षेत्रात पर्यावरणपूरक धोरणे आवश्यक आहेत. प्रत्येक वर्षी पर्यावरण दिनाची एक विशिष्ट थीम असते. उदाहरणार्थ : २०१८ मध्ये - प्लास्टिक प्रदूषणाविरोधात जगभर मोहीम. तसेच २०२२ मध्ये पृथ्वीचे संरक्षण हेच आपले अंतिम ध्येय.

२०२३ मध्ये -सृजनशील उपायांची गरज. या थीम्समधून पर्यावरणाशी संबंधित विशिष्ट समस्यांवर लक्ष केंद्रित केले जाते आणि जनसामान्यांना कृतीस प्रवृत्त केले जाते. आज पर्यावरण रक्षण ही केवळ संवेदनशीलतेची बाब नाही, तर अस्तित्वाची गरज बनली आहे.

जागतिक पर्यावरण दिन हा फक्त एक दिवस साजरा करण्याचा कार्यक्रम नसून, तो आपल्याला दररोज पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारण्याची आठवण करून देतो. आता वेळ आली आहे कृतीची. त्यासाठी वृक्षारोपण करा, वने वाचवा. प्लास्टिकचा वापर टाळा. वीज, पाणी आणि इंधन यांचा जपून वापर करा.

स्थानीय आणि पर्यावरणपूरक वस्तूंचा वापर करा. आपण निसर्गाचा एक भाग आहोत, त्याचे मालक नाही. त्याच्याशी जपून वागलो, तर तो आपल्याला उदारतेने सर्व काही देईल.'

# श्री संत गजानन महाराज पालखीचे बाळापूर तालुक्यात स्वागत



■ महासागर प्रतिनिधी,
**अकोला , दि. ४ :** शेगावीचा राणा पंढरीला निघाला...'श्री गजानन -जयगजानन, गण गण गणात बोते'चा जयघोष करत पारंपरिक बँड, टाळ मृदंगांच्या गजरात आषाढी एकादशीनिमित्त संत श्री गजानन महाराज पालखीचे सोमवारी शेगाव येथून अकोला जिल्ह्यात आगमन झाले. शेगावीचा राणा पंढरीला निघाला... वेशीपर्यंत भक्तीचा सागर लोटला, असे भाव जागृत करणारे दृश्य ही पायी वारी मार्गस्थ होताना दिसून आले. शेगाव येथील वेशीपासून नागझरीपर्यंत प्रचंड गर्दी होती. त्यानंतर अकोला जिल्ह्यातील वेशीवर भक्तांनी या पायी वारीचे स्वागत करत श्रींच्या पालखीचे दर्शन घेतले. 'गण गण गणांत बोते' च्या जयघोषाने कसुरा, मनारखेड, पारस परिसर दुमदुमून गेला. आषाढी वारी पंढरपूरसाठी श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे २ जून रोजी सकाळी शेगाव मंदिर येथून प्रस्थान झाले. श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे हजारो भाविक भक्तिमय वातावरणात दर्शन घेत होते. मार्गावर रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. शिस्तबद्ध पद्धतीने पावली करत वारकरी माऊलीच्या भक्तीत दंग झाल्याचे दिसून आले. पालखी सोहळ्याचे बाळापूर तालुक्यात अनेक ठिकाणी स्वागत करत भाविकांनी श्रद्धेने उत्साहाने दर्शन घेतले. जिल्ह्यात ३७. ८ अंश तापमान असतानाही श्रींच्या दर्शनासाठी व डोळ्याचे पारणे फेडणारी पायी वारी डोळ्यात साठवण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा भाविकांनी मोठी गर्दी केल्याचे दिसून आले. संत गजानन महाराज यांच्या रजत मुखवट्याचे महिला व पुरुषांनी पूजन केले. तसेच पुष्पहार अर्पण करून दर्शन घेतले. पालखीत सहभागी वारकरी व भाविकांना ग्रामस्थांकडून थंड पाणी बॉटल, मठ्ठा, फराळ, अल्पोपाहार आणि शीतपेय वितरीत करण्यात आले.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **KHUSHBU VASANTRAO PAUNIKAR.** NOW MY NEW NAME IS **KHUSHABU ROHAN SHARMA.**
**ADD :** 45,BHAGWAN NAGAR, NAGPUR. 440027.

# पॉलिटेक्निकसाठी १६ जूनपर्यंत अर्ज करावेत

## २३ रोजी अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होणार?

■ महासागर प्रतिनिधी,
**यवतमाळ , दि. ४ :** दहावीच्या परीक्षेचा ऑनलाइन निकाल जाहीर झाल्यानंतर आता पुढील अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. दहावीनंतर विद्याथ्यार्थ्यांना अकरावी बरोबरच तंत्रशिक्षणाची संधी उपलब्ध असून, तीन वर्षांच्या पॉलिटेक्निक डिप्लोमासाठी विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. तंत्रशिक्षण मंडळातर्फे पॉलिटेक्निक प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले असून, विद्यार्थ्यांना सोमवार, दि. १६ जून पर्यंत ऑनलाइन अर्ज नोंदणी व आवश्यक कागदपत्रे अपलोड करावे लागतील. १८ जूनला तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर होऊन २१ जूनपर्यंत ग्रीव्हन्स (आक्षेप) दुरुस्तीची संधी असेल. २३ जूनला अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होईल.

जिल्ह्यात पॉलिटेक्निक डिप्लोमाच्या तिन महाविद्यालयांमध्ये ८१० जागा उपलब्ध आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५ व २०२६ याकरिता तंत्रशिक्षण (पॉलिटेक्निक) पदविका अभ्यासक्रमासाठी केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. दहावीनंतरच्या प्रथम वर्ष डिप्लोमा इंजिनिअरिंग प्रवेशासाठी ऑनलाइन



अर्ज नोंदणी प्रक्रिया डीटीईच्या पोर्टलवर सुरू झाली असून, प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना माहिती भरून प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे. विद्यार्थ्यांना नोंदणी व कागदप कागदपत्रांची करता येईल. पडताळणी ऑनलाइन नोंदणी करताना कागदपत्रांच्या छायांकित प्रतीही स्कॅन करून अपलोड कराव्या लागणार आहे. दहावीत मिळालेल्या गुणांची नोंद घेऊन पुढील प्रवेश प्रक्रिया होणार आहे. या प्रवेशाचे ऑनलाइन अर्ज नोंदणीचे वेळापत्रक तंत्रशिक्षण संचालनालयाने प्रसिद्ध केले. अधिक माहितीसाठी श्रि२५. वींशारहरीरीहींर.सीं.ळ प या वेबसाइटवर संपर्क साधावा. या ठिकाणी प्रवेशाविषयी सविस्तर माहिती देण्यात आली आहे. त्यानुसार अचूक पद्धतीने वेळेत अर्ज सादर करावे. तसेच दिलेल्या सूचनेनुसार राउंडमध्ये सहभागी व्हावे, असे असे आवाहन देखील करण्यात आले आहे. तंत्रज्ञानाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दहावीनंतर तंत्र शिक्षणाची संधी उपलब्ध आहे. लवकर नोकरी आणि उज्ज्वल भविष्याची संधी असून, ज्या विद्यार्थ्यांनी नुकतीच दहावी परीक्षा उत्तीर्ण केली आहे अशांना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान पदविका हा एक आकर्षक आणि प्रभावी मार्ग आहे. तांत्रिक पदविका केंद्रित आणि उद्योग-आधारित शिक्षण देते. पारंपरिक शाखांबरोबरच मेकॅट्रॉनिक्स अभियांत्रिकी, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्ससारख्या शाखांचा समावेश असल्याने विद्यार्थ्यांना त्यामध्ये प्रवेशाची संधी असेल.

RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३



# चटपटीत चिप्स भेळ

झटपट रेसिपी

दोस्तांनो, संध्याकाळच्या वेळी काहीतरी चटपटीत खावंसं वाटतं. अशावेळी पटकन भेळेचा पर्याय निवडला जातो. भेळ म्हटली की चुरमुरे हवेत. पण तुमच्याकडे बटाटा वेफर्सचं एखादं पाकिट असलं तरी भेळ बनवता येईल. चला तर मग, पटकन होणारी ही रेसिपी ट्राय करू या.

**सामग्री:** बटाटा वेफर्स, चिरलेला कांदा, टॉमेटो, हिरव्या मिरच्या, फरसाण, शेव, लिंबाचा रस

**कृती:** बटाटा वेफर्सचे छोटे तुकडे करा. त्यात कांदा, टोमॅटो आणि हिरव्या मिरच्या घाला. नीट मिसळून घ्या. मग फरसाण आणि शेव घालून थोडा लिंबाचा रसही घाला. सर्व घटक नीट मिक्स करा. वेफर्स, फरसाणात मीठ असतंच. तुमच्या चवीनुसार मीठ घाला. वरून कोथिंबिरही घालता येईल. संध्याकाळच्या चहासोबत ही चिप्स भेळ मस्त लागेल. इतकंच नाही तर मित्रमंडळींकडून तुमच्या कल्पकतेचं कौतुकही होईल.




# शाळा सोडून उभारला अडीचशे कोटींचा उद्योग

अचिव्हर

अजय अजमेरा हे एक मोठे उद्योगपती आहेत. त्यांची कंपनी 'अजमेरा फॅशन' कापड उद्योगात काम करते आणि त्यांची वार्षिक उलाढाल २५० कोटी रुपयांपर्यंत आहे. अजय अजमेरा यांनी स्वतःच्या बळावर इतकं मोठं व्यावसायिक साम्राज्य उभं केलं आहे. त्यांच्याकडे कोणतीही पदवी नव्हती. ते कोणत्याही अनुभवाशिवाय या उद्योगात आले आणि अल्पावधीतच मोठा व्यवसाय उभा केला.

अजय अजमेरा यांचा जन्म राजस्थानमधील एका छोट्या शहरात एका सामान्य कुटुंबात झाला. १९७३ मध्ये जन्मलेल्या अजय यांनी फक्त ११ वीपर्यंत शिक्षण घेतलं. त्यानंतर वाईट आर्थिक परिस्थितीमुळे त्यांनी शिक्षण सोडलं; पण अजयची स्वप्नं मोठी होती. ती पूर्ण करण्यासाठी त्यांनी नवीन कामाच्या संधी शोधायला सुरुवात केली आणि ते गुजरातमधील सुरत येथे पोहोचले. कोणताही अनुभव नसताना कापड उद्योगात काम करायला सुरुवात केली. सुरतला भारताचं कापड केंद्रदेखील म्हटलं जातं. अनुभवाअभावी, त्यांनी कापड उद्योगात अत्यंत खालच्या स्तरावर काम करण्यास सुरुवात केली.

**कापड उद्योगातील बारकावे**

अजयने कापडांची वर्गवारी करण्यापासून पुरवठा साखळीतील गुंतागुंत समजून घेण्यापर्यंत प्रत्येक विभागात काम केलं. हळूहळू त्यांना कापड उद्योगाची चांगली समज मिळाली. अजय यांना काहीतरी वेगळं आणि चांगलं करण्याचं होतं. त्यांना लहान उद्योजक आणि महिलांसाठी हा व्यवसाय सोपा करायचा होता. २० वर्षे अजय यांनी कापड उद्योगात विविध पदांवर काम करून अनुभव मिळवला. २०११ पर्यंत, अजय दरमहा २ लाख रुपये कमवू लागले; पण ते त्यावर समाधानी नव्हते. अशा परिस्थितीत अजय यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला.

**कमी गुंतवणुकीत संधी**

अजय यांना कापड उद्योगातील अनेक उणीवा दूर करायच्या होत्या. २०११ मध्ये त्यांनी कापड उद्योगातील उणीवा भरून काढण्यासाठी 'अजमेरा फॅशन' नावाचा स्वतःचा कापड व्यवसाय सुरू केला. कमी गुंतवणुकीत व्यवसाय सुरू करण्याची संधी लोकांना मिळावी अशी अजयची इच्छा होती. म्हणून त्यांनी २५,००० रुपयांच्या गुंतवणुकीत व्यवसाय उभारण्याची संधी उपलब्ध करून दिली. अजमेरा फॅशन लोकांना सोर्सिंग, प्रशिक्षण आणि मार्केटिंगबाबत मार्गदर्शन करतं आणि त्यांना व्यवसाय उभारणीसाठी पाठिंबा देतं.



## फंडू एसएमएस

धडकने लगे दिल की तारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो,
संवर जाए हम बेकरारों की
दुनिया जब तुम मुस्कुरा दो।

उनकी चाहत में हम
कुछ यूं बंधे हैं।
वो साथ भी नहीं,
हम अकेले भी नहीं।

खामोश सा शहर और
गुफ्तगू की आरजू,
हम किससे करे बात
कोई बोलता ही नहीं।

## स्मार्ट टिप


### फोन हँग होतो?




अनेकदा फोन हळू चालत राहून हँग होत असल्याने त्याचा त्रास होतो; पण ही समस्या अगदी सहजपणे टाळता येते. तेही फक्त फोन रीस्टार्ट करून. स्मार्टफोन रीस्टार्ट करणं हा अतार्किक उपाय वाटू शकतो; परंतु तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार रिस्टार्ट करणं डिव्हाइसची कार्यक्षमता राखण्यात मोठी भूमिका बजावतं. आठवड्यातून एकदा स्मार्टफोन रीस्टार्ट केल्याने अनेक फायदे होतात. फोन सुरळीत चालण्यासाठी आठवड्यातून किमान तीन वेळा रीस्टार्ट करावा, असं तज्ज्ञांना वाटतं. मोबाईल कम्युनिकेशन कंपनी टी-मोबाइलच्या मते, आयफोन आणि अँड्रॉइड स्मार्टफोन आठवड्यातून किमान एकदा तरी रीस्टार्ट करावेत. सॅमसंगच्या मते त्यांचे गॅलेक्सी फोन दररोज रीस्टार्ट करावेत.

## टेक टॉक

### एसीचा कॉम्प्रेसर कुठे ठेवाल?



एसीचा कॉम्प्रेसर हवेशीर ठिकाणी ठेवावा. कॉम्प्रेसर थंड होण्यासाठी त्याच्याभोवती हवेचा प्रवाह राखणं महत्त्वाचं असतं. कॉम्प्रेसर युनिट चुकीच्या ठिकाणी ठेवल्यास त्याला थंड हवा मिळू शकत नाही. अशा परिस्थितीत एसी कॉम्प्रेसर जास्त गरम झाल्यामुळे खराब होऊ शकतो किंवा त्याला आगदेखील लागू शकते. एसी कॉम्प्रेसर युनिट ठेवण्यासाठी टेरेस आणि बाल्कनी दोन्ही आदर्श ठिकाणं आहेत. बाल्कनीत बराच काळ सावली असेल तर बाल्कनी ही कॉम्प्रेसर ठेवण्यासाठी सर्वोत्तम जागा असेल. घरात बाल्कनी नसेल तर कॉम्प्रेसर टेरेसवरदेखील ठेवता येतो.

## ॲप वर्ल्ड

### 'टिकटॉक'चं नवं फीचर



'टिकटॉक'ने 'एआय अलाइव्ह' नावाचं एक नवीन 'आर्टिफिशियल इंटेलिजेंस' (एआय) फीचर लॉंच केलं आहे. हे टूल कोणत्याही इमेजला ॲनिमेटेड व्हिडीओमध्ये रूपांतरित करू शकतं. सध्या हे फीचर फक्त टिकटॉक स्टोरीजमध्ये वापरलं जाऊ शकतं, थेट टिकटॉक फीडमध्ये नाही. एका प्रमुख व्हिडीओ 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवर उपलब्ध झालेलं कोणत्याही फोटोला लघु व्हिडीओमध्ये रूपांतरित करणारं हे पहिले 'एआय' टूल आहे. इंस्टाग्राम, एक्स (ट्विटर) आणि स्नॅपचॅट सारखे प्लॅटफॉर्म्सवर अद्याप अशा प्रकारचं एआय व्हिडीओ जनरेशन तंत्रज्ञान उपलब्ध नाही. हे फीचर वापरण्यासाठी 'टिकटॉक ॲप'वर जा आणि इनबॉक्स पेज किंवा प्रोफाइल पेजच्या वरच्या बाजूला असलेल्या निळ्या आयकॉनवर टॅप करा. तुमच्या स्टोरी अल्बममधून एक इमेज निवडा. फोटो एडिट पेजच्या उजव्या बाजूला असलेल्या टूलबारमध्ये तुम्हाला 'अलाईव्ह' आयकॉन दिसेल (दुसरा). त्या आयकॉनवर टॅप करा आणि दिसणाऱ्या विंडोमध्ये एक मजकूर प्रॉम्प्ट एंटर करा. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही तिथे सुचवलेल्या सूचनांपैकी एक निवडू शकता. नंतर जनरेट बटनावर टॅप करा आणि काही क्षणातच एक छोटा व्हिडीओ तयार होईल. तुम्ही तयार केलेला व्हिडीओ तुमच्या स्टोरीमध्ये पोस्ट करू शकता. हा व्हिडिओ तुमच्या फॉलोइंग फीड आणि तुमच्या प्रोफाइल पेजवर पाहता येईल.

# उन्हाळ्यातलं कलर कॉंबिनेशन

फॅशन पॅशन



आपला ड्रेसिंग सेन्स केवळ आरामदायकच नसावा तर त्यामुळे इतरांना प्रभावितही करता यावं असं प्रत्येकालाच वाटतं. उन्हाळ्यात स्वतःला कूल आणि ताजेतवाने ठेवणं हे फार कठीण नाही. पाच उत्तम रंगसंगती जाणून घेतल्या, तर त्या उन्हाळ्यात कूल आणि स्टायलिश लूक देतील.

**पांढरा आणि निळा**

उन्हाळ्यात सर्वोत्तम आणि ताजा लूक मिळवायचा असेल तर पांढऱ्या आणि निळ्या रंगाचं कॉंबिनेशन वापरा. पांढरा शर्ट आणि निळी जीन्स किंवा निळा शर्ट आणि पांढरी पॅंट, दोन्हीही लूक ऑफिससाठी योग्य आहेत. हे कॉंबिनेशन आरामदायी असून तुम्हाला थंड आणि ताजंतवानं ठेवतं.

*** पेस्टल पिवळा आणि हिरवा**

पेस्टल पिवळ्या आणि हिरव्या रंगाचं कॉंबिनेशन नवीन ऊर्जा आणि ताजेपणाची भावना देतं. हिरव्या रंगाची पॅंट आणि पेस्टल पिवळा शर्ट किंवा पेस्टल पिवळा स्कर्ट आणि हिरव्या रंगाचा टॉप ही दोन्ही कॉम्बिनेशन्स उत्तम आहेत. हे ऑफिसमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण करते.

*** फिकट गुलाबी आणि पांढरा**

ऑफिसमध्ये सुंदर लूक हवा असेल तर फिकट गुलाबी आणि पांढरा रंग हे उत्तम कॉंबिनेशन असू शकतं. पांढरी पॅंट किंवा स्कर्ट फिकट गुलाबी रंगाचा शर्ट किंवा टॉपसह, हे कॉम्बिनेशन खूप सुंदर आणि आकर्षक लूक देतं. हे रंग तुम्हाला कूल आणि ताजंतवानं बनवतात आणि ऑफिसमध्ये एक आकर्षक प्रतिमादेखील निर्माण करतात.

*** नेव्ही ब्लू आणि ग्रे**

नेव्ही ब्लू आणि ग्रे रंगाचं कॉंबिनेशन व्यावसायिक आणि स्टायलिश दिसतं. नेव्ही ब्लू टॉपसह राखाडी ट्राउझर्स किंवा राखाडी ब्लू शर्ट हे एक आदर्श कॉंबिनेशन आहे. हे रंग कूल आणि आरामदायी लूक देतात. उन्हाळ्याच्या हंगामात ते ऑफिससाठी योग्य आहे. हा लूक तुमच्या सहकाऱ्यांनाही तुमच्याकडे आकर्षित करेल.

*** ऑलिव्ह ग्रीन आणि बेज रंग**

ऑलिव्ह ग्रीन आणि बेज रंगाचं कॉंबिनेशन एक सोबर आणि स्टायलिश लूक देतं. ऑफिसमध्ये बेज रंगाच्या ट्राउझर्ससह ऑलिव्ह ग्रीन शर्ट किंवा बेज रंगाच्या पॅन्टसह ऑलिव्ह ग्रीन जॅकेट हे दोन्ही लूक उन्हाळ्यासाठी आदर्श आहेत.

# दीर्घकाळ स्मरणात राहण्यासाठी..

स्टडी टिप्स

मुलांसाठी परीक्षेची तयारी करणं हे सर्वात कठीण काम असतं. कमी वेळात इतक्या गोष्टी लक्षात ठेवणं कठीण होतं. या टिप्स वापरून अभ्यास केल्यास परीक्षेत चांगले गुण मिळू शकतात



*** नोट्स काढा**

कॉलेजमध्ये शिकवल्या जाणाऱ्या विषयांच्या नोट्स बनवा. त्या शेवटी वाचायला सोप्या वाटतील. कोणत्याही विषयाच्या पुस्तकी भाषेत नोट्स बनवू नका. शिक्षक बोलतात तेच वहीत लिहा. वहीतील रेखाचित्रांद्वारे गोष्टी लहान स्वरूपात तयार करा. जेव्हा तुम्ही परीक्षेत ते पुन्हा कराल, तेव्हा तुम्हाला समजण्यास कोणतीही अडचण येणार नाही. याशिवाय, विषयांमधील संबंध समजून घेण्याचा प्रयत्न करा. असे केल्याने तुम्हाला एकाच वेळी एकच नाही तर अनेक विषय आठवतील.

*** फ्लॅशकार्ड तयार करा**

महत्त्वाच्या विषयांचे फ्लॅशकार्ड तयार करा आणि ते पुस्तकात चिकटवा. यामुळे परीक्षेदरम्यान गोष्टी लक्षात ठेवण्यात अडचण येणार नाही. शिवाय पुस्तकांमध्ये हायलाईटर वापरा. सराव चाचण्या द्यायला सुरूवात करा. सराव चाचण्या दिल्याने केलेला अभ्यास लक्षात राहण्यास मदत होईल. वारंवार चाचण्या दिल्याने चांगला सराव होतो. ५ विषय असतील तर दररोज २-३ विषयांच्या चाचण्या द्या. जुन्या प्रश्नपत्रिका सोडवून तयारी करा. दृश्य साधनांचा वापर केल्यास विषय लक्षात ठेवण्यास मदत होईल. त्यामुळे विषयांबद्दलच्या आकलनाचं मूल्यांकन करण्यातही मदत होईल. विषयांच्या एमसीक्यू प्रश्नांची उत्तरे दिल्यास चांगली रिव्हिजन होईल.



# फायदे सायकलिंगचे

फिटनेस फंडा

मित्रमंडळींसोबत सायकलिंगचा आनंद घेताना खूप धमाल येते. भटकंतीला गेल्यावर आपण सायकलिंग करतो. पण दोस्तांनो, नियमित सायकलिंग करायला हवं. याचे अनेक लाभ आहेत. फिटनेसच्या दृष्टीने सायकलिंग कसं उपयुक्त ठरतं याविषयी...

* सायकलिंगमुळे फक्त पायांना व्यायाम मिळतो असं नाही. तर हा एक परिपूर्ण व्यायाम आहे. सायकलिंगमुळे शरीर बळकट होतं.

* सायकलिंगमुळे मासनिक आरोग्य उत्तम रहातं. ताण कमी होतो. मित्रमंडळींसोबत छान गप्पा मारत सायकलिंग केल्यावर मन प्रफुल्लित होतं. काही बागांमध्ये सायकल ट्रॅक्स असतात. निसर्गाच्या सानिध्यातही खूप छान वाटतं.

* सायकलिंगमुळे झटपट वजन कमी होतं. यामुळे प्रत्येक अंगाचा व्यायाम होत असल्याने अतिरिक्त फॅट्स जाळायला मदत होते.

* सायकलिंग हृदयाच्या आरोग्यासाठी उत्तम मानलं जातं. यामुळे श्वसनाचं तंत्र सुधारतं. आपला स्ट्रॅमिना वाढतो. त्यामुळे दररोज किमान अर्धा तास सायकल चालवायला हवी.

# छंदाला व्यावसायिकतेची जोड

वेगळ्या वाटा

बऱ्याच तरुणांना नोकरीऐवजी उद्योग करायचा असतो. काहींना फोटो काढण्याचा छंद असतो. काही गायन, वादनात पुढे असतात. काहींची चित्रकला, शिल्पकला चांगली असते. तुम्ही तुमच्या या छंदाचंच व्यवसायात रुपांतर करू शकता. छंदांच्या माध्यमातून उद्योगाचं गणित जुळवणारी अनेक मंडळी आपल्या आसपास आहेत. छंदांना व्यवसायाचं रुप देण्यासाठी नेमकं काय करायला हवं याविषयी...


* सर्वात आधी तुमच्या छंदांची यादी करा. तुम्ही नेमके कशात कुशल आहात याचा अंदाज घ्या. तुमचा हा छंद चांगलं उत्पादन किंवा सेवा म्हणून कशाप्रकारे सादर करता येईल याचा विचार करा.



* यादी केल्यानंतर बाजारपेठेबाबत थोडं संशोधन करा. यामुळे तुम्हाला भावी ग्राहक, त्यांच्या आवडीनिवडी याबद्दल कळू शकेल. त्यांच्यापर्यंत कसं पोहोचायचं हे तुम्ही ठरवू शकाल.

* उत्पादन किंवा सेवा बाजारात उतरवण्याआधी आपली कल्पना तपासून घ्या. काही ग्राहकांना उत्पादनाची माहिती द्या. तुमची उत्पादनं किंवा सेवा त्यांना वापरायला द्या. त्यांच्याकडून सूचना मागवा. उत्पादनांमध्ये काही सुधारणा करायच्या असतील तर तसा विचार करा.

* यानंतर तुमच्या उत्पादनाला किंवा सेवेला नाव द्या. मार्केटिंगचं तंत्र जुळवा. लवकरात लवकर उत्पादन बाजारात आणा.



# उशाखाली मोबाईल ठेवणे धोकादायक

टेक्नोहेल्थ

जागतिक आरोग्य संघटना आणि इतर मोठ्या संस्थांना मोबाईल फोनच्या रेडिएशनमुळे मेंदूला थेट गंभीर नुकसान होत असल्याचा कोणताही ठोस वैज्ञानिक पुरावा अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे, मोबाईल जवळ ठेवून झोपण्यामुळं रेडिएशनचा धोका नसला, तरी अन्य धोके दुर्लक्षून चालणार नाहीत. सध्या बहुतांश लोक झोपतानादेखील मोबाईल उशाशी ठेवतात; पण ही सवय आरोग्यासाठी घातक ठरू शकते. मोबाइलमधून निघणाऱ्या रेडिएशनचा आपल्या मेंदूवर आणि झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो.

**मोबाईल जवळ ठेवून झोपल्याने काय होतं?**

* सतत नोटिफिकेशन्स, वायब्रेशन किंवा लाईटमुळे मेंदू सतत ॲक्टिव्ह राहत असल्याने झोप पूर्ण होत नाही.

* मोबाइल फोनमधून निघणाऱ्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशनमुळे मेंदूवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

* झोपण्याआधी मोबाईल स्क्रीनकडे पाहिल्याने 'ब्लू लाइट' डोळ्यांवर ताण आणतो आणि झोपेच्या नैसर्गिक चक्रात अडथळा निर्माण होतो.

* झोपेच्या कमतरतेमुळे चिडचिड, डिप्रेशन, चिंता यासारख्या मानसिक त्रासांची शक्यता वाढते.

* काही घटनांमध्ये मोबाईल गरम होऊन स्फोट झाल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. त्यामुळे चार्जिंगवर असलेला मोबाईल उशाशी ठेवणं धोकादायक ठरू शकतं.

**काय काळजी घ्याल?**

रेडिएशनचा मोठा बागुलबुवा खरा नसला तरी, शांत आणि सुरक्षित झोपेसाठी काही गोष्टी लक्षात ठेवणं गरजेचं आहे. शक्य असल्यास, रात्री झोपताना मोबाईल तुमच्यापासून थोडा दूर ठेवा. तो उशाखाली किंवा कोणत्याही कापडाखाली, विशेषतः चार्जिंगला असताना, अजिबात ठेवू नका. झोपण्यापूर्वी काही वेळ मोबाईल न बघितल्यास शांत झोप लागण्यासही मदत होते.

## पिककर्जात नाहक त्रास देणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर

# फौजदारी गुन्हे दाखल करा

भाजपा जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांची मागणी

जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेत निवेदन सादर

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ४ :

खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांना पिककर्ज, खते-बियाणे मिळण्यात येणाऱ्या अडचणी व ईतर मुद्द्यांबाबत भाजपा जिल्हाध्यक्ष आ. विजयराज शिंदे यांनी बुलढाणा जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन मागणीचे निवेदन सादर केले.



खरीप हंगाम तोंडावर असताना व पिककर्ज वाटप व नूतनीकरनाची शेवटची तारीख ३० जून २०२५ असून देखील बुलढाणा जिल्ह्यात पिक कर्ज वाटपाची गती अतिशय मंद आहे. मागील आठवड्यापर्यंत केवळ १६% पीक कर्ज वितरित झाले आहे. त्यामुळे पीककर्ज वाटपाची गती वाढविण्याची गरज आहे.

राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना नियमित पीक कर्ज व डळर केलेल्या शेतकऱ्यांना पीककर्ज देण्यास टाळाटाळ करत आहे, काही बँक अधिकारी शेतकऱ्यांना अतिशय तुच्छतेची वागणूक देत असून सीबील, व ईतरही लहान लहान चुका काढून पीककर्ज नामंजूर करीत असल्याचा विविध तक्रारी प्राप्त होत आहे.

शेतकऱ्यांना तुच्छतेची वागणुक देऊन पिककर्ज नाकारणाऱ्या मुजोर बँक अधिकारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावे, अशी मागणी त्यांनी केली.

शासकीय अनुदान, आर्थिक मदत यावर काही बँका होल्ड लावत आहे त्यामुळे शेतकऱ्यांना पेरणीच्या तोंडावर आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे पेरणीच्या तोंडावर कोणत्याही शेतकऱ्यांच्या खात्याला होल्ड लावू नये, अशा शासनाच्या सूचना असतांना देखील त्याची अंमलबजावणी होतांना दिसत नाही.

पीक कर्जा सोबतच खाते व बी बियाणांचा काळाबाजार सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. डीएवी , १२:३२:१६ या खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जात आहे. कृषी केंद्र चालकांकडून बोगस व अनावश्यक खतांची बळजबरीने विक्री केली जात आहे. राशी ६-५-९ व सुपरकॉट ११५, कबड्डी या कपाशी बियाणांचाही जिल्ह्यात मोठा काळाबाजार सुरू आहे. कृषी केंद्र चालक खते व बी बियाणे यांचा साठा करून शेतकऱ्यांना वेठीस धरत आहे.नामांकित बॅग मागे बोगस व अनावश्यक कंपनीचे खते बी बियाणे विकण्याचा प्रकार कृषी केंद्र चालकांकडून सुरू आहे.

खरीप हंगामा करता महाराष्ट्र शासनाने कृषी विभागा अंतर्गत "उडळ पोर्टल द्वारे १००% अनुदानावर प्रात्यक्षिक बियाणे देण्याची योजना सुरू केली आहे.त्याची मुदत ६ जून आहे, मात्र सदर पोर्टलवर तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांचे अर्ज दाखल होत नाही, त्यामुळे शेतकरी या लाभापासून वंचित राहत आहे. त्यामुळे या महाडीबीटी पोर्टलची मुदत वाढवून देण्यात यावी.

शेतकऱ्यांच्या घरात गेल्या तीन महिन्यांपासून ज्वारी पडून आहे. शासकीय हमीभाव दराने होणारी ज्वारीची उन्हाळी खरेदी केंद्राचे उदघाटन झालेले आहे मात्र प्रत्यक्षात काही केंद्रावर ज्वारीची खरेदी होत नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत.

पीक कर्जाचे उद्दिष्ट तात्काळ पूर्ण व्हावे यासाठी पीककर्जातील वाटपातील अडचणी तात्काळ सोडवाव्यात, बँकेत येणाऱ्या शेतकऱ्यांना अधिकाऱ्यांनी सौजन्याची वागणूक द्यावी तसेच खते-बी बियाणांचा होणारा काळाबाजार,कृत्रिम तुटवडा थांबवावा असा काळाबाजार करणाऱ्या कृषी केंद्र चालकांवर व मुजोर बँक अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

यावेळी भाजपा जिल्हा सचिव चंद्रकांत बर्दे,जिल्हा सचिव दत्ता पाटील, मा.नगरसेवक मंदार बाहेकर, भाजयुमो सतीश पाटील उपस्थित होते.

## हिंदी सक्ती नसल्याचा अध्यादेश अजून का निघाला नाही?

### राज ठाकरेंचे शिक्षण मंत्र्यांना खरमरीत पत्र हिंदीची पुस्तके छापण्यावरून निर्वाणीचा इशारा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना पत्र लिहिले आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम असलेल्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून दोनच भाषा शिकवल्या जातील, अशी घोषणा सरकारने केली होती, परंतु या घोषणेचा लेखी अध्यादेश अजून का आला नाही? असा सवाल राज ठाकरेंनी या पत्रातून उपस्थित केला आहे.

राज ठाकरे यांनी पत्रात म्हटले की, गेले जवळपास २ महिने महाराष्ट्रात पहिली इयत्तेपासून हिंदी भाषा शिकवणे यावरून सरकारकडून प्रचंड गोंधळ घालणं सुरु आहे. सुरुवातीला पहिल्या इयत्तेपासून तीन भाषा विद्यार्थ्यांना शिकवणार आणि त्यात हिंदी भाषा ही तिसरी सक्तीची भाषा असेल असं घोषित केलं गेलं.

ज्याच्या विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आवाज उठवला, आणि ज्याच्यामुळे जनभावना तयार झाली. ती जनभावना इतकी तीव्र होती की सरकारने तिसऱ्या भाषेसाठी हिंदी भाषेची सक्ती केली जाणार नाही असं घोषित केलं. घोषणेचा लेखी अध्यादेश अजून का आला नाही?

मुळात हिंदी ही काही राष्ट्रभाषा नाही, देशातील इतर प्रांतातील भाषांसारखी एक भाषा. ती शिकण्याची सक्ती का केली जात होती? कुठल्यातरी दबावाखाली सरकार घरंगळत का जात होतं हे माहित नाही. पण मुळात पहिल्या इयत्तेपासून तीन भाषा मुलांना का शिकायला लावायच्या हा मुद्दा आहेच.

मग त्याबाबत पण आपण घोषणा केलीत की महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम असलेल्या शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून दोनच भाषा शिकवल्या जातील. या घोषणेचा लेखी अध्यादेश अजून का आला नाही?

आधीच्या तीन भाषा शिकवणे आणि त्यात हिंदीचा समावेश असणे या निर्णयाचा आधार घेऊन, हिंदी भाषेच्या पुस्तक छपाईला केंव्हाच सुरु झाली आहे. आता पुस्तकं छापली आहेत मग पुन्हा आपल्याच निर्णयावर घुमजाव करायचं असं काही करण्याचा सरकारचा काही डाव तर नाही ना? असा सवाल विचारत राज यांनी निर्वाणीचा इशारा दिला आहे.

## धारदार शस्त्रांनी वार करत तरुणाची निर्घृण हत्या

■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ४ :

एका तरुणाची धारदार शस्त्रांनी वार करीत हत्या करण्यात आली आहे. चांदनी चौक परिसरात असलेल्या वन विभागाच्या कार्यालयासमोर घडलेल्या या घटनेने खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर संतप्त झालेल्या मृताच्या नातेवाईकांनी एलआयसी चौकात रास्तारोको करीत आरोपीच्या अटकेची मागणी लावून धरली होती.

मनीष उर्फ मन्या शेंद्रे (वय २८) वर्षे रा. सेजल रेसिडेन्सी असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. मनिष हा त्याच्या दुचाकीची दुरुस्ती करण्यासाठी चांदणी चौकातून महादेव मंदिराच्या मागे एका गॅरेजवर आला होता. यावेळी पूर्वनियोजित पद्धतीने दोन हल्लेखोर ऑटोरिक्षामध्ये आधीपासूनच बसलेले होते. अन्य दोन आरोपी एका नंबर नसलेल्या दुचाकीवर त्या ठिकाणी आले. त्यांनी काही कळायच्या आत मनिषवर धारदार शस्त्रांनी हल्ला चढवला. या हल्ल्यात मनिषच्या पाठीवर, छातीवर, हातावर आणि गळ्यावर गंभीर जखमा झाल्या. हल्ल्यानंतर तो जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या मागील गेटजवळ पडला. नंतर तो उठून पुढे वन कार्यालयाच्या दिशेने धावला असता तेथे तो कोसळला.



माहिती मिळताच शहर पोलिस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर एलसीबीचे अधिकारी, उप्पर पोलिस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाणे हे वरिष्ठ अधिकारीही घटनास्थळी पोहोचले. दुचाकीला कट लागल्याच्या कारणावरुन झालेल्या वादात या घटनेतील मृतक मनिष याने एका युवकावर देशी कट्टयाने गोळीबार केला होता. या घटनेत त्या युवकाचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात मन्याला पोलिसांनी अटक केली होती. काही महिन्यांपूर्वीच तो जामिनावर सुटला होता. त्या घटनेचा वचपा काढण्यासाठीच हे हत्याकांड करण्यात आले असल्याचा अंदाज पोलिसांकडून वर्तवण्यात येत आहे.

## मंत्रालयही अदानीला देणार का?

काँग्रेसचा भाजपवर जोरदार हल्लाबोल

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :

मुंबईतील अब्जावधींच्या सरकारी जमिनी अदानीच्या घशात जात असताना, सरकार केवळ पाहात बसले आहे. आता फक्त मंत्रालय आणि विधिमंडळच उरले आहेत, ते अदानीला कधी देणार? असा संतप्त सवाल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजप सरकारला विचारला आहे.

टिळक भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत सपकाळ यांनी सरकारवर जोरदार टीका केली. शेतकऱ्यांना मदतीसाठी पैसे नाहीत, भगिनींना योजनेतील लाभ द्यायला पैसे नाहीत, पण अदानीसाठी मात्र सरकारचे झपाट्याने निर्णय होतात,ह्व असे म्हणत त्यांनी धारावी प्रकल्प, कुर्ला येथील मदर डेअरीची ८.५ हेक्टर जमीन, वांद्यातील एमएसआरडीसी कार्यालय यांचा उल्लेख केला. ह्वमहाराष्ट्राला यामधून काय मिळणार? फक्त भोपळा,ह्व असा उपरोधिक टोला सपकाळ यांनी लगावला.

मंदिर, मशीद, चर्च, गुरुद्वारांवर लाऊडस्पीकरबाबत सर्वोच्च न्यायालयाने आधीच मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत, तरीदेखील राज्य सरकार वेगळा फतवा काढून सामाजिक तेढ वाढवत आहे. हा फतवा तात्काळ रद्द करावा, अशी मागणी त्यांनी केली.

## प्राचार्य शामकांत काळवीट यांना नटश्रेष्ठ निळू फुले गौरव पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी
नांदुरा, दि. ४ :



नटश्रेष्ठ निळू फुले आर्ट फाउंडेशन, अकोलातर्फे देण्यात येणारे नटश्रेष्ठ निळू फुले स्मृती पुरस्कार जाहीर करण्यात आले असून, यंदाचा नटश्रेष्ठ निळू फुले जीवन गौरव पुरस्कार शामकांत काळवीट यांना घोषित करण्यात आला आहे.

येथील प्राचार्य शामकांत काळवीट यांना नटश्रेष्ठ निळू फुले जीवन गौरव पुरस्कार, अकोल्याचे उद्योजक प्रदीप नंद यांना संस्कृतीकर्मी पुरस्कार, नागपूरचे नाट्य दिग्दर्शक संजय भाकरे यांना नटश्रेष्ठ निळू फुले नाट्य तपस्वी पुरस्कार, स्तंभलेखक प्रा. डॉ. मोहन खडसे यांनी समाज गौरव पुरस्कार, वणी जि. यवतमाळ येथील नकलाकार प्रा. डॉ. दिलीप अलोणे यांना संदीप पाठक, शामकांत काळवीट मोहन खडसे

नटश्रेष्ठ निळू फुले कलावैभव पुरस्कार, वर्षा येथील प्रसिद्ध गायिका खुशबू कठाणे यांना नटश्रेष्ठ निळू फुले कला साधना पुरस्कार, अकोल्याच्या ज्येष्ठ रंगकर्मी विद्या मराठे- जोगळेकर यांना रंगमुद्रा थिएटर, चिंचवड, पुणे यांच्यातर्फे कै. सुहासिनी आमले स्मृती पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आला आहे, अशी माहिती फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी दिली आहे.

अकोला येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठानला नटश्रेष्ठ नि फुले समाजभूषण पुरस्कार तर बुटीबोरी, जि. नागपूर येथील कर्मयोगी फाउंडेशनला सम्म वैभव पुरस्कार जाहीर करण्यात आला. सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या संस्थांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

रंगभूमी, सिनेमा, संगीत आणि सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान हा नटश्रेष्ठ निळू यांच्या बहुआयामी योगदानाला अभिवादन असा विश्वास फाउंडेशनतर्फे व्यक्त करण्यात आला आहे.

यावेळी विजय महाजन सर, पी जी तायडे सर, संस्थापक अध्यक्ष डॉक्टर रमेश थोरात, संस्थेचे अध्यक्ष, मिरवणूक प्रतिष्ठान अकोला, संस्थापक अध्यक्ष व समस्त विश्वस्त मंडळ यांनी जाहीर केला. शामकांत काळविट हे कोठारी विद्यालय नांदुरा येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक असून, मोहनराव नारायणा नेत्रालयात सेवाव्रती म्हणून कार्य सुरू आहे. संपूर्ण जिल्ह्यातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

: लोकसेवार्थ :

## एक सर्वसमावेशक विद्यापीठ सत्यभामा

लोकजागर



सत्यभामा तिच्या स्थापनेपासूनच आयएसआरचा सराव करत आहे. सत्यभामाने संपूर्ण समाजाला फायदेशीर ठरणारे विविध उपक्रम स्वीकारले आहेत. विद्यार्थी आणि प्राध्यापक समाजाला भेडसावणाऱ्या समस्यांवर तांत्रिक उपाय प्रदान करण्याच्या उद्देशाने सामुदायिक प्रकल्पांमध्ये सहभागी आहेत.

सत्यभामा पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकास पद्धतींचे काटेकोरपणे पालन करते आणि पर्यायी आणि अक्षय ऊर्जेचा वापर, कचऱ्याचा पुनर्वापर, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कार्बन उत्सर्जन कमी करणे, अन्नाचा अपव्यय कमी करणे आणि सेंद्रिय शेतीचा अवलंब करणे यासारख्या पर्यावरण संरक्षण उपक्रमांचे समर्थन करते.

सत्यभामा हे एक समावेशक विद्यापीठ आहे आणि सर्वांसाठी शिक्षण या ब्रीदवाक्यासह काम करते. ही संस्था गरीब आणि गरजूंना उच्च शिक्षण घेण्यासाठी आमच्या कुलगुरूंनी स्थापन केलेल्या अंबू फाउंडेशनचे ब्रीदवाक्य आहे. हे फाउंडेशन शेकडो पात्र विद्यार्थ्यांना अंबू स्कॉलरशिपद्वारे त्यांचे शिक्षण सुरू ठेवण्याची संधी देते.

आर्थिकदृष्ट्या कमकुवत पार्श्वभूमीतील पात्र विद्यार्थ्यांना पूर्ण शिष्यवृत्तीसह उच्च शिक्षण घेण्याची संधी प्रदान करणे, आव्हानांना तोंड द्यावे लागते खरोखर पात्र विद्यार्थ्यांची ओळख पटवणे आणि निवड करणे हे एक आव्हान आहे. या उपक्रमाअंतर्गत संस्थेला दरवर्षी दोन हजारांहून अधिक अर्ज येतात. संस्थेने राज्यभरातील अनेक स्वयंसेवी संस्थांशी करार केला आहे जे ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत पार्श्वभूमीतील पात्र विद्यार्थ्यांची ओळख पटवतात. अंतर्गत गावांमध्ये फील्ड तपासणी केली जाते आणि स्वयंसेवी संस्थांच्या स्वयंसेवकांना कधीकधी सत्यता तपासण्यासाठी लांबचा प्रवास करावा लागतो. सध्या संस्थेत सुमारे ५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या उपक्रमामुळे हजारो मुले आणि त्यांच्या कुटुंबांच्या जीवनात बदल झाला आहे.

महिला सक्षमीकरण, महिलांवरील हिंसाचार दूर करणे, आरोग्य आणि शिक्षणावर भर देऊन महिलांचे आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरण, धोरणे, कार्यक्रम आणि संस्थात्मक व्यवस्था यांचे लिंग मुख्य प्रवाहात आणणे आणि माहिती आणि सेवांमधील तफावत भरून काढण्यासाठी जागरूकता निर्माण करणे आणि वकिली करणे या प्रक्रिया सुलभ करणे हे ब्युरोचे कर्तव्य आहे.

ब्युरोची उद्दिष्टे दुहेरी आहेत. ब्युरोच्या उपक्रमांचे उद्दिष्ट संस्थेतील विद्यार्थ्यांना आणि ग्रामीण महिला, वंचित आणि उपेक्षित वर्ग आणि अल्पसंख्याक समुदायांसह समाजातील लाभार्थींना सक्षम बनवणे आहे.एखाद्या व्यक्तीला मासेमारी शिकवणे हे त्याला खायला देण्यापेक्षा चांगले आहे हे लक्षात घेऊन, संस्थेचा महिला सक्षमीकरण ब्युरो या गावांमधील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अनेक प्रशिक्षण कार्यक्रम आणि व्यावसायिक अभ्यासक्रम आयोजित करतो.

ते काही स्वयंसेवी संस्थांसोबत काम करून त्यांना व्यवसायाचे प्रशिक्षण देऊन आणि उत्पन्न वाढवून त्यांच्या उन्नतीसाठी काम करते. या काळात सुमारे ३५० महिलांना मशरूम लागवड, समुद्री तण लागवड, शोभेच्या माशांची लागवड, सौर दिवे बनवणे, बेकिंग, टेलरिंग, सॅनिटरी नॅपकिन बनवणे, घरकाम, सौंदर्य आणि निरोगीपणा इत्यादी क्षेत्रात प्रशिक्षण दिले जाते.

सत्यभामा भारत सरकारच्या ग्रीन इंडिया उपक्रमाचे समर्थन आणि समर्थन करते. संस्थेकडे पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी एक समर्पित इको क्लब आहे. कॅम्पसमध्ये आणि जवळपासच्या समुदायांमध्ये देखील अतिशय हिरवे उपक्रम राबविण्यासाठी विद्यार्थी आणि प्राध्यापकांचा सहभाग आहे.

सत्यभामा ही एक तांत्रिक उच्च शिक्षण संस्था म्हणून ग्रामीण विकासात सहभागी होते आणि योगदान देते. सत्यभामाने गावांच्या परिवर्तनशील बदल आणि विकासासाठी तंत्रज्ञान हस्तांतरित आणि अंमलात आणण्यासाठी वइअ योजनेअंतर्गत जवळपासची पाच गावे दत्तक घेतली आहेत. सत्यभामा गावांमध्ये आरोग्य, शिक्षण, मूलभूत सुविधा आणि रोजगाराच्या संधींसाठी आपला पाठिंबा वाढवते. ■ ■

: शून्यातून विश्व :

### गोष्ट यशस्वी कंत्राटदाराची



सामाजिक, भौगोलिक आणि आर्थिक प्रतिकूलतेने नटलेला मराठवाडा. याच भागातील वंजारवाडी म्हणजे एक खेडेगाव. उत्तमराव तांदळे आणि शोभा तांदळे हे शिक्षक दाम्पत्य म्हणजे नवीन पिढीला घडविणारे वंजारवाडीसाठी भूषणच.

शरद त्यांचा मुलगा. बारावीला पठ्ठ्याने तब्बल ९२ टक्के मिळवले. पुढे काय करायचं माहीत नाही. कारण, मित्राने अकरावीला विज्ञान विषय घेतला म्हणून हा इकडे आला. औरंगाबादच्या सरकारी अभियांत्रिकी महाविद्यालयात त्याने प्रवेश घेतला. काहींनी सांगितलं, मेकॅनिक विषयात खूप चांगला वाव आहे. पुढे भल्या मोठ्या पगाराची नोकरी मिळेल म्हणून मेकॅनिकल विषय निवडला. तांत्रिक विषयात आपल्याला स्वारस्य नाही, हे कळेपर्यंत अर्ध इंजिनिअरिंग पूर्ण झालं होतं. शरदने इंजिनिअरिंगचे शिक्षण एकदाचे पूर्ण केले.पुण्यात इंजिनिअरिंग क्षेत्रात वाव आहे, हे कळल्यानंतर तो मित्रांसोबत पुण्याला नोकरीसाठी आला. एका कंपनीत पाच-सहा हजार रुपयांची नोकरी मिळाली. सहा महिने नोकरी केली. त्याचवेळी कोणीतरी सांगितलं, संगणक युग आहे म्हणून शरदने सिस्टीम ॲप्लिकेशन प्रॉडक्ट अर्थात सॅपचा कोर्स केला. दरम्यान, एमबीएची प्रवेश परीक्षा पण दिली. त्याच्यात मात्र अपयश आलं. नोकरी नव्हती मिळत. करायचं काय, हा प्रश्न होता. समोर दोनच पर्याय होते. पहिला उद्योजक तर दुसरा राजकारण. जास्त पैसे आणि समाजात प्रतिष्ठा असे सारं मिळण्यासाठी दोन उद्योगधंदे त्याला सुचले. एक म्हणजे हॉटेल आणि दुसरं म्हणजे बीपीओ कंपनी. एवढ्या मोठ्या व्यवसायासाठी भांडवल लागणार. पण, हिंमत न हारता आपण आपल्या क्षेत्रातच असणारा फॅब्रिकेशनचा व्यवसाय करायचा हे त्याने ठरवले. याचवेळी एक इलेक्ट्रिक जोडणीचं काम मिळालं. त्यातून इलेक्ट्रिकची कामे मिळू लागली. याचदरम्यान एक टाकी बांधायचं काम मिळालं. १० हजार रुपयांच्या कामातून तीन-चार हजार रुपयांचा नफा मिळाला. एखाद्याच्या मासिक पगाराइतका पैसा निव्वळ दोन दिवस काम केलं तर मिळतो. उद्योगाची ताकद शरदला उमजली. गुणवत्तेच्या आधारावर दीडशेहून अधिक प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केले. याचदरम्यान भारतीय युवा शक्ती ट्रस्ट या सीआयआय संचालित संस्थेशी ओळख झाली.

या संस्थेच्या माध्यमातून एका बँकेने तांदळेंना १० लाखाचं व्यावसायिक कर्ज दिलं. त्याच्या जोरावर त्यांच्या कंपनीने जोरदार मुसंडी मारत व्यवसाय कैकपटीने वाढवला. आज तांदळे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष चारशेहून अधिक लोकांना रोजगार देत आहेत. सध्या ६ कोटी ५० लाख रुपये इतकी त्यांची उद्योजकीय उलाढाल आहे. त्यांनी ४५० हून अधिक तरुण कंत्राटदार घडवलेले आहेत. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## ११ वी प्रवेश प्रक्रियेत अखेर एससी, एसटी, ओबीसी कोटा लागू

शिक्षण विभागाचा नवा निर्णय : अल्पसंख्याक संस्थांच्या ५०% कोट्यावर परिणाम

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :

राज्याच्या शालेय शिक्षण मंत्रालयाने अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत एससी, एसटी व ओबीसी कोटा लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे अल्पसंख्याक संस्थांच्या ५० टक्के कोट्यावर परिणाम होण्याची भिती व्यक्त केली जात होती.

त्यानुसार, काही संस्थांनी सरकारच्या या निर्णयाा कोर्टात आव्हान देण्याचा निर्णयही घेतला होता. पण या प्रकरणी वाद उत्पन्न होताच मंत्रालयाने सुधारित परिपत्रक जारी करून अल्पसंख्याक कोट्याला कोणताही धक्का लावण्यात येणार नसल्याचे स्पष्ट केले.

अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांमध्ये ११ वी प्रवेशाच्या वेळी एससी, एसटी, ओबीसी कोटा जोडण्याचा शासन निर्णय मागील महिन्यात जारी करण्यात आला होता. यावर काही अल्पसंख्याक संस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. अल्पसंख्याक संस्था व महाविद्यालयात ५० टक्के जागा आरक्षित आहेत. त्यात एससी, एसटी व ओबीसी कोटा जोडल्यास हा कोटा ८६ टक्क्यांपर्यंत जाईल. परिणामी खुल्या प्रवर्गातील जागांचा टक्का कमी होईल, असा त्यांचा आरोप होता.

त्यामुळे त्यांनी या निर्णयाला कोर्टात आव्हान देण्याचे संकेत दिले होते. या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने एका सुधारित आदेश काढून या प्रकरणी स्पष्टीकरण दिले आहे.

सरकारने आपल्या सुधारित परिपत्रकात म्हटले आहे की, अल्पसंख्याक उच्च माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अल्पसंख्यांक कोट्यांतर्गत विद्यार्थ्यांना ५० टक्के जागा राखीव असतात. या कोट्यातील जागा शाळा व्यवस्थापनास ३ फेऱ्यापर्यंत गुणवत्तेनुसार भरण्याची मुभा असते. नियमित ३ फेऱ्या संपेपर्यंत महाविद्यालयांना अल्पसंख्यांक कोट्यातील जागा सर्वसाधारण जागांमध्ये प्रत्यार्पित करता येत नाही. ३ फेऱ्यानंतर या कोट्यातील रिक्त राहणाऱ्या जागा चौथी नियमित फेरी सुरू होण्यापूर्वी सर्वसाधारण जागांमध्ये प्रत्यार्पित करता येतात.

पण आता उच्च माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ अल्पसंख्याक महाविद्यालयांना अल्पसंख्यांक कोट्यातील ५० टक्के जागांपैकी रिक्त राहणाऱ्या जागा पहिल्या फेरीनंतरच सर्वसाधारण जागांमध्ये प्रत्यार्पित करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे.

परंतु, दुसऱ्या फेरीवेळी अल्पसंख्याक कोट्यातून प्रवेशाकरीता अर्ज प्राप्त झाल्यास त्या विद्यार्थ्यांना प्रथम प्रवेश अल्पसंख्याक कोट्यातून देण्यात येतील. त्यानंतर रिक्त असलेल्या अल्पसंख्याक कोट्यातील जागा सर्वसाधारण जागांमध्ये प्रत्यार्पित करण्याची मुभा महाविद्यालयांना असणार आहे.

११ वी ऑनलाईन प्रवेश प्रकियेला आता ५जून पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. दुपारी २ वाजेपर्यंत ही मुदतवाढ संपुष्टात येईल.

## ४७ विदेशी साप, ५ कासवांसह तस्कर अटकेत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :



मुंबईत सीमाशुल्क विभागाने ४७ विदेशी साप आणि ५ कासवांची तस्करी केल्याप्रकरणी एका नागरिकाला अटक केली आहे. कस्टम कायदा, १९६२ अंतर्गत ही अटक करण्यात आली आहे. अधिका?यांनी या व्यक्तीकडून अनेक दुर्मिळ आणि संरक्षित प्रजातींचे प्राणी जप्त केले आहेत.

जप्त केलेल्या प्राण्यांमध्ये तीन जिवंत कोळी शेपटीची शिंगे असलेले साप (स्यूडोसेरास्टेस उराराच्नॉइड्स), पाच जिवंत आशियाई कासव (सायक्लेमिस डेंटाटा) आणि इंडोनेशियन पिट वायपर (ट्रायमेरेसुरस इन्सुलारिस) चे ४३ जिवंत आणि एक मृत साप यांचा समावेश आहे.

हे सर्व प्राणी दुर्मिळ मानले जातात आणि त्यांची तस्करी आंतरराष्ट्रीय स्तरावर बंदी आहे. अधिकाऱ्यांच्या मते, हे प्रकरण केवळ वन्यजीव संवर्धन कायद्यांचे उल्लंघन नाही तर जैवविविधता आणि परिसंस्थेसाठी गंभीर धोका आहे. या प्राण्यांच्या तस्करीमागे कोणते नेटवर्क काम करत आहे हे शोधण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, सीमाशुल्क विभागाने अटक करण्यात आलेल्याचे नाव अद्याप जाहीर केले नसून त्याची चौकशी सुरू असल्याचे सांगितले.

तस्करी रोखण्यासाठी सीमाशुल्क विभागाने विमानतळ आणि सीमांवर देखरेख कडक केली आहे. जप्त केलेले सर्व सरपटणारे प्राणी प्रतिबंधित आणि संरक्षित श्रेणीत येतात आणि आंतरराष्ट्रीय तस्करीवर बंदी आहे. आरोपीची कसून चौकशी सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार विशिष्ट प्रजातींच्या आयातीवर बंदी आहे. यात नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या किंवा सरकारकडून संरक्षित करण्यात आलेल्या प्रजातींचा समावेश आहे. या साप आणि कासवांची तस्करी नेमकी कशासाठी करण्यात येत होती, याचा संबंधित विभागाकडून तपास सुरू आहे.

महासागर
नागपूर
# वृत्तसागर
■ गुरूवार, दि. ५ जून २०२५ ■

## कारगिल पोलिसांचे पथक उपराजधानीत दाखल

### सुनीताला पुन्हा अटक होण्याची शक्यता

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

एलओसी ओलांडून पाकिस्तानात गेलेल्या सुनीता जामगडेच्या अडचणी कमी होताना दिसत नाही. तिला अमृतसर येथून नागपुरात आणताच कपिलनगर पोलिसांनी ऑफिशियल सिक्रेट ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवून अटक केली होती. पोलिस कोठडीत सुनीताची अनेक दिवसांपर्यंत चौकशी करण्यात आली.

न्यायालयाने पोलिसांच्या मागणीवर तिला न्यायालयीन कोठडीत तुरुंगात रवाना केले. या दरम्यान कारगिल पोलिसांनी शहर पोलिसांशी संपर्क केला. त्यांनाही सुनीताची चौकशी करायची आहे.

कारगिल पोलिसांचे पथक नागपुरात दाखल झाले. माहिती मिळाली आहे की, पोलिस न्यायालयातून प्रोडक्शन वॉरंट घेत सुनीताला पुन्हा अटक करू शकतात. तिला परत कारगिलला नेले जाऊ शकते. सुनीता कारगिल येथूनच एलओसी ओलांडत पाकिस्तानात केली होती. तेथे अटक झाल्यानंतर पाकिस्तानी रेंजर्स आणि पोलिसांनी तिची ८ दिवसांपर्यंत चौकशी केली. या दरम्यान काय-काय घडले याची माहिती घ्यायची असल्याने कारगिल पोलिस नागपुरात पोहोचले आहेत. स्थानिक अधिकाऱ्यांशी प्रकरणाशी संबंधित सर्व माहिती घेण्यात आली आहे.

## मनपाच्या ई-लायब्रीतून घडताहेत डॉक्टर



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

नागपूर महानगरपालिकेची लोधीपुरा भागातील भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी ई-लायब्ररी स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे. त्याचबरोबर या ई-लायब्ररीच्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना एमबीबीएस, एमडी आणि एमएस सारख्या वैद्यकीय परीक्षांची तयारी करून डॉक्टर बनण्याची संधी मिळत आहे.

मे २०२२ मध्ये सुरू झालेली ही ई-लायब्ररी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी. आणि शिक्षणाधिकारी श्रीमती साधना सयाम यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी ठरली आहे.

या लायब्ररीत यूपीएससी, एमपीएससी, सीए, एमबीए, बँक आणि इतर स्पर्धा परीक्षा तसेच सीईटीची तयारी करणारे विद्यार्थी अभ्यास करतात. गेल्या दोन वर्षांत काही विद्यार्थ्यांनी यूपीएससीच्या नागरी सेवा परीक्षेतही यश मिळवले आहे, तर अनेक विद्यार्थ्यांना सरकारी नोकऱ्या मिळाल्या आहेत. आता ही लायब्ररी 'डॉक्टरांची लायब्ररी' म्हणून ओळखली जात आहे.

इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय आणि रेल्वे रुग्णालयातील एमबीबीएस, एमडी आणि एमएसचे विद्यार्थी अभ्यासासाठी या लायब्ररीला सर्वाधिक पसंती देत असतात. लायब्ररीत प्रवेश देताना विद्यार्थ्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी आणि कोणत्या परीक्षेची तयारी करत आहेत, याची माहिती घेतली जाते. यशस्वी विद्यार्थ्यांचा लायब्ररी कर्मचाऱ्यांकडून सत्कारही केला जातो. लवकरच या लायब्ररीमध्ये सौर ऊर्जा प्रणाली बसवण्यात येणार आहे, ज्यामुळे विजेची बचत होईल.

**लायब्ररीत उपलब्ध सुविधा**

या लायब्ररीमध्ये विद्यार्थ्यांसाठी अनेक सुविधा उपलब्ध आहेत, ज्यामुळे ती अल्पावधीतच लोकप्रिय झाली आहे: शांत आणि वातानुकूलित (एसी) वातावरण, लिफ्ट सुविधा, वीज खंडित झाल्यास जनरेटरची सोय, संगणक कक्ष आणि इंटरनेट, वायफाय सुविधा, दिव्यांगांसाठी विशेष अभ्यासिका आणि संगणक, विद्यार्थ्यांच्या जेवणासाठी उपहारगृह, व्याख्यानांसाठी सभागृह, प्रशस्त पार्किंग अशी सुविधा आहे.

**५० पेक्षा जास्त विद्यार्थी प्रतीक्षेत**

या लायब्ररीतील अभ्यासिकेत ३० विद्यार्थी बसू शकतात, तर कम्प्युटर लॅबमध्ये ६० अशी (१५ कॉमन संगणक, मुलांसाठी २०, मुलींसाठी २० आणि दिव्यांगांसाठी ५ संगणक) सुविधा उपलब्ध आहेत.

दरमहा ५० पेक्षा जास्त विद्यार्थी प्रतीक्षेत असतात. महानगरपालिकेकडून दिल्या जाणाऱ्या सुविधांसाठी विद्यार्थ्यांकडून १००० रुपये प्रतिमहिना (कॅश किंवा ऑनलाईन) शुल्क घेतले जाते. या शुल्कात अभ्यासिका, इंटरनेट, वायफाय, पुस्तके आणि विविध मासिके यांचा समावेश आहे.

**आरएफआयडी प्रणाली**

पुस्तकांची चोरी रोखण्यासाठी लायब्ररीमध्ये रेडिओ फ्रिक्वेंसी आयडेंटीफिकेशन (फ्ङ्खक्ष्ळ) प्रणाली बसवण्यात आली आहे, ज्यामुळे कर्मचा?यांच्या परवानगीशिवाय कोणतेही पुस्तक बाहेर नेता येत नाही.

ऑनलाइन नोंदणी असल्यामुळे कोणते पुस्तक कोणत्या विद्यार्थ्यांकडे आहे याची माहिती मिळत असल्याचे या ई-लायब्ररीचे प्रभारी रितेश मेश्राम यांनी सांगितले.एकुणच काय तर मनपाची ही ई लायब्ररी विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरली आहे.

## आता आयटीआयमध्ये सुरू होणार एआय, रोबोटिक्स, ड्रोन टेक्नॉलॉजी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

राज्यातील शासकीय आयटीआयमध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्रातील तरुण-तरुणींना आर्टिफिशियल इंटेलिजन्स, इंडस्ट्रियल रोबोटिक्स, ड्रोन टेक्नॉलॉजी यासारखे अत्याधुनिक अभ्यासक्रम शिकण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे. राज्यातील १,०९७ आयटीआयमध्ये सहा नवे तांत्रिक अभ्यासक्रम सुरू करण्याची घोषणा राज्याचे कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केली.

राज्यातील तरुणांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जागतिक स्पर्धेत उतरवायचे असेल, तर शिक्षण व्यवस्थेमध्ये काळाबरोबर बदल करणे आवश्यक आहे. त्यासाठी आयटीआयमध्ये पुढील अभ्यासक्रम सुरू केले जाणार असल्याचे लोढा म्हणाले.
सौरऊर्जा तंत्रज्ञ, इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञ, ड्रोन तंत्रज्ञ, थ्रीडी प्रिंटिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (अक), इंडस्ट्रियल रोबोटिक्स या कोर्सेसचा कालावधी ६ महिने ते २ वर्षांपर्यंत असणार आहे. हे अभ्यासक्रम तरुणांना उच्च पातळीवरील नोकरी व उद्योजकतेकडे घेऊन जाणारे ठरतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

६ जून या शिवराज्याभिषेक दिनी देशातील तरुणांमध्ये सामाजिक जाणीव, देशभक्ती व कर्तव्यभावना जागवण्यासाठी एक विशेष प्रसंग असतो. या दिवशी राज्यभरातील सर्व १,०९७ आयटीआयमध्ये एकाच वेळी विशेष व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे. या उपक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सकाळी १० वाजता होणार आहे.

व्याख्यानमालेचे विषय पुढीलप्रमाणे असणार आहेत. नागरिकांची कर्तव्ये व सामाजिक शिष्टाचार, कुटुंब प्रबोधन, स्वदेशी विचारधारा आणि संकल्पना, सामाजिक समरसता,पर्यावरण संरक्षण या सर्व विषयांवर संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

आता आयटीआय म्हणजे केवळ वेल्डिंग, इलेक्ट्रिशियनपुरते मर्यादित न राहता, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, रोबोटिक्स, आणि ड्रोनसारख्या भविष्यकालीन क्षेत्रात राज्यातील तरुणांना घडवण्याचे सरकारचे मोठे पाऊल असल्याचे स्पष्ट होत असून, महाराष्ट्र आता स्किल्सची राजधानी बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे दिसून येते.






# संधीची किंमत



**जगातल्या** कुठल्याही देशात जा, ते बायकांना चुकलेलं नाही. जगभरातल्या सर्व देशांतल्या घरकामाची सरासरी काढली तर बायका साडेचार तास घरकाम करतात, तर पुरुष त्यापेक्षा अर्धाच वेळ म्हणजे दोन ते अडीच तास जेमतेम घरकाम करतात. भारतात तर ही तफावत अधिकच जास्त आहे. सरासरी काढली तर भारतीय बायका रोज सहा तास घरकाम करतात, तर पुरुष फक्त एक तास. रोजचा स्वयंपाक, घराची स्वच्छता आणि देखरेख, घरातील लहान मुलांची काळजी, संगोपन, ज्येष्ठांची देखभाल, सेवा अशा काही गोष्टींचा समावेश असतो. त्यात देश जितका गरीब, जितका मागास तिथं स्त्रियांना पाणी भरण्यासाठी लांबच लांब जावं लागतं, डोक्यावरून पाणी आणण्यात, चुलीसाठी लाकूडफाटा गोळा करण्यात आणि कपडे धुण्यातच मुली/महिलांचा दिवसभरातला केवढा तरी वेळ वाया जातो. जगाच्या कुठल्याही टोकावर गेलात तरी प्रत्येक समाजात या कामांची जबाबदारी बाईवरच असते.

या आणि अशा अगणित लहानमोठ्या घरकामात बायका अडकून पडलेल्या दिसतात. घरकामासाठी आवश्यक त्या साधनांची/उपकरणांची/सोयींची कमतरता असल्यानं भाडी घासणं, चूल पेटवणं, कपडे धुणं, धान्य निवडणं अशा अनेक कामांमध्ये स्त्रियांचा दिवसभरातला बहुतेक सगळा वेळ जातो. त्यातून घरकाम ही पूर्णपणो स्त्नीचीच जबाबदारी आहे हेच घरातल्या आणि समाजातल्या सगळ्यांनी गृहीत धरलेलं असल्यानं 'तिनं' तेच करणं यात कुणाला काही गैर वाटत नाही. मात्र यात त्या बाईचा किती मौल्यवान वेळ वाया जातो, याचा कुणी विचारच करत नाही.

अनाचा दिवस पहाटे पाचला सुरू व्हायचा. सगळ्यांच्या आधी उठून ती पहिले चूल पेटवायची. मग नास्त्याची तयारी. मीही तिच्याबरोबर सकाळी पहाटे पाचला उठायचे. आम्ही दोघी मिळून विहिरीवर पाणी भरायला जायचो. साधारण एका बाजूनं चार किलोमीटर लांब डोक्यावर हंडे वाहून आणणं हे आफ्रिका आणि आशिया खंडात बायकांच्या वाट्याला रोजच येतं. साधारण सतरा अठरा लिटर पाण्याचा हंडा डोक्यावर घेऊन आना झपाझप चालायची. अर्थातच तिच्याइतकं पाणी मी वाहू शकले नाही. थोडंच पाणी आणलं तरी परत येईर्पयत मी पार थकून गेलेले असायचे. पण आना मात्न थकायची नाही. पुढची कामं तिची वाट पाहत असायची. पुन्हा दुपारच्या जेवणाची तयारी. स्वयंपाक झाला की पाठ टेकेल तर तेही तिला शक्य व्हायचं नाही. जेवणं झाली की आम्ही लाकूडफाटा आणायला जंगलात जायचो. विषारी विंचवापासून स्वत:चं रक्षण करत जळाऊ लाकूड गोळा करायचो. मग पुन्हा पाणी भरायचं, बक:यांचं दूध काढायचं आणि रात्नीच्या स्वयंपाकाला लागायचं. पहाटे पाच वाजता आना जी कामाला लागायची ती रात्नी १क् र्पयत. चंद्रप्रकाशात रात्नीच्या स्वयंपाकाची भांडी घासून झाली की तिचा दिवस संपायचा .

तिच्या घरी होते तेवढे दिवस माझंही हेच रुटीन होतं.

त्या दिवसांमध्ये मी रोज किती हजार पावले चालत होते?

आणि आना, ती तर आयुष्यभर माझ्या कितीतरी पट अधिक पावलं चालत होती, फक्त घरकाम करण्यासाठी. तिचं संपूर्ण आयुष्य घराला जेवू घालणं आणि पाणी भरणं यातच चालत होतं.

मी अशी जगभरातील बायकांची पावलं का मोजते आहे? का अशा छोट्या छोट्या गोष्टींचा हिशेब मांडतेय?

कारण केवळ बायकांनीच फक्त घरकाम करत राहणं यासारखी धोकादायक गोष्ट आजच्या काळात दुसरी कुठलीही नाही. आणि कामाच्या या नसलेल्या विभागणीचा धोका जसा बायकांना आहे तसाच तो पुरुषांना, मुलांना आणि मुलींनाही आहे.

## वेळ नाही म्हणून संधी नाही?

अर्थशास्त्रज्ञ याला संधीची किंमत म्हणतात. म्हणजे, जितका वेळ स्त्रिया घरकामात घालवतात तो वेळ जर कमी करता आला तर तो वेळ स्त्रिया इतर इतर गोष्टींसाठी देऊ शकतील. त्यांच्याकडे सध्या वेळ नाही त्यामुळे त्यांना संधीही नाही. तो वेळ मिळाला तर दिवसाला एक तास मोकळा मिळाला किंवा आशिया-आफ्रिका खंडातल्या स्त्रियांना समजा दिवसातून पाच तास मोकळे मिळाले, नुस्त्या घरकामातून सुटका मिळाली तर त्या काय करतील? कुणाला नोकरी करायची असेल, एखादीला स्वत:चा व्यवसाय सुरू करायचा असेल, कुणाला काही समाजोपयोगी काम करायचं असेल किंवा कुणाला काहीच वेगळं न करता स्वत:साठी वेळ द्यायचा असेल. जग बघायचं असेल. गरीब देशातल्या मुली कदाचित हा वेळ शिक्षणासाठी देतील. आनाची मुलगी ग्रेस सगळ्यात शेवटी झोपायची, कारण घरकामात आईला मदत केल्यानंतर ती गृहपाठ करायला बसायची. तोवर रात्नीची निजानीज झालेली असायची. तसंही घरातल्या कामांची जबाबदारी आईनंतर मुलीवरच येते. बहुतेक घरात अभ्यासाच्या आधी घरकामालाच प्राधान्य असतं.

काही स्त्रिया कदाचित निवांत वाचत बसतील, किंवा मैत्रिणीकडे जातील, फिरायला जातील.

हरकत नाही. माझा त्यांनाही तितकाच पाठिंबा आहे.

कारण आपला दिवस मनासारखा गेला, काहीतरी छान केलं, नवीन केलं याचं समाधान वाटण्यासारखं सुख नसतं. आणि घरकामही जेव्हा वाटलं जातं तेव्हा आपण एकटीनंच राबतोय ही भावना स्त्नीला त्नास देत नाही.

घरकामासारखे विनामोबदला काम हे काम आहे, हे मान्य करणं हेच अजून अनेक देशांत एक मोठं काम आहे. कारण ते काम जरी कुटुंबासाठी असलं तरी ते काम आहे आणि त्यासाठी वेळ, शक्ती, ऊर्जा द्यावीच लागते. हा एकूण वेळ आणि ऊर्जा कशी वाचवता येईल हा दुसरा टप्पा. सगळ्यात महत्त्वाचं आणि सगळ्यात अवघड म्हणजे कामाची पुनर्विभागणी. याचाच अर्थ पुरुषांची घरकामात मदत. विनामोबदला घरकाम हे मोठं

> काही स्त्रिया कदाचित निवांत वाचत बसतील, किंवा मैत्रिणीकडे जातील, फिरायला जातील. हरकत नाही. माझा त्यांनाही तितकाच पाठिंबा आहे. कारण आपला दिवस मनासारखा गेला, काहीतरी छान केलं, नवीन केलं याचं समाधान वाटण्यासारखं सुख नसतं. आणि घरकामही जेव्हा वाटलं जातं तेव्हा आपण एकटीनंच राबतोय ही भावना स्त्नीला त्नास देत नाही. मी हे सगळं लिहितेय कारण मी आशावादी आहे. आजही जगातल्या कुठल्याही देशाने, समाजाने स्त्नी-पुरुषांच्या घरकामाच्या विभागणीचा समतोल साधलेला नाही. पण अनेक देशांमध्ये स्त्नी आणि पुरुषांच्या विनामोबदला कामाच्या तासांमधली दरी पुष्कळ कमी झालेली आहे. अमेरिका, युरोपमध्ये घरकामांच्या तासातली दरी बरीच कमी झालेली आहे.





वेळखाऊ काम आहे हे विकसित देशांनी पहिले मान्य केलं आहे. दुसरं म्हणजे, या कामांपायी खर्च होणारी ऊर्जा आणि वेळ त्यांनी वाचवला आहे. त्यासाठीच तर अमेरिकेसारख्या देशात ट्रायंगल किचन आले. पाणी रोज उठून भरावं लागत नाही. गॅस आहे, चूल-लाकूडफाटा हे सगळं गेलं. कपडे धुणं हे कामच उरलं नाही कारण मशीन अर्धा तासात कपडे धुऊन टाकतं.

म्हणजे काही सोयी उपकरणांच्या आल्या, काही बदलत्या समाजाच्या नी काही तंत्रज्ञानाच्या मदतीच्या, पण त्यातून काम कमी झालं.

गरीब, मागास देशात या सुविधा उपलब्ध व्हायला हव्यात.

या प्रश्नावर उपाय शोधायला हवेत. आणि इनोव्हेशन, कल्पक शोध यातच या समस्यांचं उत्तर मिळू शकेल. स्वस्त वीज, चांगले रस्ते, नळाला पाणी यासारख्या गरजा भागल्या पाहिजेत. विना वीज, कमीत कमी पाण्यात कपडे धुणारं एखादं वॉशिंग मशीन का असू नये?

अशी साधनं बायकांच्या हाती असायला हवीत. ती त्यांनी वापरायला हवीत.

आणि ती रीत बदलणं हा सोपा प्रश्न नाही.

नव्यानं बाबा झालेले कितीजण पगार देणा:या नोकरीतून जरा सुट्टी घेऊन घरी थांबतील, डायपर बदलतील, त्या काळात घरकाम करतील आणि त्यानंतर 'बाबा' असल्याची जबाबदारी घरातही उचलत राहतील, हा मुद्दा आहे. त्यातून कदाचित त्यांचं आणि त्यांच्या मुलांचं नातं अधिक घट्ट होईल.

आईनं मूल सांभाळणं आणि वडिलांनी फक्त नोकरी करणं हे आपण 'नॉर्मल' समजतो. हे 'नॉर्मल' नाही हे मान्य करणं आणि ते बदलणं हा बदल आहे. वडिलांनी गळ्यात ॲप्रन बांधून स्वयंपाक करणं, मुलांना शाळेत घ्यायला जाणं, मुलांचा लंचबॉक्स भरून त्यात एक गोड चिठ्ठी ठेवणं हे सारं वेगळं तर असेलच पण त्यानं जे काम वाटलं जाईल, त्यातून नातं बहराला येऊ शकतं.

घरकामाला हात लावण्याची, ते वाटून घेण्याची तयारी पुरुषांनी दाखवली, बायकांनी तसं थोडंबहुत काम त्यांना करू दिलं तर प्रत्येक जण स्वत:साठी, स्वत:च्या गरजांसाठी

# चेहऱ्यावरचे नको असलेल्या केसांपासून सुटका मिळवा घरच्या घरी!

**तुमच्या चेहऱ्यावर नको असलेले अधिक केस असतील तर त्यामुळे तुमचं सौंदर्य फिकं वाटत असेल... ही समस्या तुमचा आत्मविश्वासही कमी करू शकते. घाबरु नका... हीच समस्या अनेकांना असते... आणि त्यावर साधे-सोप्पे उपायही आहेत.**

ही समस्या उद्भवते ती तणावामुळे... काही वेळा ही समस्या अनुवांशिक असते तर काही वेळा असंतुलित हॉर्मोनल्समुळेही चेहऱ्यावर केस दिसून येतात.

यासाठी तुम्ही अनेकदा ब्लिच केलं तर चेहऱ्यावरचं खराखुरं तेज निघून जाऊ शकतं. शिवाय, नेहमी-नेहमी थ्रेडिंग किंवा वॅक्सिंग करणंही शक्य नसतं... अशा वेळी काही घरगुती उपाय वापरून तुम्ही या समस्येपासून मुक्ती मिळवू शकता.



### संत्र्याची साल आणि दह्याची पेस्ट

संत्र्याची साल त्वचेसाठी खूप फायदेशीर ठरते. याच्या वापरामुळे चेहरा तजेलदार दिसतो. सोबतच चेहऱ्यावर दिसणारे केसही विरळ होत जाता. जर तुम्हाला आणखी परिणामकारक उपाय हवा असेल तर संत्र्याच्या सालांत दही आणि लिंबाच्या रसाचे काही थेंब टाकून ही पेस्ट दररोज चेहऱ्याला लावा. यामुळे, तुमची पिंपल्सपासूनही सुटका होईल.

### पपई आणि हळदीची पेस्ट

पपई हा एक नॅचरल ब्लीच आहे. याच्या वापरानं चेहऱ्याचा रंग उजळतोच पण चेहऱ्यावरील नको असलेल्या केसांचा रंगही हलका होऊन जातो. तुम्हाला हवं असल्यास पपईत थोडी हळदही मिसळून ही पेस्ट दररोज चेहऱ्याला लावू शकता. ही पेस्ट वापरताना थोड्या वेळ पेस्टनं चेहऱ्याला मसाज करा आणि त्यानंतर १५-२० मिनिटे ही पेस्ट चेहऱ्यावर तशीच ठेवा... आणि मग चेहरा पाण्यानं धुवून घ्या... परिणाम तुम्हाला दिसून येईल.

### लिंबूचा रस आणि मध

चेहऱ्यावरच्या केसांचा रंग हलका करण्यासाठी आणि चेहरा तजेलदार बनवण्यासाठी मध आणि लिंबूचा रस मिसळून चेहऱ्याला लावा. रोज हे मिश्रण कमीत कमी १० मिनिटांपर्यंत चेहऱ्यावर लावून ठेवा. काही दिवसांतच तुम्हाला याचे फायदे लक्षात येतील.

### टोमॅटोचा रस

याशिवाय तुम्ही दररोज जेवणात वापरणारा टोमॅटोही चेहऱ्यासाठी वापरू शकता. टॉमेटो थोडा कापून किंवा त्याची पेस्ट बनवून त्यानं चेहऱ्याला थोडा वेळ मसाज करा... पेस्ट थोड्या वेळ लावून ठेवा... आणि त्यानंतर चेहरा पाण्यानं धुवून घ्या.

# जेवणानंतर गोष्टी टाळा



अनेकांना जेवण झाल्यावर झोपणे, आंघोळ करणे, चहा पिण्याच्या सवयी असतात. मात्र याच सवयी तुमच्या शरीरासाठी धोकादायक असतात. या आहेत पाच गोष्टी ज्या जेवण झाल्यानंतर कधीही करु नका

झोपू नका - दुपारच्या जेवणानंतर काहींना झोपण्याची सवय असते. मात्र ही सवय तुमच्या शरीरासाठी चांगली नाही. पोटभरुन जेवल्यानंतर लगेचच झोपल्यास त्या जेवणाचे नीट पचन होत नाही. त्यामुळे जेवणानंतर झोपू नये.

नो स्मोकिंग - जेवणानंतर अनेकदा पुरुषांना स्मोक करण्याची सवय असते मात्र ही सवय लगेचच सोडून द्या. जेवणानंतर सिगारेट पिणे म्हणजे १० सिगारेट पिण्यासारखे आहे.

आंघोळ करु नका - जेवणानंतर कधीही लगेचच आंघोळ करु नका. यामुळे अन्नपचन व्यवस्थित होत नाही.

शक्यतो फळ खाऊ नका - प्रत्येक फळाचा पचनक्रियेचा कालावधी वेगवेगळा असतो. शक्यतो जेवणाआधी एक तास अथवा जेवणानंतर दोन तासांनी फळ खाणे चांगले.

चहा पिऊ नका - जेवणानंतर चहा प्यायल्याने ॲसिडिटीचे प्रमाण वाढते. त्यामुळे किमान जेवणानंतर एक ते दोन तास तरी चहा पिऊ नये.

# तुम्हाला ही ऑफिसमध्ये झोप येते का ?


जर तुम्हाला ही ऑफिसमध्ये काम करतांना झोप येत असेल तर त्यासाठी तुम्ही काय खाता हे जबाबदार आहे. समोसे, पिज्जा आणि इतर फास्टफूड झोप येण्यामागचं खरं कारण आहे.

नुकत्याच केल्या गेलेल्या एका सर्वेक्षणानुसार जे पुरुष चरबी अधिक असणारे पदार्थ खातात ते लोक रात्री कमी झोपतात आणि दिवसा त्यांना अधिक झोप येते.

ऑस्ट्रेलिया मधील एका युनिवर्सिटीने केलेल्या सर्वेक्षणानुसार, जे लोकं फास्टफूड अधिक खातात त्यांच्यामध्ये अनेक विकार वाढतात. झोप कमी झाल्यामुळे विकार अधिक वाढतात आणि झोप कमी होण्यामागे हे फास्टफूड अधिक जबाबदार असतात.

चांगल्या आरोग्यासाठी चांगली झोप आणि चांगला आहार अधिक महत्त्वाचा आहे. त्यामुळे यावर अधिक भर दिला पाहिजे. ३५ ते ४० वयाच्या लोकांवर केल्या गेलेल्या या सर्वेक्षणात झोप आणि आहार हेच विकारांना अधिक आंमत्रित देत असल्याचं दिसलं.

# देवरंजनचा 'शिवबाचा छावा' कला रसिकांना विशेष भावला



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

दामिनी क्रिएशन द्वारे येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात काल समर कॅम्पचे विशेष आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पमधे देवरंजन बहुउद्देशीय संस्थेद्वारे चिन्मय प्रविण देशकर लिखित व दिग्दर्शित *शिवबाचा छावा* ही नृत्य नाटिका सादर करण्यात आली.

नागपुरातील सर्व नृत्य दिग्दर्शकांसाठी आयोजित सदर कार्यक्रमात नागपुरातील जवळपास ५० हून अधिक नृत्य दिग्दर्शकांच्या विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केली. देवरंजन बहुउद्देशीय संस्थेतर्फे शिवबाचा छावा ही एकमेव नृत्य नाटिका सादर करण्यात आली . शिवाजी महाराजांच्या निधनानंतर छत्रपती संभाजी महाराजांनी राज्याची धुरा सांभाळली .

परंतु गणोजी आणि कणोजी यांच्या फितुरीमुळे संभाजी महाराजांना अटक होते. औरंगजेब त्यांचा अतोनात छळ करून कवी कलश व संभाजी महाराजांची हत्या करतो. त्यानंतर राज्याची धुरा संभाजी महाराजांचा भाऊ राजाराम यांची पत्नी ताराराणी हाती घेते. व मुघलांशी लढा देते. तब्बल साठ कलावंतांनी यात वेगवेगळ्या भूमिका केल्या.

संभाजीची मुख्य भूमिका चिन्मय प्रविण देशकरने दमदारपणे साकारली. ताराराणीच्या भूमिकेत मृणालिनी देशकर हिने रंग भरला. औरंगजेबच्या भूमिकेत प्रा. अजय वेखंडे तर कवी कलशच्या भूमिकेत राजेश चवडे यांनी प्रेक्षकांची विशेष दाद मिळिवली.

नृत्य नाटिकेची संकल्पना प्रवीण देशकर यांची तर निर्मात्या समाप्ती देशकर होत्या. डॉ. नरेश गडेकर आणि डॉ. रवींद्र भुसारी यांचे नृत्य नाटिकेस विशेष मार्गदर्शन लाभले.

# भूमी अभिलेख कर्मचारी अनिश्चित कालीन संपावर

■ महासागर प्रतिनिधी,
कामठी, दि. ४ : कामठी तालुक्यातील भूमि अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी २६ में २०२५ पासुन तांत्रीक वेतन श्रेणी आणि इतर प्रलंबित मागण्यांकरिता बेमुदत संपाला सुरूवात केली आहे .या संपात कर्मचारी मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्याने मोजणी व इतर दैनंदिन कामकाजात परीणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही . शासनाने या विभागाच्या कर्मचाऱ्याच्या मागण्यांकडे वेळेवर लक्ष न दिल्यामुळे भूमि अभिलेख कर्मचाऱ्यांचा असंतोष वाढला आहे .

सुधांशु समितीने दिलेला अहवाल तात्काळ मंजुर करुन तांत्रीक वेतन श्रेणी लागू करावी अशी त्यांची प्रमुख मागणी आहे .२०१२ पासुन शासनाने सेवा भरती नियमांत बदल करुन तांत्रीक पात्रता अनिवार्य केली आहे . सध्या बी ई सिव्हिल व डिप्लोमा इंजिनियरची नेमणुक केली जात आहे .



तरीही तांत्रिक वेतनश्रेणीचा प्रश्न अजुनही प्रलंबित आहे .दरम्यान कर्मचाऱ्याच्या संपामुळे कामे खोळंबल्याने नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे .या संदर्भात शासनाने त्वरीत पावले उचलावीत अशी मागणी होत आहे . कामठी भूमि अभिलेख कार्यालयातील शितल खंडारे , नितीन धात्रक , थोटे , स्मिता तावडे , बी . सी .लोही , गजानन तावडे , भलावी , राठोड , एच .आर .वैद्य , ललिता वासुलकर , ताराचंद वैद्य , प्रदीप बहल , विजय डहाके सहित अन्य कर्मचारी संपात सहभागी असल्याचे कळते .

## सेवा काळात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार

**सावनेर:** सावनेर नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या अग्निशमन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी रात्र बेरात्र आपली जिवाची पर्वा न करता आगेत गांवचे गांवे भष्म होण्यापासून बचावले एवढेच नव्हे तर अनेक कुटुंबांचे जिव वाचविले या निष्ठावंत कर्मचारी व अधिकारी यांच्या शुक्रवार ला उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय सावनेर येथे सहायक पोलिस अधीक्षक अनील मस्के यांनीशाल, श्रिफळ व प्रशिस्तीपत्र देवुन सत्कार करण्यात आला यावेळी पोलीस निरीक्षक उमेश पाटील, पीएसआय गेडाम, पीएसआय बालु राठोड, पीएसआय निंबाळकर स्वास्थ्य विभाग प्रमुख कोलते, बांधकाम विभाग प्रमुख अभियंता गावंडे कार्यालयीन अधीक्षक देवेंद्र कले खजानजी निकोसे प्रामुख्याने उपस्थित होते यावेळी अग्निशमन अधिकारी .. तुषार सुखदेवे , अग्निशमन कर्मचारी.. प्रेमचंद चवारे , जितु जिवतोडे, सुरज ढोके , मंगेश टेकाडे, कृणाल बांबल , शुभम गोलाईत याच्या सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक खुपीया प्रमुख सुनील तलमले यांनी केले

## ११ वर्षीय अल्पवयीन मुलीचा विनयभंग



**कामठी:** पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीत राहणाऱ्या फिर्यादी यांनी त्यांच्या टीव्ही बिघडल्याने आरोपी तनवीर अली शाबिर हुसैन वय ३७ वर्ष राहणार हैदरी चौक यास टीव्ही दुरुस्ती करिता आपल्या घरी बोलविले होते आरोपीने टीव्ही उघडून चेक केला व सामान आणण्याकरिता फिर्यादीस चिठ्ठी लिहून दुकानात पाठविले व त्या दरम्यान फिर्यादींची ११ वर्षीय अल्पवयीन मुलीला एकटी पाहून तिच्यासोबत अश्लील कृत्य करून तिचे मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून विनयभंग केला मुलीने याबद्दल फिर्यादी यांना सांगितले असता फिर्यादी मुलीचे वडील यांनी जुना पोलीस ठाणे येथे आरोपी विरुद्ध तक्रार नोंदवली असून फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपी विरुद्ध पोस्को ॲक्ट अंतर्गत गुन्हा नोंदवून आरोपीला अटक करण्यात आले असून पुढील तपास पोलीस करीत आहे

## पार्थ चनापेची आयआयटी मुंबईसाठी निवड



**वाडी :** दत्तवाडी येथील गजानन सोसायटीतील रहिवासी पार्थ चेतन चनापे याने राष्ट्रीय स्तरावरील जेईई ॲडव्हान्स्ड मेन परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत आयआयटी मुंबई मध्ये प्रवेशासाठी पात्रता मिळवली आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते गोविंदराव रोडे , माजी प्राचार्य पुरुषोत्तम कोठे यांनी सांगितले की, पार्थ चनापे यांनी केंद्रीय विद्यालय अंबाझरीमधून बारावीत ९५ टक्के आणि जेईई मेन परीक्षेत ९९ टक्के गुण मिळवून जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेसाठी पात्रता मिळवली. ॲडव्हान्स परीक्षेचा निकाल नुकताच राष्ट्रीय स्तरावर जाहीर झाला ज्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्यानंतर पार्थला मुंबईतील आयआयटी अभ्यासक्रमात प्रवेशासाठी पात्र घोषित करण्यात आले.

पार्थ चनापे याच्या उत्कृष्ट निकालाबद्दल हर्षल काकडे, प्रेमनाथ झाडे, संतोष नरवाडे, आनंदबाबू कदम,कैलाश मंथापूरवार, नरेश चरडे, कमल कनोजे,संतोष केचे, रूपेश झाडे, मधु माणके पाटील, विजय मिश्रा, कपिल भलमे, अखिल पोहणकर, क्रांतीसिंग,योगेश चनापे, कल्पना सगदेव , डॉ.पल्लवी राणे,शिक्षिका सीमा चौधरी ( महल्ले ),प्रवीण महल्ले, प्रा. जयश्री चनापे आदींनी अभिनंदन केले आहे.

# येरल्यात महसूल समाधान शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ४ : येरला येथे महाराष्ट्र शासन महसूल विभाग व तहसील कार्यालय नागपूर ग्रामीण यांच्या वतीने 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान' अंतर्गत विशेष महसूल समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले.शिबिराचे उद्घाटन ग्रामपंचायत सरपंच अनिल काळमेघ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच राजेंद्र अखंड,नायब तहसीलदार हटवार, मंडळ अधिकारी झाडे, तलाठी किशोर चौधरी, पोलिस पाटील संजय रेवस्कर, पारडी व खडगाव येथील पोलिस पाटील, तसेच कळमेश्वर पोलिस स्टेशनचे प्रतिनिधी आजबळे व मोहाडीकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी ॲग्रीस्टॅक शेतकरी नोंदणी, सेतू विभागातर्फे देण्यात येणाऱ्या सर्व सेवा इन्कम, कास्ट, डोमेशीअल , राशन कार्डची कामे, निराधार योजना, नागपूर तहसील कार्यालयाशी संबंधित विविध सामाजिक योजना, महसूल विषयक प्रलंबित प्रकरणे, पोलिस विभाग व ग्रामपंचायत विभागाशी निगडित प्रश्नांचे तातडीने निवारण करण्यात आले.

शिबिरात ग्रामस्थांनी आपल्या समस्या मांडत सकारात्मक प्रतिसाद मिळवला. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी परिक्षीत बोराडे, ग्रा.पं.सदस्य प्रशांत तभाने, लता कुंभरे, कल्पना हेलोंडे, पूनम दहात, ललिता टेकाम , ग्रामपंचायत कर्मचारी बाळा तायवाडे, सचिन वाडी, गणेश जुनघरे, आशा वर्कर झाडे, अंगणवाडी सेविका , मदतनीस यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# भारतीय लोककलाकार संघटनेचे पालकमंत्र्यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ४ : भारतीय लोककलाकार सांस्कृतिक संघटनेच्या वतीने विविध मागण्यांसाठी एक सुसंगठित निवेदन नागपूरचे पालकमंत्री तथा राज्याचे राजस्व मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांना सादर करण्यात आले. या निवेदनाच्या प्रसंगी मोठ्या संख्येने ग्रामीण आणि शहरी भागातील लोककलाकार आणि नागरिक उपस्थित होते.



संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश गरीबाजी काळे गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली हे निवेदन देण्यात आले.

कलाकारांनी आपल्या समस्या आणि व्यथा पालकमंत्री महोदयांसमोर सविस्तरपणे मांडल्या. मुख्यतः लोककला आणि पारंपरिक कलाकारांना मिळणारी शासकीय मदत, त्यांचे मानधन, सामाजिक सुरक्षा, आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये संधी यासारख्या मुद्द्यांचा यात समावेश होता.

पालकमंत्री बावनकुळे यांनी कलाकारांच्या सर्व मागण्या काळजीपूर्वक ऐकून घेतल्या आणि सकारात्मक विचार करून त्या सोडविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की पारंपरिक लोककला ही आपल्या संस्कृतीचा अमूल्य ठेवा असून, कलाकारांचे योगदान फार मोलाचे आहे.

त्यामुळे त्यांच्या अडचणी सोडविण्यास प्राधान्य दिले जाईल. यावेळी संघटनेचे सचिव अनिल पारखी, ज्ञानेश्वर पाटील, वामनराव बरबत, सविता गडकिने, अश्विनी बोबडे, मीनाक्षी मिश्रा, गायिका पल्लवी नगराळे, आश्विन चंदेल, योगिता नवखरे, भूमिका वाघमारे, माधुरी कळसकर, सुकन्या थडकर, जयश्री सलोटे, कौशल्या मरबटे, पुषा मेश्राम, मंदा कांबळे, लता मेश्राम, रेखा मेश्राम, वंदना कथका, शीतल देवगिकर, प्रीती समरीत, निशा राठोड, कल्पना वंजारी, बंडू डहाके, रामकृष्ण सोते, शेषराव मेश्राम, अरुण ठवरे, रवींद्र भोयर, नंदकिशोर कावडे, शंकर कडोनी, ज्ञानेश्वर कठोली, ग्यानबा कठोले, मनोरमा दहिवले, निर्मला वांगुळकर, नंदा दुबे, प्रभा बनते, शोभा ठाकरे, कांता ढोबळे, मुक्ता चौधरी, बेबी सरातकर, ललिता बोबडे, निरंजन आधाऊ, पुष्पा कामफोडे, निरंजन होले, वंदना पाटील, सरिता गोंडाणे, सोनू गठाडे, अनुसयाताई, नलू साहरे, साक्षी सहारे, अलका वानखेडे, जशोदा बोबडे, सुमित्रा ताई, उपास शेंडे, सचिन भोयर, गजानन वाकडे, अशोक दहाके, अशोक सुदाम, मायाताई सोमकुवर, माधुरी हरणे, ममता ठाकरे, साधना डहाके, रेखा वाघ, वनिता डहाके, विनायक तितरमारे, बबन डफफरे व छाया भोयर आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीपणे पार पडले असून, या निवेदनामुळे लोककलाकारांच्या प्रश्नांना प्रशासनाचे लक्ष वेधले गेले आहे. संघटनेच्या वतीने कलाकारांच्या हक्कासाठी सुरू असलेला हा लढा अधिक जोमाने पुढे नेण्यात येणार असल्याचे अध्यक्ष प्रकाश काळे गुरुजी यांनी यावेळी सांगितले.

# मध्य रेल्वे, नागपूर विभागातर्फे आंतरराष्ट्रीय समपार फाटक जनजागृती दिनाचे औचित्य साधून सुरक्षा जनजागृती मोहीम

## कलमणा-कोहळी विभागात आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

आंतरराष्ट्रीय समपार फाटक जनजागृती दिन निमित्त, मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातर्फे ४ जून २०२५ रोजी कलमणा-कोहळी विभागातील ड्उ-२८१था समपार फाटकाशी संबंधित ठिकाणी विशेष सुरक्षा जनजागृती मोहीम राबवण्यात आली. ही मोहीम मंडळ रेल्वे व्यवस्थापक श्री. विनायक गर्ग यांच्या नेतृत्वाखाली आणि मंडळ सुरक्षा अधिकारी श्री. सतीश कुमार जायसवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या उपक्रमाचा उद्देश म्हणजे रस्त्याने प्रवास करणाऱ्या नागरिकांना मानवी आणि अमानवीय समपार फाट्यांवर असुरक्षित वर्तनामुळे होणाऱ्या धोका व अपघातांपासून सावध करणे हा होता.

मंडळ सुरक्षा अधिकारी आणि सुरक्षा सल्लागारांनी समपार फाटकाचे प्रत्यक्ष निरीक्षण करून प्रवासी व पादचाऱ्यांशी संवाद साधला. जनजागृतीसाठी पत्रके व स्टीकर्सचे वितरण करण्यात आले. सुमारे १७२ नागरिकांना सुरक्षित समपार फाटक पार करण्यासाठी सूचना व सल्ला देण्यात आला. ही मोहीम ड्डथांबा, बघा आणि ऐकाड्ड या मंत्रावर आधारित होती. निष्काळजीपणामुळे उद्भवू शकणाऱ्या गंभीर परिणामांबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली.



मध्य रेल्वे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी जनजागृती, प्रचार मोहिमा आणि पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी सातत्याने कटिबद्ध आहे.

## लिमिटेड हाइट सबवेच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा संपर्क सुलभ

**नागपूर, दि. ४ :** मध्य रेल्वेच्या नागपूर विभागामार्फत ग्रामीण संपर्क व सार्वजनिक सुरक्षेमध्ये लक्षणीय सुधारणा घडवून आणण्यासाठी विविध ठिकाणी लिमिटेड हाइट सबवे (एलएचएस) चे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. या सबवेमुळे मानवी व अ-मानवीसमपार फाटे रद्द करता येतील, बेकायदेशीर ओलांडण्यास प्रतिबंध होईल आणि शेतकरी व ग्रामस्थांची वाहतूक सुरळीत राहील. एलएचएस-२३,मोर्शी, अमरावती येथे (रिधपूर ते डाबेरी व बेलोरा जोडणारा) बॉक्स पुशिंगचे काम पूर्ण झाले आहे. उत्केड, मोर्शी (किमी ७२२/१००-२००) येथे असलेला एलएचएस, जो अतिक्रमणासाठी प्रसिद्ध होता, अंतिम टप्प्यात आहे आणि लवकरच वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे. एलएचएस-४० मोर्शी (मयवाडी गाव ते दापोरी व पाळा) यशस्वीरित्या सुरू करण्यात आला असून समपार फाटा बंद करण्यात आला आहे, ज्यामुळे सुरक्षिततेत वाढ झाली आहे. एलएचएस-४६, वरुड (उमरखेड ते शेतामध्ये) अंतिम टप्प्यात असून लवकरच वाहतुकीसाठी सुरु केला जाईल. एलएचएस-४९, वरुड (जारुड ते लोणी व शेत जोडणारा), हा रोड ओव्हर ब्रिज (आरओबी) च्या ऐवजी हलक्या वाहनांसाठी वापरण्यात येणार असून, त्याचे बॉक्स पुशिंग पूर्ण झाले असून रस्त्याचे काम सुरू आहे. तो डिसेंबर २०२५ पर्यंत कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. एलएचएस-५०,वरुड (शाहापुर ते शेती) या मार्गावर बॉक्स पुशिंगचे काम पूर्ण झाले आहे.

# दहावी व बारावीच्या १४० विद्यार्थ्यांचा गौरव



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ४ : दत्तवाडीतील सदाचार भवन येथे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) उद्योग व व्यापार विभागाच्या वतीने दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन मेळावा गुरुवार, २९ मे रोजी उत्साहात पार पडला.

वाडी, डिफेन्स, दवलामेटी, वडधामना परिसरातील विविध शाळांमधून उत्कृष्ट गुण मिळवणाऱ्या १४० विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह, पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र आणि मिठाई देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री रमेशचंद्र बंग, माजी आमदार विजय घोडमारे व माजी नगराध्यक्ष प्रेमनाथ झाडे माजी प्राचार्य पुरुषोत्तम कोठे यांच्या हस्ते झाले. या वेळी व्यासपीठावर प्रदेश उपाध्यक्ष मोहन ठाकरे, जिल्हाध्यक्ष अब्दुल रहमान अब्दुल अमीर, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रशेखर येवले, जिल्हाध्यक्ष अशोक पैदलवार , जिल्हा संघटन सचिव साहेबराव बोवाडे, कार्याध्यक्ष हिम्मत गडेकर, सुनंदा ठाकरे, माधुरी बोदुले, प्रवीण सिंह आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. नरेंद्र भुसारी यांनी योग्य अभ्यासक्रम निवड, यशाचे ध्येय ठरविणे, मोबाईलचा मर्यादित वापर आणि आत्मविश्वास वाढवण्यावर भर दिला. प्रास्ताविकतेतुन माजी प्राचार्य पुरुषोत्तम कोठे यांनी नवीन शैक्षणिक धोरण व शिक्षणाचा पुढील ठप्पा यावर माहीती दिली. संचालन संगीता चंद्रशेखर येवले यांनी तर आभार अविनाश चौधरी यांनी मानले.

कार्यक्रमाचे आयोजन मोहन ठाकरे , अब्दुल रहमान अब्दुल अमीर ,अशोक पैदलवार यांनी केले. आयोजनासाठी ममता सिंग, भावना गोरडे, तारा घरडे, मुकुंदा पारधी, मनीष टेंभरे, रजनी माहुरे, रत्नमाला मल्लेवार, मीनाक्षी डायगव्हाणे, सुनीता चौधरी, सोनाली डोंगरे, संगीता मस्के, ममता चौधरी, भारत चोखांद्रे, कैलास चोखांद्रे, भूषण टेकाडे, गुणवंत देशभ्रतार, राकेश स्वामी, अविनाश चौधरी, प्रभाकर घोडमारे, सचिन मने, प्रल्हाद उजाड आदींनी सहकार्य केले.

## एमआयएतर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण



**नागपूर, ४ जून:** एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशन (एमआयए)तर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गुरुवार, ५ जून २०२५ रोजी वृक्षारोपण व स्?वच्?छता मोहित राबवणार आहे. सकाळी ९:३० वाजता एमआयए कार्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम होणार असून त्यानंतर सेंट झेवियर स्कूल ते पीआयएक्स ट्रान्समिशन फॅक्टरी पर्यंतच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शनाखाली नगर पंचायत आणि ग्रामपंचायतीच्या सक्रिय सहकार्याने हा पर्यावरणपूरक उपक्रम राबवला जात आहे. एमआयएचे सचिव अरुण लांजेवार यांनी सर्व उद्योगपती आणि कर्मचाऱ्यांना या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# सूचीमुळे वाङ्मयाचे होते शुद्धीकरण : डॉ. अक्षयकुमार काळे

## युगवाणी साहित्य सूचीचे थाटात प्रकाशन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :

वेगवेगळ्या विषयांवरील सूची तयार करताना वाङ्मयाचे अनावश्यक भाग गाळला जातो. त्यामुळे वाङ्मयाचे शुद्धीकरण होते. विशिष्ठ विषयाच्या अभ्यासकांकरीता सूची ही मशालीच्या काम करते, असे विचार ज्येष्ठ समीक्षक डॉ. अक्षयकुमार काळे यांनी व्यक्त केले. विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथासहवासमध्ये मंगळवारी विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र असलेल्या युगवाणीत प्रकाशित झालेल्या साहित्याच्या सूचीचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तसेच ज्येष्ठ समीक्षक डॉ. अक्षयकुमार काळे, साहित्यसूची चे संपादक डॉ. स्वप्नील देशमुख आणि युगवाणीचे संपादक प्रफुल्ल शिलेदार उपस्थित होते. अक्षयकुमार काळे सूचीचे महत्व सांगताना म्हणाले, सूची म्हणजे आपल्याला वाङ्मयाच्या ज्या दालनात जायचं आहे त्याची किल्ली आहे. सूची ही मार्गदर्शकाचे काम करते. कथा ग्रंथ आणि नियतकालिक यांचा उल्लेख असलेल्या वर्णक्रमांक सह आणि पृष्ठ क्रमांकासह माहिती असणं,



म्हणजे सूची. अनादी काळापासून ज्ञान संवर्धनाची, ज्ञान निर्मितीची आपली परंपरा आहे. ज्ञानाचा संग्रह हा कुठे आणि कसा आहे, यासाठी या सूचीची निर्माण झालेली आहे. सूचिकार बनणं सामान्य गोष्ट नाही, त्याची एक वेगळी घडणं आहे. सूचिकारामध्ये विशिष्ठ तांत्रिक कौशल्य हवे, ज्या ग्रंथाची सूची करायची आहे, त्या ग्रंथाची सगळी माहिती असने गरजेचं आहे, यासाठी उत्तम प्रकारची निर्णय क्षमता असायला पाहिजे. सूचीकारामध्ये निष्कर्ष काढण्याची क्षमता असली पाहिजे, इत्यादी सूचिकाराचे गुण त्यांनी यावेळी सांगितले. प्रास्ताविकात प्रफुल्ल शिलेदार यांनी, युगवाणी हे मराठीतील एकमेव दीर्घकाळ चालणारे वाङ्मयीन नियतकालिक असल्यामुळे त्याचे अधिक महत्त्व आहे. युगवाणीची ही सूची अभ्यासकांकरिता खूप उपयोगाची ठरणार आहे, असे ते म्हणाले. मनोगत व्यक्त करताना स्वप्नील देशमुख यांनी, २५वर्षांच्या युगवाणी साहित्य सूचीचे संपादन करताना अनेक अडचणी आल्या परंतु त्यावर मात करून ती पूर्ण केली. सूचीमध्ये कादंबरी, कथा, कविता, लेख आदी वाङ्मयीन प्रकारांचा समावेश केला असून याचा अनेक अभ्यासकांना लाभ होईल असे ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप करताना प्रदीप दाते यांनी, सूची द्वारे वेगवेगळ्या साहित्यातील जुने संदर्भ अभ्यासकांना कळतात. अशाच वेगवेगळ्या विषयांवर सूची तयार व्हाव्यात, असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन वृषाली देशपांडे यांनी केले. यावेळी वि.सा. संघाचे सरचिटणीस विलास मानेकर, उपाध्यक्ष राजेंद्र डोळके, ग्रंथालय प्रमुख विवेक अलोणी,डॉ. तीर्थराज कापगते, कवी श्याम धोंड, सुनील शिनखेडे, राजश्री बनहट्टी, डॉ. मोनाली पोफरे, माधुरी वाडीभस्मे उपस्थित होते.

# ९ कोटींच्या थकीत महागाई भत्त्याची चौकशी करा

## विमाशि संघाचे पोलिस उपायुक्तांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ४ :
नागपूर जिल्ह्यातील खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे ९ कोटी रुपये इतक्या थकीत महागाई भत्त्याच्या (डी. ए. थकबाकी) वितरणात मोठा गैरव्यवहार झाल्याचा आरोप विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ महानगरने केला आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी संघाचे महानगर कार्यवाह अविनाश बडे यांच्या नेतृत्वात संघाचे अध्यक्ष विठ्ठल जुनघरे, कार्याध्यक्ष अरुण कराळे, कोषाध्यक्ष गंगाधर पराते, संघटक वामन सोमकुवर यांनी पोलिस उपायुक्त (परिमंडळ २) राजेश मदने यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे.



**वेतनपथक अधिकाऱ्यावर गंभीर आरोप**

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषदेच्या वेतनपथक (प्राथमिक) अधिकारी निलेश वाघमारे यांनी प्रशासकीय मंजुरीशिवाय सुमारे ९ कोटी रुपयांची डी.ए. ॲरिअर्सची देयके थेट शालार्थ प्रणालीतील ॲरिअर्स टॅबद्वारे वितरित केल्याचे आरोप आहेत.

सदर रक्कम वितरित करताना शिक्षण उपसंचालक नागपूर, शिक्षण संचालनालय, पुणे यांची कोणतीही मान्यता घेतलेली नव्हती. त्यामुळे हे संपूर्ण व्यवहार नियमबाह्य असून, शासन निधीचा अपव्यय केल्याचे नमूद करण्यात आले आहे.

संघाने निवेदनातून अधिक्षक निलेश वाघमारे आणि श्रीराम पानझाडे यांच्यावर सखोल चौकशी करून फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

या निवेदनाची प्रत मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री, राज्यमंत्री, शिक्षक आमदार सुधाकर अडबाले आणि शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे प्रधान सचिवांना पाठवण्यात आली आहे

**एकाच कर्मचाऱ्याच्या खात्यावर लाखोंची थकबाकी**

निवेदनात दिलेल्या माहितीनुसार, १२५ कर्मचाऱ्यांना डी.ए. ॲरिअर्सच्या देयकांचे वितरण करण्यात आले असून, यामध्ये एका कर्मचाऱ्याच्या नावे तब्बल १९ लाख २४ हजार ३१९ रुपये, तर दुसऱ्याच्या नावे १८ लाख ८० हजार ७५४ रुपये वितरित करण्यात आले आहेत. याशिवाय १०० हून अधिक कर्मचाऱ्यांच्या खात्यावर २ ते १० लाख रुपयांपर्यंतची थकबाकी अदा झाल्याचे नमूद आहे.

या प्रकरणी शिक्षण आयुक्त पुणे यांनी चौकशीचे आदेश दिले होते. तत्कालीन सहसंचालक (अर्थ व नियोजन) श्रीराम पानझाडे यांच्या मार्फत चौकशी झाली होती. परंतु, ही चौकशी अपूर्ण असून आर्थिक गैरव्यवहाराचे प्रकरण दडपल्याचा आरोप संघाने केला आहे.

## शहरी भागात घरगुती हिंसाचाराचे प्रमाण
# १२ पटीने अधिक

■ सुजाता बंडावार, नागपूर, दि. ४ :
आपण आज एकविसाव्या शतकातील आधुनिक युगात वावरत असलो तरी अजूनही महिला या घरगुती हिंसाचाराला सामोऱ्या जात आहे. घरगुती हिंसेचे प्रमाण हे ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात बारा पटीने जास्त असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.



हुंडाबळी ठरलेली वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण सध्या महाराष्ट्रभर गाजत आहे. श्रीमंत घरात पडलेली वैष्णवी सुखात राहील हे दिवा स्वप्न ठरले आणि सासरकडून सतत केल्या जाणाऱ्या पैशाच्या मागणीवरून शारीरिक व मानसिक त्रासाची वैष्णवी बळी ठरली.

अशा कितीतरी वैष्णवी आज जिल्ह्यात घरगुती हिंसाचाराच्या सावटाखाली वावरत आहेत. यामध्ये शुल्लक घरगुती वादांपासून, पती-पत्नीचे वाद, सासु सुनेचे वाद, मोबाईलवर बोलणे, परस्त्री व परपुरुषाशी असलेले संबंध यापासून तर पैशाच्या मागणीवरून, हुंड्यावरून होणाऱ्या वादांचा समावेश आहे.

भरोसा सेल नागपूर शहर येथे घेतलेल्या माहितीनुसार जानेवारी ते डिसेंबर 2024 पर्यंत घरगुती हिंसेच्या सावटाखाली असलेल्या 2523 समुपदेशनाच्या तक्रारी दाखल झालेल्या आहेत. या तुलनेत भरोसा सेल ग्रामीण विभागात जानेवारी ते डिसेंबर 2024 पर्यंत 210 समुपदेशनाच्या तक्रारी दाखल झालेल्या आहेत. यावरून घरगुती हिंसाचाराचे प्रमाण हे ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात सुशिक्षितांमध्ये १२ पटीने अधिक असल्याचे दिसून आले आहे.

मागील वर्षी ग्रामीण भागातील समुपदेशनच्या 210 तक्रारींपैकी 114 समझौते झाले आहेत. तर शहरी भागात समुपदेशनाच्या 2523 तक्रारीनपैकी केवळ 960 समझौते झालेले आहेत. शहरी भागातील समझौत्याचे प्रमाण हे 39% एवढे कमी असून ग्रामीण भागातील प्रमाण 54% आहे.

गेल्या 2017 पासून च्या माहितीवरून दाखल तक्रारींपैकी पोलीस स्टेशनमध्ये दाखल होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये वर्षनिहाय वाढ होताना दिसत आहे. या तक्रारींपैकी चार टक्के तक्रारी या पोलीस स्टेशनमध्ये दाखल झालेल्या आहेत. तीन टक्के तक्रारी या जिल्हा व महिला बालकल्याण विभागाकडे प्रोटेक्शन ऑफिसर कडे पाठविण्यात आल्या आहेत. 14% तक्रारी या जिल्हा विधि प्राधिकरणाकडे पाठविण्यात आल्या असून 35 टक्के तक्रारी या अर्जदार यांच्या म्हणण्यानुसार बंद करण्यात आलेले आहेत.

जेवढे वर पक्षाकडून हुंड्याची मागणी करणारे असतात तेवढेच वधुपक्षाकडून महागड्या भेटवस्तू, सोने, पैसा देण्याचे प्रमाण अधिक आहे, आज डेस्टिनेशन वेडिंग च्या नावाखाली फिल्मी स्टाईल मध्ये थाटामाटात लग्न लावून देणे, इव्हेंट करणे, दागिन्यांपासून तर कपड्यापर्यंत वर पक्षाकडून वधुपक्षा वर दबाव आणल्या जात आहे.

**शहरात घरगुती हिंसाचाराच्या तक्रारी, त्यापैकी समझौता झालेल्या व पोलीस स्टेशनमध्ये दाखल तक्रारींचे वर्षनिहाय प्रमाण**

| वर्ष | दाखल तक्रारी | समझौता | पो. स्टे. |
|---|---|---|---|
| 2017 | 2303 | 903 | 19 |
| 2018 | 2057 | 807 | 0 |
| 2019 | 1649 | 735 | 1 |
| 2020 | 1438 | 475 | 38 |
| 2021 | 2050 | 79 | 155 |
| 2022 | 2398 | 997 | 168 |
| 2023 | 2498 | 975 | 187 |
| 2024 | 2523 | 960 | 168 |
| 2025 | 737 | 204 | 49 |

# शहरातील बगीचे बनले प्रेमीयुगुलांचे अड्डे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :
बगीचा म्हटले की, कुटुंबांनी एकत्रित रित्या जाऊन सुट्टीचा दिवस मनोरंजनात घालविण्याचे उत्तम साधन आहे. पण शहरातील जापनीज गार्डन, महाराज बाग, बायोडायव्हर्सिटी पार्क, लिटल वूड यासारखे अनेक बगीचे प्रेमीयुगुलांचे अड्डे बनले आहेत.

सदर येथील जापनीज गार्डन सकाळी दहा ते संध्याकाळी सहा पर्यंत सुरू असते. पण या बगीच्यामध्ये संपूर्ण कुटुंबापेक्षा प्रेमीयुगुलांचीच रेलचेल येथे दिसून येते.अवघडलेल्या स्थितीत त्यांच्या बसण्याच्या पद्धतीमुळे एखादे परिवार तेथे आपल्या मुलांसहित आल्यावर त्यांना अवघडल्यासारखे होते. हा बगीचा प्रेमीयुगलांसाठीच आहे का? असाही प्रश्न येथे उभा राहतो. नागपुरच्या मध्यभागी असलेल्या महाराज बागेतही हीच परिस्थिती दिसून येते.

महाराज बाग येथे बगीचा व प्राणी संग्रहालय असल्याने अनेक कुटुंब आपल्याला लहान मुलांसह येथे करमणुकीसाठी येतात. पण येथील प्रेमीयुगलांच्या वास्तव्यामुळे नको ते संस्कार मुलांवर घडण्याची शक्यता जास्त आढळून येते. हिंगणा टी पॉईंट च्या समोर असलेले बायोडायव्हर्सिटी पार्क हे मिनी जंगलाचे स्वरूप असून येथे पक्षी निरीक्षण केल्या जाते. तसेच वॉकिंग स्ट्रीट येथे उपलब्ध आहेत. हे पार्क सकाळी व दुपारून सुरू राहते. याच पार्कच्या जवळ असलेले लिटील वूड हे पार्क सुद्धा मॉर्निंग वॉक करणा?यांसाठी उपलब्ध आहे. येथेही प्रेमीयुगलांची हीच परिस्थिती दिसून येते. याशिवाय अंबाझरी गार्डन, बॉटनिकल गार्डन यांचे काम सुरू असल्याने हे बंद अवस्थेत आहे. जापनीज गार्डनचे सुद्धा काम सुरू असल्याने या बगीच्याचे मेंटेनन्स नाही.

# अपंगांना क्यूआर कोडद्वारे मिळणार रेल्वे तिकिट

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :
अपंगांना रेल्वेने प्रवास सवलत घेण्यासाठी रांगेत लागून किंवा रेल्वे कार्यालयात जाऊन प्रक्रिया करण्याची गरज आता पडणार नाही. रेल्वे त्यांना डिजिटल ओळखपत्र देणार आहे.

प्रवासी अपंगांना शारीरिक प्रमाणपत्र नेहमी द्यावे लागत होते. डिजिटल ओळखपत्रामुळे त्यांचा हा जास थांबेल. रेल्वेने सवलतीसाठी वापरल्या जाणाऱ्या ओळखपत्र प्रणालीचे संपूर्ण डिजिटायझेशन केले आहे. या डिजिटल ओळखपत्रात क्यूआर कोड असेल.

तो इंडियन रेल्वे कॅटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन (आयआरसीटीसी) च्या ऑनलाइन बुकिंग प्रणालीत तसेच काउंटरवर तिकीट आरक्षणासाठी स्कैन करता येईल. यामुळे अपंग प्रवाशांना वारंवार कागदपत्रे सादर करावी लागणार नाही.

रेल्वेच्या नव्या प्लॅटफॉर्मवर अपंग स्वतःहून ऑनलाइन अर्ज व नूतनीकरण करू शकतात. या ओळखपत्रात एकदा माहिती भरल्यानंतर ते छेडछाड प्रतिरोधक व कायमस्वरूपी डिजिटल स्वरूपात वापरता येईल. याचा रेल्वेच्या डिजिटलमधील सेवेत समावेश आहे. लाखो अपंग प्रवाशांचा प्रवास सोयीचा होणार असून अधिकृत वेबसाईटवर दिव्यांगांना सोय उपलब्ध करून दिल्याची माहिती मध्य रेल्वेने दिली.



**अपंगांना असे लाभ मिळतील**

ऑनलाईन अर्ज व नुतनीकरणाची सुविधा राहणार आहे. सवलत प्रमाणपत्र बाळगण्याची गरज नाही. ऑनलाइन पडताळणी व वेगवान प्रक्रिया केली जाईल. पारदर्शक व सुरक्षित ओळख प्रणाली आहे. क्यूआर कोडद्वारे सोयीस्कर वापर होणार आहे. अपंगांसाठी रेल्वेने ही एक चांगली सुविधा सुरू केली आहे. नागपूर विभागात दिव्यांगांच्या अर्जावर १०० टक्के डिजिटल ओळखपत्र वितरित ल करण्याचे काम सुरू आहे. याद्वारे गैरप्रकारालाही आळा बसेल, असे मध्य रेल्वेचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक अमन मित्तल म्हणाले.

**नोंदणी प्रक्रिया कशी कराल?**

अधिकृत दिव्यांगजन पोर्टलवर नवीन वापरकर्ता म्हणून नोंदणी करा. आपले राज्य व जवळचे रेल्वे स्थानक निवडा.
अपंग व रेल्वे सवलत प्रमाणपत्र स्कॅन करून अपलोड करा.
फोटो ओळखपत्र, जन्मतारखेचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो व पत्ता द्या.
सर्व माहिती पूर्ण करून अर्ज सादर करा. अपूर्ण अर्ज ३० दिवसांत पूर्ण करून पुन्हा सादर करता येईल. अर्ज मंजूर झाल्यावर डिजिटल ओळखपत्र डाउनलोड करून घेता येईल.

## इमारतीवरून पडल्याने पेंटरचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :
इमारतीच्या १० व्या माळ्यावर रंग-रंगोटीचे काम करीत असताना अचानक तोल जाऊन खाली पडल्याने एका पेंटरचा मृत्यू झाला. ही घटना एमआयडीसी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. मोहम्मद कैफ आलम (२१) रा. आझमगड, बिहार असे मृताचे नाव आहे.

कैफ व मोठा भाऊ बारिक आलम पेंटिंगचे काम करायचे. वानाडोंगरीच्या धनश्रुती अपार्टमेंटमध्ये इमारतींच्या रंग-रंगोटीचे काम मिळाले. दोघेही भाऊ इतर मजुरांसोबत तेथेच राहात होते. कैफ १० व्या माळ्यावर पेंटिंगचे काम करीत होता. दरम्यान तोल गेल्याने तो थेट खाली पडला. भाऊ व इतर सहकाऱ्यांनी तत्काळ त्याला उपचारार्थ लता मंगेशकर रुग्णालयात नेले. मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी मिळालेल्या सूचनेवरून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करीत तपास सुरू केला आहे.

# २३ हजार लिटर पेट्रोल आणि टळला धोका

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :
जड वाहनांना प्रतिबंध असतानाही शहीद गोवारी पुलावरून सर्रास जड वाहनांची रहदारी सुरू असते. त्यामुळे सोमवारी रात्रीच पुलाच्या दोन्ही बाजूला हाईट गेज बार लावण्यात आले.

हे बार लावून २४ तास उलटत नाही तोच २३ हजार लिटर पेट्रोलने भरलेला एक टँकर पुलावरून जाण्याच्या नादात रहाटे कॉलनीकडील हाईट गेज बारला धडकला. या धडकेमुळे कठड्यावरील सूचना फलकही तुटून खाली पडले होते.




याप्रकरणी बजाजनगर पोलिसांनी आरोपी टँकर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कैलाश जाधव रा. त्रिमूर्तीनगर असे टँकर चालकाचे नाव आहे. पोलिसांनी टँकरसह चालकाला ताब्यात घेतले आहे. टँकर लिक होवून किंवा उलटून स्फोट झाला असता तर? अशी भीती प्रत्यक्षदर्शींनी व्यक्त केली.

प्रतीबंध असतानाही सीताबर्डी उड्डाणपुलावरून जड वाहनांची सर्रास वाहतूक सुरू असते. वाहतूक पोलिस याकडे नेहमी दुर्लक्ष करीत आले आहेत. सोमवारीच पीडब्ल्यूडी विभागाने रहाटे कॉलनी ते मॉरिस कॉलेजकडे जाणारा मार्ग बंद करून पुलाच्या एन्ट्री पॉइंटवर हाईट गेज बार लावले. रात्री उशीरापर्यंत हे काम चालले. बार लावण्यासोबतच दोन मोठ-मोठे सूचना फलकही लावण्यात आले.

त्यावर जड वाहनांसाठी प्रतिबंधित अशी सूचना लिहिलेली होती. काम पूर्ण होऊन २४ तासही झाले नव्हते की, सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास हा अपघात घडला. रिलायंस कंपनीचा पेट्रोल टँकर क्र. एमएच-३१/एफसी-४१६१ चा चालक कैलाश जाधव याने निष्काळजीपणे पुलावरून वाहन काढण्याचा प्रयत्न केला.

त्याचा अंदाज चुकला आणि टँकरवर लागलेली लोखंडी शीट आणि लॅडर हाईट गेज बारच्या कठड्यावर धडकले. धडकेनंतर चालकाने वाहन थांबविले. मात्र तोपर्यंत वाहन कठड्यात फसले होते. टँकरमध्ये स्फोट होण्याच्या भीतीने आसपासचे लोक दूर पळाले. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली.

वाहतूक पोलिस आणि बजाजनगर ठाण्याचे पोलिस घटनास्थळी पोहोचले. अनुचित घटना होऊ नये म्हणून सुरक्षेच्या दृष्टीने अग्निशमन विभागालाही सूचना देण्यात आली. दोन अग्निशमन वाहन घटनास्थळी पोहोचले. बऱ्याच प्रयत्नानंतर टँकर कठड्याखालून बाहेर काढण्यात आले.

बजाजनगरचे ठाणेदार सुरेंद्र अहेरकर यांनी ट्रक चालक कैलाश बंडू जाधव विरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. यापूर्वीही अनेकदा उड्डाणपुलावर दोन्ही टोकाला हाईट गेज बार लावण्यात आले आहेत. मात्र वाहन चालक शॉर्टकटच्या नादात तेथून निघण्याचा प्रयत्न करतात आणि कठड्याचे नुकसान करतात.

दररोज रात्रीला जड वाहन शहरातून रहदारी करतात. सीताबर्डी उड्डाणपुलावर जड वाहनांची रहदारी प्रतिबंधित असतानाही येथून दररोज वाहनांची ये-जा सुरू असल्याचे दिसून येत आहे.

# अहिल्या की पुण्यगाथा' नाट्याने उभा केला रोमांच



*जनसेवा फाऊंडेशन आणि विचार भारती यांच्यातर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर नाट्यप्रयोग सादर करण्यात आला. त्यात अहिल्यादेवींच्या बालपणाच्या भूमिकेत नागपूर येथील कश्वी भक्ते.*

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :
विश्व मांगल्य सभा निर्मित 'राष्ट्र समर्थ देवी अहिल्या की पुण्यगाथा' या गाजलेल्या हिंदी नाट्याचा विशेष प्रयोग अहिल्यानगर जिल्ह्यातील सावेडीच्या माऊली सभागृहात झाला. अहिल्यादेवींचे जीवनकार्य आणि कर्तृत्वगाथा या नाटिकेतून साकारण्यात आली. ही नाटीका पाहताना उपस्थितांच्या अंगावर रोमांच उभे राहिले.

जनसेवा फाउंडेशन आणि विचार भारती यांच्यातर्फे अहिल्यादेवी गौरव दिनानिमित्त नगर शहरात तीन दिवस पालकमंत्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. अहिल्यादेवींच्या जीवनावर आधारित या नाट्यप्रयोगाने या महोत्सवाचा समारोप झाला.

अहिल्यादेवींचे बालपण ते पूर्ण जीवनकार्य, धर्मकार्य, युद्धनीती, चतुर राजनीतीचे प्रमुख प्रसंग कलाकारांनी अभिनयातून सादर केले. अहिल्यादेवी प्रत्यक्षात रसिकांसमोर उभी करण्यात कलाकार यशस्वी झाले.

अहिल्यादेवींची भूमिका सर्वांनाच भावली. नाटिका झाल्यानंतर भारतमातेचा व अहिल्यादेवींचा जयजयकार करत उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करत मानवंदना दिली. प्रारंभी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी विश्व मांगल्य सभाच्या सभाचार्या रेणुका माई, गायत्री लोमटे, आमदार मोनिका राजळे, आमदार विठ्ठल लंघे, आमदार अमोल खताळ, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाच्या स्वागताध्यक्ष धनश्री विखे, विचार भारतीचे मार्गदर्शक रवींद्र मुळे, शुभांगी मेंढे, हिंदुत्ववादी वक्त्या काजल हिंदुस्तानी आदी उपस्थित होते. यावेळी सुजय विखे पाटील म्हणाले, अहिल्यानगर गौरव दिन व पालकमंत्री सांस्कृतिक कार्यक्रमांनी संस्कृतीचा संदेश दिला आहे. सर्व मिरवणुकांमधून आपली संस्कृती जपत मिरवणुका डीजेमुक्त केल्या. यापुढेही असेच उपक्रम राबविण्यात येतील.

नाट्यप्रयोगापूर्वी हिंदुत्ववादी वक्त्या काजल हिंदुस्तानी यांचे 'महिला सबलीकरण काळाची गरज' या विषयावर व्याख्यान झाले. प्रास्ताविक अनिल मोहिते यांनी केले. सुधीर लांडगे यांनी परिचय करून दिला. अशोक गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. निखिल वारे यांनी आभार मानले. यावेळी शोभायात्रेनिमित्त झालेल्या पारंपरिक वेशभूषा स्पर्धेतील पारितोषिकांचे वितरण झाले.

कार्यक्रमाला पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाचे कार्याध्यक्ष राजेंद्र पाचे, बाबासाहेब वाकळे, महेंद्र जाखेटे, उदय भणगे, चंद्रकांत तागड, धनंजय जाधव, माजी नगरसेवक अनिल बोरुडे, मनोज ताठे, सतीश शिंदे, संपत नलावडे, रवींद्र बारस्कर, सोनाली चितळे, पल्लवी जाधव, संजय ढोणे, रामदास आंधळे उपस्थित होते.

## गुप्तचर विभागातील अधिकाऱ्याच्या घरी चोरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :
चोरांनी गुप्तचर विभागातील एका अधिकाऱ्याचे घरफोडून रोकड आणि दागिन्यांवर डल्ला मारला. ही घटना कोराडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली.

गुप्तचर विभागात अधिकारी असलेली एक महिला ओमसाईनगर परिसरात कुटुंबासह राहते. ती मैत्रीण व आपल्या दोन मुलांसह उत्तराखंड येथे फिरायला गेली होती. तिचे पती घराला कुलूप लावून लग्नानिमित्त नातेवाईकाकडे गेले होते.

या दरम्यान चोरांनी घरामागील चॅनल गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. कपाटातील दोन तोळ्यांचे मंगळसूत्र, चांदीची पायघोळ, १२ हजार रुपये रोख व इतर वस्तूंसह एकूण १ लाख रुपये किंमतीचा माल चोरी केला. महिलेचे पती घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. नागपूरला परतल्यानंतर महिला अधिकाऱ्याने चोरी गेलेल्या मालाची तपासणी केल्यानंतर पोलिसात तक्रार केली. चोरांनी घरातील सीसीटीव्ही कॅमेरे आणि त्यांचे राऊटरही चोरी केले होते.

# वाठोड्यात उभारणार आधुनिक श्वान निवारा केंद्र

**६ कोटी ८९ लाखांच्या खर्चाला महानगरपालिकेची मंजुरी**

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :
शहरातील रस्त्यांवर फिरणाऱ्या श्वानांवर नियंत्रण आणून त्यांची निगा राखण्यासाठी महानगरपालिकेतर्फे वाठोडा भागात आधुनिक सुविधा असलेले श्वान निवारा केंद्र उभारले जाणार आहे. या प्रकल्पासाठी ६ कोटी ८९ लाख ६७ हजार २८१ रुपयांच्या खर्चाला मनपाने मंजुरी दिली आहे.





नागपूर महानगरपालिकेचे सध्या वाठोडा भागात श्वान निवारा केंद्राची पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. सध्याच्या केंद्रात पायाभूत सुविधांची कमतरता असल्यामुळे श्वानांची निगा राखणे आणि निवाऱ्याचे कार्य सुरळीतपणे चालविण्याकरिता मनपा आयुक्त आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निदेर्शानुसार वाठोडा भागातील श्वान निवारा केंद्रातील सुविधांची बळकटीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.

नवे आधुनिक श्वान निवारा केंद्र ३ एकर जागेत उभारले जाणार आहे. यात अंदाजे २०० श्वानांची निगा राखण्याची क्षमता राहणार आहे. या सुविधेत श्वान आणि पिल्लांसाठी स्वतंत्र निवारे, विलगीकरण शेड्स, श्वानांच्या स्वच्छतेसाठी यंत्रणा, आधुनिक रुग्णालय, खेळाचे क्षेत्रे, स्वयंपाकघर, स्टोअर्स आणि प्राण्यांसाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

या प्रकल्पाची वास्तुशिल्प रचना श्रीपाद दुबे यांनी केली आहे. तर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून ॲक्सीनो कॅपिटल सर्विसेस व श्रीपाद दुबे आर्किटेक्स या कंपन्यांची निवड केली आहे. या उपक्रमाद्वारे महानगरपालिकेतर्फे रस्त्यावर फिरणाऱ्या श्वानांसाठी चांगले जीवनमान आणि प्राण्यांच्या कल्याणासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने टाकलेले हे महत्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. या प्रकल्पाला मनपाने तांत्रिक मंजुरी दिली आहे.